**सभापतीस्थानी - मा.सभापती**

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

**रिध्दपूर हे गाव अमरावती या जिल्हा मुख्यालयाशी निकटतम मार्गाने जोडणे**

**(1) * 9271 श्री. नतिकोद्दीन खतिब , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते : तारांकित प्रश्न क्रमांक 5697 ला दिनांक 11 जुलै,2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रिध्दपूर हे गाव अमरावती या जिल्हा मुख्यालयाशी निकटतम मार्गाने जोडणाऱ्या रस्त्याचा भाग असलेला शिराळा-बेलोरा-रिध्दपूर हा भाग संपूर्ण लांबीमध्ये 5.50 मिटर डांबरी पृष्ठ भागाचा करण्याच्या बांधकामाची सद्य:स्थिती काय आहे,

(2) शिराळा ते बेलोरा भागातील कामासाठी आतापावेतो किती निधी प्रत्यक्षात उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे,

(3) या वर्षात कार्यपूर्तीसाठी आणखी किती निधीची आवश्यकता आहे,

(4) वळण सुधारणेसाठी लागणाऱ्या अतिरिक्त जमिनीचे भूसंपादन करण्याची प्रक्रिया पूर्ण झालेली असली तरी बेलोरा रिध्दपूर या भागात अजूनही संपादित जमिन काही प्रकरणी हस्तांतरीत न होण्याची कारणे काय आहेत?

**श्री.रविशेठ पाटील, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1) शिराळा ते चिंचोली काळे ते बेलोरा या 10 कि.मी. लांबीमध्ये रुंदीकरणाचे काम प्रगतीत असून बेलोरा ते सिध्दपूर या 5.50 कि.मी. लांबी मध्ये काही भागात जमीन उपलब्ध व्हावयाची आहे.

(2) वरील तिनही कामाकरिता एकूण रुपये 101.13 लक्ष निधी उपलब्ध करुन देण्यांत आलेला आहे.

(3) या वर्षात कार्यपूर्तीसाठी आणखी रु. 182.17 लक्ष निधीची आवश्यकता आहे.

(4) 3 प्रकरणापैकी 2 प्रकरणात निवाडा पारीत झाला असून मोबदला देणे बाकी आहे. 1 प्रकरण कलम 9 (1) मध्ये आहे.

श्री.नतिकोद्दीन खतिब : सभापति महोदय, शिराळा - रिद्धपुर इस रस्ते का काम कब तक पूरा हो जाएगा ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, रिध्दपूर हे गाव अमरावती जिल्हयाच्या जवळील गाव आहे. शिराळा-बेलोरा-रिध्दपूर रस्त्याची एकूण लांबी साडेपंधरा कि.मी.आहे. या रस्त्याच्या कामासाठी निधीची उपलब्धता झालेली आहे आणि जवळजवळ 1 कोटी 1 लाख रुपयांपैकी 56 लाख रुपये खर्च झालेले आहेत. पुढील वर्षापर्यंत आम्ही हे संपूर्ण काम पूर्ण करु.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे. रिध्दपूर हे गाव मराठी भाषेची जननी समजले जाते. ही गोष्ट सिध्द झालेली आहे.विश्वकोषामध्ये 12 व्या खंडातील पान 10 वरील एक ओळ मी आपणास वाचून दाखवतो.त्यात म्हटलेले आहे की,"निर्विवाद

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9271 . . . .

प्रा.बी.टी.देशमुख . . . .

पुराव्यानेच बोलावयाचे असेल तर सु.1278 मध्ये म्हाइंभट्टांनी (मृ.सु.1300) संकलित केलेले लीळाचरित्र हा मराठीतील पहिला ग्रंथ म्हणता येईल. हा गद्य आहे हा त्याचा एक विशेष आहे." हा ग्रंथ रिध्दपूर मध्ये लिहिला गेल्याचे विश्वकोषामध्ये म्हटलेले आहे. यासंबंधात पहिला प्रश्न दि.30 जून 1992 रोजी या सभागृहामध्ये ता.प्र.क्र.19660 द्वारे विचारण्यात आला होता. त्यातील पहिला प्रश्न भाग-1 असा होता की,"महानुभाव पंथाची काशी समजले जाणारे श्री क्षेत्र रिध्दपूर हे ठिकाण अमरावती या जिल्हा मुख्यालयाशी निकटतम मार्गाने जोडणाऱ्या रस्त्याचा एक प्रस्ताव जिल्हा नियोजन व विकास परिषदेने दिनांक 10 जानेवारी 1992 रोजीच्या बैठकीत मान्य करुन शासनाने पाठविलेल्या रिध्दपूर विकास योजनेमध्ये समाविष्ट आहे, हे खरे आहे काय ? " तर त्या प्रश्न भाग-1ला "होय" असे उत्तर दिले होते. त्यावेळी राज्याचे मुख्यमंत्री माननीय श्री.सुधाकरराव नाईक हे होते. त्यांनी रिध्दपूरमध्ये जाहीर सभा घेऊन रिध्दपूर विकास योजनेचे भूमीपूजन केले होते. या योजनेची बाकीची बरीचशी कामे झाली आहेत. त्या योजनेचा भाग असलेल्या या रस्त्याचे काम मात्र अजून राहिलेले आहे. या कामाच्या संदर्भात गेल्या 10-12 वर्षामध्ये सभागृहामध्ये अनेकदा प्रश्नोत्तरे झालेली आहेत. माझे असे म्हणणे आहे की, ही गोष्ट योग्य दिसत नाही. जमिनीच्या बाबतीत सांगावयाचे तर सर्व जमिनीचे भूसंपादन झाल्याचे उत्तर पूर्वीच दिलेले आहे. येत्या 8-10 दिवसात या जमिनी ताब्यात मिळतील. तेव्हा शिराळा पासून रिध्दपूर पर्यंतच्या रस्त्याचे संपूर्ण काम 5.5 मिटर डांबरीकरणाच्या धावपट्टीसह एप्रिल-मे पर्यंत पूर्ण केले जाईल का ? या प्रश्नाचे उत्तर आल्यावर बाकीचे प्रश्न विचारतो.

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, हे काम जूनपर्यंत पूर्ण केले जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी एप्रिल-मे-जून या वादामध्ये जात नाही. माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, या रस्त्याचे काम जूनपर्यंत पूर्ण केले जाईल. त्याला माझी काही हरकत नाही. जून 2006 पर्यंत शिराळा ते रिध्दपूर या साडेपाच मिटर रुंदीच्या डांबरी धावपट्टीसह रस्त्याचे काम पूर्ण केले जाईल असेच आपण सभागृहाला सांगितले आहे ना ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, जूनपर्यंत हे काम पूर्ण होईल याची मी ग्वाही देतो.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मोंडपार (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) या गावातील भैराई देवळाकडे जाण्यास पक्का रस्ता बांधणेबाबत**

**(2) * 10605 श्री. अनिल परब , डॉ. दिपक सावंत** : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मोंडपार (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) या गावात भैराई देवीचे देऊळ असून दरवर्षी याठिकाणी मोठ्या प्रमाणात यात्रा होते मात्र हे देऊळ गावापासून दूर असल्याने याठिकाणी जाण्यास पक्का रस्ता नाही हे खरे आहे काय,

(2) असल्यास, ग्रामस्थांनी हा रस्ता होणेबाबत वारंवार शासनाकडे मागणी करुनसुध्दा अद्यापपर्यंत शासनाने त्यावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही हे खरे आहे काय,

(3) असल्यास, यासंदर्भात मा. लोकप्रतिनिधीनी दिनांक 17 ऑक्टोबर, 2005 रोजी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री.रविशेठ पाटील , श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1), (2) व (3) होय.

(4) मोंडपार ते भैराई देवीचे मंदिर या रस्त्याच्या समावेश 1981-2001 च्या रस्ते विकास योजनेत नसल्याने या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कोणत्याही योजनेत मंजूर करता येणे शक्य नाही.

----------

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, मोंडपार या गावात भैराई देवीचे देऊळ आहे. याठिकाणी चौथ्या प्रश्नाच्या उत्तरात म्हटलेले आहे की, "मोंडपार ते भैराई देवीचे मंदिर या रस्त्याचा समावेश 1981-2001 च्या रस्ते विकास योजनेत नसल्याने या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कोणत्याही योजनेत मंजूर करता येणे शक्य नाही."

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10605 (पुढे चालू....
श्री.अनिल परब (पुढे चालू...

आज आपण 2005-2006 मध्ये आहोत. भाविक आणि गावकऱ्यांची मागणी गेल्या 20-25 वर्षापासून प्रलंबित आहे. शासनाला विनंती आहे की, हा फार मोठा रस्ता नाही. भाविकांची मागणी लक्षात घेता, या रस्त्याला मंजुरी द्याल काय ? हा रस्ता किती कि.मी.चा आहे ?

श्री.रविशेठ पाटील : मोंडपार-भैराई हा ग्रामीण रस्ता आहे. या रस्त्याचा 1981-2001 च्या रस्ते विकास योजनेमध्ये समावेश नव्हता. या रस्त्याच्या नवीन बांधकामासाठी 40 लाख रुपये आणि भूसंपादनासाठी 15 लाख असे मिळून एकूण 55 लाख रुपये खर्च येतो. रस्त्यासाठी ग्रामस्थांनी मोफत जागा दिली तर तो रस्ता रोजगार हमी योजनेतून प्रस्तावित केला जाईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : मोंड हे माझे जन्मगाव आहे. या पूर्वी या रस्त्याचे 300 मिटर पर्यनतचे काम सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांच्या आमदार फंडामधून झालेले आहे आणि 800 मिटरच्या रस्त्याचे काम माझ्या फंडामधून केलेले आहे. मी यापूर्वी बांधकाम विभागाच्या मंत्री महोदयांना, मोंडपार रस्त्याचे रुंदीकरण आणि डांबरीकरण करण्याबाबत पत्र दिलेले आहे. त्या रस्त्यावरुन एस.टी.येत असेल तर समोरुन येणाऱ्या वाहनांना घंटा वाजवून वाहन मागे घ्यायला सांगायला लागते इतका अरुंद रस्ता आहे, परंतु अजूनही त्याबाबत काही झालेले नाही. दुसरे असे की, हा संपूर्ण रस्ता जिल्हापरिषदेकडे आहे. असे जरी असले तरी तो रस्ता बांधकाम खात्याने करावा अशी विनंती केलेली आहे. माझ्या गावचा रस्ता आहे, तेव्हा आमदार, लोकप्रतिनिधी म्हणून माझी विनंती आहे की, या रस्त्याचे काम आपण करणार आहात काय ?

श्री.रविशेठ पाटील : सभापती महोदय, सदर रस्ता आमच्या बांधकाम विभागाकडे नाही तर तो जिल्हापरिषदेकडे आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : म्हणूनच या रस्त्याचे काम बांधकाम खाते करणार आहे काय ?

(उत्तर आले नाही.)

श्री.जयंत प्र.पाटीलः मंत्री महोदय या ठिकाणी चुकीचे उत्तर देत आहेत. जिल्हापरिषदेकडे रस्त्याच्या बांधकामासाठी कोणतेही फंड नाहीत. जिल्हापरिषद ही शासनाची एजन्सी म्हणून काम करते. शासन त्यांना आदेश देऊ शकते. या राज्यातील सगळे रस्ते कायद्याने शासनाच्या मालकीचे आहेत. जिल्हापरिषदेकडे रस्ते करण्याकरिता स्वत:चा फंड नाही. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये. रस्त्यांची कामे ही सार्वजनिक बांधकाम खाते करते. जिल्हा परिषदेचे बांधकाम खाते हे सार्वजनिक

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10605 (पुढे चालू....

बांधकाम खात्याच्या अंतर्गत काम करते. तेव्हा उत्तर दुरुस्त व्हावे, अशी विनंती आहे. दुरुस्त उत्तर द्यावे.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मोंडपार गावावरुन भैराई येथे जाण्यासाठी रस्ता उपलब्ध नाही, अशातला भाग नाही. एक तर प्रमुख जिल्हा मार्ग क्र.7 हा रस्ता उपलब्ध आहे. त्यानंतर मोंडपार-भैराई हा रस्ता उपलब्ध आहे. थोडा खडीचा मधे रस्ता आहे तो आम्ही करु. त्यानंतर प्रमुख जिल्हा मार्गाला जोडून एक मार्ग आहे. त्याला पॅरलल रस्ता हवा आहे. तो रस्ता पायवाट म्हणून वापरण्यात येतो.

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ RJW/ प्रथम श्री.किल्लेदार....... 12:10

ता.प्र.क्र.10605......

श्री. छगन भुजबळ....

आता तूर्त साडेचार कि.मी. अंतर जावे लागते व हे काम झाल्यानंतर अडीच कि.मी. जावे लागणार आहे. ती जागा अद्याप शासनाच्या ताब्यात आलेली नाही. त्याचबरोबर शासनाचे जे नियम आहेत किंवा योजना आहेत त्याच्या अंतर्गत हा रस्ता बसत नाही. त्या ठिकाणी जाण्यासाठी त्यांना दोन-तीन रस्ते उपलब्ध आहेत. त्यामुळे शासनाने प्रस्तावित केले आहे की, जर ग्रामस्थांनी मोफत जागा दिली तर रोजगार हमी योजनेमधून ते काम करु आणि त्या रस्त्याला न्याय देऊ. या रस्त्याचे काम करावयाचे नाही अशातला भाग नाही. ते काम नियमात बसवावयाचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचे ते जन्म गाव असल्यामुळे त्या रस्त्याकडे शासन दुर्लक्ष करु शकत नाही. हा रस्ता होण्याच्यादृष्टीने काय मार्ग काढावयाचा हा शासनासमोर प्रश्न आहे. एकत्र बसून तो मार्ग काढण्याचा प्रयत्न करु आणि त्या रस्त्याचे काम पुढे नेऊ.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी असा प्रश्न विचारण्यात आलेला आहे की, "मोंडपार (ता. देवगड,जि.सिंधुदुर्ग) या गावात भैराई देवीचे देऊळ असून दरवर्षी याठिकाणी मोठया प्रमाणात यात्रा होते मात्र हे देऊळ गावापासून दूर असल्याने याठिकाणी जाण्यास पक्का रस्ता नाही हे खरे आहे काय? त्याला "होय" असे उत्तर दिलेले आहे. त्यानंतर दुस-या प्रश्नाला ही "होय" असे उत्तर दिलेले आहे. तिस-या प्रश्नाचे उत्तरही "होय" असे आहे. आणि चौथ्या प्रश्नाला "मोंडपार ते भैराई देवीचे मंदिर या रस्त्याचा समावेश 1981-2001 च्या रस्ते विकास योजनेत नसल्याने या रस्त्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कोणत्याही योजनेत मंजूर करता येणे शक्य नाही" असे उत्तर दिलेले आहे. प्लॅनचे रस्ते तसेच नॉनप्लॅनचेही काही रस्ते असतात. शासनाच्या विविध योजना आहेत. त्यामार्फतही कामे केली जातत. तसेच नाबार्ड, वर्ल्ड बँक यांच्या मार्फतही काही योजना राबविल्या जातात. निवडणुकीपूर्वीही दीड ते दोन कोटी रुपये विशेष फंड दिला जातो. तसे पॅकेज दिले जाते. ग्रामस्थानी या रस्त्याच्या कामासाठी निवेदन दिलेले आहे, त्यांची तशी मागणी आहे, सन्मानीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचे स्वत:चे ते जन्म गाव आहे असे या ठिकाणी सांगण्यात आलेले आहे. असे असतांना या ठिकाणी सरकारची काय अवस्था आहे? सन्माननीय सदस्यांच्या स्वत:च्या गावचा रस्ता त्यांच्या पक्षाचे मंत्री असतांना होऊ शकत नाही तर बाकीच्या गावांची काय अवस्था असेल? चौथ्या प्रश्नाला उत्तर

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.10605......

श्री. पांडुरंग फुंडकर...

दिलेले आहे की, विकास योजनेअंतर्गत हा रस्ता येत नाही. त्यामुळे त्याला मंजुरी देता येत नाही. माझा प्रश्न असा आहे की, मंत्रिमहोदयांनी मनात आणून "खास बाब" म्हणून हा रस्ता तयार करण्यात येणार आहे काय?

श्री. छगन भुजबळ :सन्मानीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे काही दृष्टया बरोबर आहे.खरे म्हणजे श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचे जन्मगाव असलेल्या रस्त्याचे काम असल्यामुळे मला ते करण्याशिवाय गत्यंतर नाही. या रस्त्याबद्दल सांगावयाचे झाले तर या सभागृहाच्या रचनेसारखाच हा प्रमुख जिल्हा मार्ग असा "यू" टाईप आहे. (अडथळा) मी या रस्त्याचा नकाशा पाहिला आहे.(अडथळा) आपण नकाशा बघण्यामध्ये हुशार आहात याची मला कल्पना आहे. मी काही बिल्डर नाही. सन्माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकून घ्यावे. मला सभागृहाला जसे समजून सांगता येईल तसे सांगतो. असा हा 'यू' शेपमध्ये प्रमुख जिल्हा मार्ग आहे आणि या ठिकाणी ते मंदिर आहे. तिकडे मोंडगाव, मोंडपार हे संपूर्ण पसरलेले आहे. त्या गावातून लोकांना येथे येण्यासाठी जसा हा रस्ता उपलब्ध आहे. तसा एक डायरेक्ट रस्ता सुध्दा उपलब्ध आहे. त्याठिकाणी एक रस्ता एका बाजूने येतो आणि दुसरा रस्ता दुस-या बाजूने येतो. (माननीय मंत्रिमहोदय हातवारे करुन समजून सांगत असतात ) आणि एक रस्ता पॅरलल काढावयाचा आहे त्यामुळे तो नियमामध्ये बसत नाही. तरी सुध्दा या प्रश्नाला पॉझिटिव्ह उत्तर देण्याच्या दृष्टीने मी असे सांगितलेले आहे की, तेथील गावक-यांना या रस्त्याची आवश्यकता आहे तर त्या गावक-यांनी या रस्त्यासाठी जागा उपलब्ध करुन दिली पाहिजे तरच या रस्त्याचे काम पुढे जाऊ शकेल. म्हणजे मोंडगाव ते मोंडपार असा संपूर्ण पसरलेला तो परिसर आहे. मोडयावरुन येण्यासाठी डायरेक्ट रस्ता उपलब्ध आहे. आता त्यांना दुसराही रस्ता पाहिजे आहे. तो रस्ता झाला तर अंतर कमी होते.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 10605......... श्री. छगन भुजबळ ......

म्हणून माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, सदस्यांनी आपल्या प्रतिमेचा उपयोग करुन जर त्या भागातील शेतकऱ्यांची जमीन या रस्त्यासाठी मिळाली यादृष्टीने प्रयत्न करावा. या रस्त्यासाठी 41 लाख रुपये एवढा खर्च येऊ शकतो. आणि जमीन मिळाली तर कोणतीच अडचण येणार नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी नकाशावरुन या ठिकाणी माहिती दिली, परंतु मी सुध्दा याच गावच्या बाजूच्या गावातील राहणारा आहे. लोकांच्या सोईसाठी जो रस्ता आहे त्याची मागणी या ठिकाणी केली जात आहे. कारण या रस्त्याला पॅरलल जो रस्ता आहे तो थोडा 15 मिनिटे लांब असल्यामुळे लोक याच रस्त्यावरुन जाणे पसंत करतात. परंतु गाडी जाण्यासारखा हा रस्ता नाही. ज्याप्रमाणे सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुळकर्णी यांच्या गावातील रस्ता आपण केलेला आहे तशाच प्रकारे देवगड तालुक्यात खालच्या बाजूच्या गावांना देखील रस्त्याची अडचण आहे. या रस्त्याच्या खालच्या भागाला दोन दोन किलोमीटर अंतरावर गांवे वसलेली असून या गावांमध्ये 70 टक्के गावांत गावाला जोडणारे रस्ते नाहीत, ते रस्ते करण्यात येतील काय ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, या राज्यातील सगळेच रस्ते आम्हाला करावयाचे आहेत परंतु निधीअभावी आपण ते काम टप्प्याटप्प्याने करीत असतो. त्यामुळे आपला रस्ता कुठल्या टप्प्यात बसतो तो बसविण्याचा प्रयत्न करण्यात येईल व लवकरात लवकर तो टप्पा गाठण्यात येईल.

श्री. गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदसय, मा. मंत्री महोदयांनी सांगितले की, गावाच्या वतीने जागा देण्यात आली तर काहीच अडचण येणार नाही. मी या ठिकाणी सभागृहाला आश्वस्थ करु इच्छितो की, या रस्त्यासाठी जी जमीन पाहिजे असेल ती देण्यात येईल. तसेच दुसरा जो रस्ता आपण सांगितला तो आम्ही आमदार निधीतून पूर्ण करणार आहोत. माझी एकच विनंती आहे की, हा रस्ता सध्या जिल्हा परिषदेच्या अखत्यारित असल्यामुळे हा मोंडपार पासून पाडगांवपर्यंतचा रस्ता शासनाने ताब्यात घ्यावा, ती कार्यवाही शासन करणार काय ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, जमीन उपलब्ध असेल तर निश्चितपणे विचार करण्यात येईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनंत तरे : सभापती महोदय, ज्या रस्त्याची मागणी चालू आहे त्या रस्त्यासंबंधी गांवकऱ्यांनी वेळोवेळी पत्र पाठविलेली आहेत. एखादया रस्त्यासाठी लागणारी जागा संपादित करण्याचे काम शासनाचे आहे. या सदनात जर जागा फुकटची मिळणार असेल तर रस्ता करण्यात येईल अशा प्रकारे उत्तर देऊन रस्ते होणार नाहीत. या रस्त्याच्या संदर्भात शासनाने आतापर्यंत काही तरी प्रयत्न केले आहेत काय ? याचा खुलासा मंत्री महोदयांनी करावा.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :10605.....**

श्री. अनंत तरे .....

रस्त्याला लागणारी जागा उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात शासनाने काही प्रयत्न केलेले आहेत काय?

श्री. छगन भुजबळ :सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले आहे की, हा आमच्या योजनेतील रस्ता नाही. या रस्त्याला पर्यायी रस्ता उपलब्ध आहे. जागा उपलब्ध होण्यामध्ये ब-याच अडचणी असतात. हा जो रस्ता आहे तो कोकणातील असून कोकणामध्ये ब-याच मोठया प्रमाणात बागा असतात. या ठिकाणचे शेतकरी रस्त्यासाठी बागा जाऊ देत नाही. या रस्त्यासाठी योजना नसतांना आता आम्हाला या रस्त्यासाठी जागा उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न करावे लागतील तसेच यासाठी अधिक खर्च करावा लागेल या सर्व गोष्टीचा विचार आम्हाला करावा लागतो. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकणी यांनी या रस्त्यासाठी जागा उपलब्ध करुन दिल्यानंतर पुढच्या ज्या स्टेप्स आहेत त्या स्टेप्स आम्हाला उचलाव्या लागतील. कोकणामध्ये बांगाचे मोठया प्रमाणात आकर्षण असते. जमिनीसाठी कोर्ट कचे-यामध्ये सुध्दा त्यांना जावे लागते. आपल्याला या रस्त्याचे काम कोठल्या ना कोठल्या मार्गातून करता येईल. सन्माननीय सदस्यांनी जागा उपलब्ध करुन दिली तर शासन ही जागा त्वरीत ॲक्वायर करेल. हा रस्ता व्हावा ही शासनाची प्रामाणिक इच्छा आहे. या ठिकाणी पर्यायी रस्ता असल्यामुळे या नवीन रस्त्याकडे कोणी लक्ष दिलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकणी यांचा तसेच इतर सन्माननीय सदस्यांचा या रस्त्याच्या संदर्भातील आग्रह पाहता हा रस्ता तयार करण्यासाठी मला डबल लक्ष देऊन काम करावे लागणार आहे. तसेच सन्माननीय सदस्य आमदार फंडाचा रस्त्यासाठी उपयोग करुन देतील अशी अपेक्षा करतो.

---------------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत**

**(३) * ९२७२ श्री. विनोद तावडे , श्री. मधुकर चव्हाण , श्री. नितीन गडकरी , श्रीमती कांता नलावडे , डॉ. अशोक मोडक , श्री. रामनाथ मोते , श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. राजेंद्र जैन , श्री. सदाशिवराव पोळ , प्रा. फौजीया खान , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जगन्नाथ शेवाळे , डॉ. वसंत पवार : तारांकित प्रश्न क्रमाक ८२७६ ला दिनांक ११ जुलै, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय नियोजन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ आवश्यक असल्याचे केंद्र शासनास कळविण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केव्हा व त्यानंतर याबाबत कोणता पाठपुरावा करण्यात आला वा येत आहे ?

**श्री. जयंत पाटील** : (१) होय.
(२) कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ आवश्यक असल्याचे केंद्र शासनास दि. २२ जून, २००५ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी दि. ५-१०-२००५ च्या पत्रात नमूद केले की, महाराष्ट्र मानव विकास अहवाल २००२ व योजना आयोगाने तयार केलेला महाराष्ट्र विकास अहवाल या दोन अहवालातील निष्कर्ष लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने याबाबत विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे मत पुन्हा विचारात घेऊन त्यानंतरच याविषयाबाबत गृह मंत्रालयाकडे सदर प्रस्ताव सादर करावा. त्या अनुषंगाने याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, कोकण विकास मंडळाबद्दल शासन किती उदासिन आहे हे आपल्या लक्षात येईल. संदर्भात 15 एप्रिल रोजी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, अरविंद सावंत, अनंतर तरे आणि विलास अवचट यांनी तारांकित प्रश्न क्र. 8276 उपस्थित केला होता. कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ स्थापन करण्याच्या प्रस्तावाचा विचार करण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकारने कार्यवाही केलेली आहे का असा प्रश्न विचारला होता त्याला होय असे उत्तर आलेले होते. दुस-या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांनी सांगितले की, कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ आवश्यक असल्याने केंद्रशासनाला कळविण्यात आले आहे असे उत्तर दिले होते. आताच्या प्रश्नाच्या संदर्भात कोकणातील जनतेची टिंगल टवाळी करण्याचे उत्तर आपण दिलेले आहे. आपण या ठिकाणी पहिल्या प्रश्नाला होय असे उत्तर दिलेले आहे दुस-या प्रश्नाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ आवश्यक असल्याने केंद्र शासनास दि. 22 जून, 2005 च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी

....3

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.: 9227....**

श्री. मधुकर चव्हाण.....

दि. 5.10.2005 च्या पत्रात नमूद केले आहे की, महाराष्ट्र मानव विकास अहवा 2002 व योजना आयोगाने तयार केलेला महाराष्ट्र विकास अहवाल या दोन अहवालातील निष्कर्ष लक्षात घेता महाराष्ट्र शासनाने याबाबत विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे मत पुन्हा विचारात घेऊन त्यानंतरच याविषयाबाबत गृह मंत्रालयाकडे सदर प्रस्ताव सादर करावा". त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 व योजना आयोगाचे निष्कर्ष काय आहेत? तसेच त्यांच्या अनुषंगाने दोन्ही सभागृहाचे मत आजमाविण्यासाठी आपण प्रयत्न केलेले आहे काय? व प्रयत्न केले नसल्यास त्यांची कारणे कोणती व असा प्रयत्न कधी करणार आहात?

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9272...

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करावे या विषयी सन 1989 साली पहिल्यांदा सभागृहात एकमताने ठराव झाला. त्यानंतर अनेक वर्ष पत्रव्यवहार चालला. त्याचा तपशील देण्याची आवश्यता नाही. या बाबतीत दिनांक 9 नोव्हेंबर 2004 च्या दरम्यान संयुक्त सचिव, गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी आपल्याला कळविले आहे की, महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 मध्ये ठाणे, रायगड, सिंधदुर्ग, रत्नागिरी या जिल्हयांचा मानव विकास निर्देशांक विकासाची क्रमवारी लक्षात घेता, मागील 10 वर्षात उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून कोकण विभागाचा इतर दोन वैधानिक विकास मंडळातील भागांपेक्षा जास्त विकास झाल्याने या प्रस्तावाचा पुनर्विचार करावा. केंद्र शासनाच्या या पत्राला अनुसरून आपण त्यांना लगेच कळविले की, असा पुनर्विचार करण्याची राज्य शासनाला गरज वाटत नाही. त्यानंतर पुन्हा गृह मंत्रालयाने दिनांक 3 मे 2005 रोजी आपल्याला कळविले की, कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याचा अद्यापि राज्य शासनाचा प्रस्ताव आहे किंवा कसे ? कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करणे आवश्यक आहे असे केंद्र शासनाला आपण पुन्हा कळविले व हे दिनांक 22 जून 2005 रोजीच्या गृह मंत्रालयाच्या पत्राचा आधार घेऊन कळविले. त्यानंतर संचालक एस.आर., गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक 18 जुलै 2005 रोजी पुन्हा आपल्याला पत्र पाठविले. त्यात त्यांनी नमूद केले आहे की, "कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्याच्या प्रस्तावाबाबत विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे अभिप्राय प्राप्त करून घ्यावेत व त्यानंतर हा प्रस्ताव गृह मंत्रालयाकडे विचारार्थ पाठविण्यात यावा." तथापि, या प्रस्तावावर आपण दिनांक 13 मार्च 1989 साली एकमताने ठराव केलेला आहे. जुलै 2005 च्या अधिवेशनात याबाबत तारांकित प्रश्नसुध्दा आला होता. त्याचा उल्लेख देखील करण्यात आलेला आहे. त्या तारांकित प्रश्नावर सभागृहात चर्चा देखील झालेली आहे. त्यामुळे दोन्ही सभागृहाची पुन्हा मान्यता घेण्याची आवश्यकता नाही, असे आपण 19 ऑगस्ट 2005 रोजी गृह मंत्रालयाला कळविले. त्यासर्वांवर विचार करून पुन्हा संचालक एच.आर., गृह विभाग, भारत सरकार यांनी दिनांक 5 ऑक्टोबर 2005 पत्र पाठविले असून त्यात नमूद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र मानव विकास अहवाल 2002 व योजना आयोगाने प्रसिध्द केलेला





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील...

"महाराष्ट्र विकास अहवाल यांच्या बऱ्याच कालावधीपूर्वी महाराष्ट्र विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी कोकणासाठी स्वतंत्र विकास मंडळ स्थापन करण्याचा ठराव मंजूर केलेला आहे. तथापि, या दोन अहवालातील निष्कर्ष लक्षात घेता, महाराष्ट्र शासनाने याबाबत विधान मंडळाच्या दोन्ही सभागृहाचे मत पुन्हा विचारात घेऊन त्यानंतरच या विषयाबाबत गृह मंत्रालयाकडे सदर प्रस्ताव सादर करावा." आपण जनरल ठराव केला तर हा विषय पुन्हा आहे तसाच अडकून राहील. म्हणून लॉजीकल कन्क्ल्यूजन काढणे आवश्यक आहे. कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ आवश्यक आहे म्हणून नियोजन विभागाने काम केलेले आहे. मंत्रिमंडळासमोर हा प्रस्ताव काही दिवसात येणार आहे. त्यानंतर दोन्ही सभागृहामध्ये केंद्रीय गृह मंत्रालयाने पुन्हा बॅक रेफरन्ससाठी ठराव पाठवून देऊ नये म्हणून सदर ठराव येणार आहे. यासंबंधी मी स्वत: दिल्लीला जाऊन संबंधितांना भेटून आलेलो आहे. मी त्यांना असे सुध्दा सांगितले की, असा पत्रव्यवहार किती काळ चालणार ? आम्हाला कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ करावयाचे आहे यात दुमत नाही. सभागृहामध्ये हा विषय न येणे हे शक्यच नाही. हे देखील मी त्यांना समजावून सांगितले. तरी त्यांनी सांगितले की, आम्ही जे दोन संदर्भ दिलेले आहेत, त्यानुसार एकमताने मंजूर झालेला ठराव आणून दाखववा. आपण सभागृहामध्ये एकमताने ठराव मंजूर करून घेऊ शकतो. तसा ठराव आज मांडला तरी तो मंजूर होईल, हे मला देखील मान्य आहे. परंतु, लॉजीकली सभागृहासमोर ठराव मांडला किंवा कसे असे प्रमुख मुद्दे आहेत, ते संकलित करून व्यवस्थित असा प्रस्ताव करून मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन सभागृहासमोर कोणत्या स्वरूपात यायचे हे आम्ही ठरवणार आहोत आणि लवकरात लवकर त्यावर कारवाई देखील होईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, गृह मंत्रालयाने काही मुद्दे कळविलेले आहे, असे मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे. केंद्र शासनाने मानव विकास अहवाल 2002 आणि महाराष्ट्र विकास अहवाल यांचा आधार घेतलेला आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ D/ RJW/ पूर्वी श्री.ओटवणेकर..... 12:30

ता.प्र.क्र.9272......

प्रा.बी.टी.देशमुख.........

शासनातर्फे त्याची तयारी चालू आहे. माझी आपणास विनंती आहे की, त्यांनी केलेल्या युक्तीवादाला उत्तर देण्याची आवश्यकता आहे. आपण मानव विकास अहवालाच्या प्रती सर्वांना दिलेल्या आहेत. आम्ही सुध्दा त्याबाबत अभ्यास करुन आपल्याकडे मुद्दे देऊ. माझे म्हणणे असे आहे की, त्यांनी जे म्हणणे मांडलेले आहे ते कसे बिनचूक नाही हे दाखवून देण्याची गरज आहे. महाराष्ट्र विकास अहवाल पंधरा दिवसांत तयार झालेला आहे. ज्याप्रमाणे महाराष्ट्र मानव विकास अहवालाच्या प्रती सर्व सन्माननीय सदस्यांना देण्यात आल्या आहेत त्याप्रमाणे महाराष्ट्र विकास अहवालाच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील काय ? म्हणजे त्या अहवालाचा अभ्यास करुन सन्माननीय सदस्यांना चर्चेमध्ये सहभागी होता येईल. तेव्हा आपण या प्रती उपलब्ध करुन देणार आहात काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र विकास अहवाल हा योजना आयोगाने आणि काही इंडेपन्डन्ट संस्थांकडून करुन घेतलेला आहे. त्या संस्थांकडून आणि योजना आयोगाकडून या प्रती मिळवून सर्व सन्माननीय सदस्यांना हे अधिवेशन संपण्यापूर्वी उपलब्ध करुन देण्यात येतील. केंद्र सरकारने प्रत्येक राज्यांच्या अशा पुस्तिका काढलेल्या आहेत. महाराष्ट्र राज्याचा सन 2003, 2002 व 2001 मध्ये जो अहवाल केला त्यातील ते रेफरसेन्स आहेत. आपला जो अहवाल आहे त्याचे रेफरसेन्स 2002, 2001, 1999 आणि 1998 दरम्यानचे आहेत. आपणास ही सर्व माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, आता माननीय मंत्रिमहोदयांनी जो उल्लेख केला त्याकडे मी लक्ष वेधू इच्छितो. दुर्दैवाने सगळीकडे असा गैरसमज पसरलेला आहे की, इतर विभागांच्या मानाने कोकणचा अनुशेष नाही. दांडेकर समितीच्या अहवालापासून हा गैरसमज आहे. मला भिती वाटते की, कदाचित त्या निष्कर्षांची येथे पुनरुक्ती झाली असावी. सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यात दोन धरणे आहेत. रायगड जिल्ह्यात धरणे आहेत. तेव्हा याठिकाणी जलसिंचनाची आवश्यकता काय ? परंतु या दोन्ही धरणातील पाणी मुंबई शहराला पुरविले जाते. ज्या शहापूर तालुक्यात धरण आहे तेथील माणसे पाण्यासाठी तहानलेली आहेत. परंतु त्यांच्याकडे लक्ष दिले जात नाही. तेव्हा आपण या शंकेचे निरसन केले आहे काय ? हा गैरसमज दूर करण्याची आवश्यकता आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9272......

डॉ.अशोक मोडक........

आपण जर निरसन केले असेल तर मला आनंद आहे. अन्यथा सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख म्हणाले त्याप्रमाणे आम्हा सर्वांना विश्वासात घेऊन यासंबंधी आवश्यकता असेल तर त्यांचे प्रबोधन करण्याची गरज आहे हे आपल्याला मान्य आहे काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, बराच जुना पत्र व्यवहार आहे. अलिकडच्या कालावधीत झालेल्या पत्रव्यवहारात त्यांनी मागच्या काही काळात या दोन अहवालाकडे लक्ष वेधलेले आहे. वस्तुस्थिती ही आहे की हा जो बॅकलॉग वर्कआऊट केलेला आहे तो फिजिकल बॅकलॉग आहे आणि आता त्यांचे लक्ष मानव विकास निर्देशांकाकडे गेलेले आहे. या दोन्ही डिफरंट गोष्टी आहेत. हे मी त्यांना समजावून सांगितलेले आहे. आमची अपेक्षा अशी होती की, पुन्हा बॅक रेफरन्स येऊ नये. पण आता त्यांनी असे सांगितलेले आहे की, कागदावर सर्व अहवाल एकत्रित करुन असे लक्षात येते की, कोकणातील विकास हा इतर विभागांपेक्षा जास्त आहे, या संदर्भातील आकडेवारी त्यांनी दिलेली आहे. त्यामुळे आता जी काही नवीन माहिती समोर आलेली आहे ती लक्षात घेऊन आपण हे व्यवस्थितपणाने सभागृहात मंजूर करावे अशी आमची अपेक्षा आहे. कारण यासंदर्भात आपण बराच पत्र व्यवहार केला, अनेकवेळा ठराव देखील केले. त्यामुळे यावेळी आपल्याला लॉजिकल असा ठराव मांडला पाहिजे. सभागृहात ज्या सूचना करण्यात येतील त्या समाविष्ट करुन त्याचा फायनल डाफ्ट तयार करु आणि सभागृहाच्या एकमताने पाठवू अशी आमची भूमिका आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ RJW/ D/ पूर्वी श्री.अजित.... 12:35

ता.प्र.क्र.9272....

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, उर्वरित वैधानिक विकास महामंडळामध्ये खऱ्या अर्थाने कोकण आणि खानदेशचा समावेश आहे. या महामंडळामध्ये जो अनुशेष आहे तो उर्वरित महाराष्ट्राचा आहे. खानदेशच्या लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे की, खानदेशसाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंहामंडळ करण्यात यावे. महाराष्ट्रात दरडोई उत्पन्नाचा विचार केला तर, सर्वात कमी उत्पन्न असलेला खानदेश विभागातील नंदुरबार जिल्हा 35 व्या क्रमांकावर आहे. उर्वरित वैधानिक विकास महामंडळामध्ये जो अनुशेष आहे तो कोकण आणि खान्देशचा आहे. म्हणून खानदेशसाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ स्थापन करण्याबाबत सर्व पक्षांनी एकमताने जी विनंती केली आहे ती आपण मान्य करणार आहात काय ? आणि विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये कोकण वैधानिक विकास मंडळाच्या प्रस्तावाबरोबर खानदेशचा सुध्दा प्रस्ताव मांडणार आहात काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या मताशी आणि भावनांशी मी पूर्णत: सहमत आहे. खानदेशातील धुळे, नंदुरबार या परिसरात अनेक समस्या आणि अनुशेष आहे याबद्दल दुमत नाही. 1989 सालापासून कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ मागण्याचा जो प्रयत्न आहे त्या अनुषंगाने हा प्रश्न या ठिकाणी उपस्थित झाला आहे. परंतु मी त्यांना सांगू इच्छितो की, खानदेशसाठी स्वतंत्र वैधानिक विकास महामंडळ करण्यासंदर्भात स्वतंत्रपणे केस तयार करावी लागेल आणि त्याबाबत स्वतंत्र विचार करावा लागेल. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, या ठिकाणी कोकण वैधानिक विकास मंडळाबाबत प्रश्न सुरु आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी खानदेशचा प्रश्न इंडीपेंडंटली मांडावा.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : महोदय, कोकणचा ठराव करताना खानदेशच्या वैधानिक विकास मंडळाचा सुध्दा ठराव एकत्रितपणे करावा. नाहीतर पुन्हा आम्हाला अनेक वर्षे यासाठी ठरावाची वाट पाहावी लागेल.

श्री.जयंत पाटील : महोदय, खानदेश भागात मागासलेपणा आहे या सन्माननीय सदस्यांच्या भावनेशी मी पूर्णपणे सहमत आहे. कोकणसाठी वैधानिक विकास मंडळाचा ठराव करताना आपण त्याला काही ऑगमेंटेशन केले तर दोन्ही क्लब होऊन आपण अडचणीत येऊ नये म्हणून मी आपल्याला सांगत आहे. मी सन्माननीय सदस्यांची माहिती तपासून पाहतो. ती लॉजिकल असेल तर जरुर विचार केला जाईल.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9272....

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासेवार माहिती दिल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देऊ इच्छितो. मानवी विकास निर्देशांकानुसार काय गडबड झाली आहे मी सांगू इच्छितो. या निर्देशांकासाठी जे निकष ठरविले गेले, त्यामुळेच खरी अडचण निर्माण झाली आहे. सन्माननीय सदस्य श्री.मोडक यांनी शहापूर तालुक्यातील दोन धरणांचा उल्लेख केला. त्या तालुक्यात धरण असताना सुध्दा त्याचे पाणी मुंबईला मिळते. मुंबई उपनगर जिल्हयाचा क्र.1, मुंबई शहर जिल्हा, त्यानंतर ठाणे आणि त्यानंतर बाकीच्या भागांचा क्रमांक लागतो. त्यात रायगड जिल्हा 6 व्या, सिंधुदुर्ग 9 व्या आणि रत्नागिरी जिल्हा 17 व्या क्रमांकावर आहे. बाकीच्या दरडोई उत्पन्नाच्या जिल्हयात मुंबई उपनगर, मुंबई शहर, त्यानंतर ठाणे 4 थ्या क्रमांकावर, सिंधुदुर्ग 7 व्या क्रमांकावर आहे. मानवी विकास निर्देशांकामध्येच हे असल्यामुळे केंद्र सरकार आपल्याला अडचण निर्माण करीत आहे. त्यामुळे मानवी विकास निर्देशांकाचे जे निकष आहेत ते प्रथम बदलले पाहिजेत. रस्ता आहे म्हणून विकास झाला, साक्षरता आहे म्हणून विकास झाला असे म्हणून भागणार नाही. आर्थिकदृष्टया अत्यंत मागासलेले असे अनेक जिल्हे आहेत. त्यामुळे मानवी विकास निर्देशांकाचे निकष बदलण्यासंदर्भात प्रस्ताव प्रथम आला पाहिजे. आताच्या मानवी विकास निर्देशांकानुसार कोकणातील सर्व जिल्हे वरच्या क्रमांकावर येतील आणि पुन्हा केंद्र सरकार पूवीच्याच पध्दतीने उत्तर देईल. त्यामुळे मुळात मानवी विकास निर्देशांकाचे निकष बदलण्याचे काम शासन करणार आहे काय ?

श्री.जयंत पाटील : महोदय, मानवी विकास निर्देशांकाचे निकष युएनडीपी ने ठरविलेले आहेत व त्यांच्या मेथॉडॉलॉजी प्रमाणे मानवी विकास निर्देशांक वर्कआऊट केले असून, मुंबई बेस धरुन ते केलेले आहे. मुंबई आणि मुंबईचे उपनगर हे मॅक्झीमम लेव्हलला असल्यामुळे महाराष्ट्रातील ॲव्हरेजचे प्रमाण 0.8 टक्के येते.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र...9272 श्री.जयंत पाटील..

त्यामध्ये 1 पासून 2.2 पर्यत हे सगळे पॉईन्टस आहेत.त्याप्रमाणे 1 पासून खाली पॉईन्टस आहेत. अनेक मागासलेले जिल्हे त्यामध्ये येतात.. मानव विकासाचा निर्देशांक आणि बॅकलॉग या दोन कनसेप्टस आहेत. या बाबतीत सुध्दा मी त्यांना सांगितलेले आहे. वैधानिक विकास मंडळ निर्माण करण्यात आलेले आहे .त्यामध्ये मानव विकासाचा कनसेप्ट आहेच. त्याबाबतीत काही दुमत नाही परंतु दांडेकर समितीने फिजिकल बॅकलॉग काढला होता. त्यानंतर इंडिकेटर बॅकलॉग समितीने तो वर्क आऊट केला होता आणि त्या बेसिसवर आपले काम चालले आहे.त्यामुळे वैधानिक विकास मंडळ आवश्यक आहे अशी आपली भूमिका आहे. मानव विकासाच्या निर्देशांकात हेल्थ एज्युकेशन आणि पर कॅपिटा इनकम याचा विचार केलेला आहे .पर कॅपिटा इनकम हे लाईव्हलीहूड जेथे उपलब्ध आहे त्यावर अवलंबून आहे. मुंबई, ठाण्या जवळ .त्याचबरोबर रायगड जवळील इन्डस्ट्रीज जेथे आहे तेथे लाईव्हलीहूड ॲव्हेलेबल आहे. एज्युकेशन आणि हेल्थ याबाबतीत सांगावयाचे म्हटले तर एज्युकेशनची लेव्हल सिंधुदूर्ग जिल्हयात फार चांगली आहे त्यामुळे मानवी विकासाच्या निर्देशांकामध्ये हे जिल्हे वर दिसून येतात.परंतु वैधानिक विकास मंडळ स्थापन करण्या मागचा आपला उद्देश काय आहे ? फिजिकल बॅकलॉग विचारात घेऊन राज्याचा एकत्रित साधन संपत्तीचा वाटा त्या भागाला व्यवस्थित मिळून त्या भागाची फिजिकल डेव्हलपमेन्ट व्हावी असा आपला उद्देश आहे. त्याचा आणि मानव विकास निर्देशांकाचा इनडायरेक्ट ंसबंध आहे. तो संबंध नाही असे मी म्हणणार नाही. परंतु त्याचा आणि याचा तातडीने संबंध लावणे हे मला व्यक्तिगत योग्य वाटत नाही.

श्री.अरविंद सावंत : मानवी विकास निर्देशांकाचे निकष आपण बदलणार आहात काय ?

श्री.जयंत पाटील : हे निकष आपण बदलू शकत नाही. यु.एन.डी.पी. च्या माध्यमातून ते निकष तयार केलेले आहेत त्यामुळे केन्द्र सरकारचा या निकषाशी काहीही संबंध नाहीा.

प्रा.बी.टी.देशमुख : निकष बदलण्याच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी खुलासा केलेला आहे आणि ती गोष्ट योग्य आहे. कारण युनोच्या नेतृत्वाखाली यु.एन.डी.पी. ने संपूर्ण जगासाठी विकासाची व्याख्या तसेच मापदंड सुध्दा ठरविलेले आहे आणि या कामासाठी मोठा निधी तेच उपलब्ध करुन देतात. मानवी विकास किती झाला आहे हे तपासून पहावे असे त्यांनी सांगितले आहे त्यामुळे केन्द्र सरकारलासुध्दा या निकषामध्ये बदल करता येईल किंवा नाही

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र...9272 प्रा.बी.टी.देशमुख...

याबद्दल व्यक्तिशः माझ्या मनात शंका आहे. कारण यु.एन.डी.पी. ने हे निकष ठरविलेले आहे. या बाबतीत माझे असे म्हणणे आहे की, 1989 मध्ये पहिल्यांदा आपण विनंती केली होती त्यामध्ये . कोकणाच्या दृष्टीने यामध्ये काहीही बदल झालेले नाहीत .जो काही बदल झाला आहे तो निगेटीव्ह बदला झाला आहे.जलसिंचनाच्या बाबतीत राज्य सरासरीच्या रत्नागिरी जिल्हा 1982 साली 43 हजार हेक्टरने मागे होता.1990 मध्ये 54हजार हेक्टरने मागे होता. 1992 मध्ये 56 हजार हेक्टरने मागे होता. 1994 मध्ये 63 हजार हेक्टरने मागे होता .2004 च्या सरासरीवरसुध्दा तो तेवढाच मागे आहे.. या संदर्भात त्यांना युक्तिवादाने उत्तर देण्याची गरज आहे.असे माझे म्हणणे आहे.त्या दृष्टीने आपण तयारी करीत आहातच. जो दुसरा अहवाल आहे तो अहवाल वितरित करण्याच्या बाबतीत आपण मघाशी सांगितलेले आहे. परंतु मघाशी प्रश्न विचारत असतांना माझा एक भाग विचारावयाचा राहून गेलेला आहे .या संदर्भात आतापर्यन्त त्यांनी आपल्याला जे काही कळविलेले आहे तो संपूर्ण पत्रव्यवहार आम्हाला उपलब्ध करुन देण्यात यावा .जर तो देण्यामध्ये काही अडचण असेल तर त्यांनी आपल्याला निगेटीव्ह अर्थाने जे काही मुद्दे कळविलेले आहेत त्याची समरी करुन दिली तरी त्यांना उत्तर देण्याच्या कामात सर्व सन्माननीय सदस्य आपल्याला मदत करु शकतील तेव्हा तसे आपण करणार आहात काय ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, त्यांना उत्तर देण्याची स्टेज आता संपली आहे. त्यांना आपण यापूर्वीच उत्तर दिलेले आहे. त्यांनी आपल्याला असे सांगितले आहे की, तुमच्या समोर यासबंधीची आकडेवारी आहे तरी सुध्दा या बाबतीत दोन्ही सभागृहाचे आम्हाला मत कळवावे.त्यामुळे दोन्ही सभागृहाचे मत जाणून घेतल्यानंतर जो ड्राफट तयार केला जाईल त्यावेळी मी आपल्याबरोबर चर्चा करीन.तो ड्राप-ट आम्ही आपल्याला दाखवू. हा ड्रापट कसा असला पाहिजे याबाबतीत मी मघाशी दोन मुद्दे मांडलेले आहेत. मानवी विकासाचा निर्देशांक आणि आपला जो उद्देश आहे त्यामध्ये जास्त गल्लत न करता हे करणे कसे आवश्यक आहे यावरच भर देणे एवढाच मुद्दा आहे.तो सुटसुटीत असावा. एकमताने ड्राफट मान्य केला तर तो त्यांच्याकडे लवकर जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही





ता.प्र.क्र...9272

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, " त्या अनुषंगाने गृह मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक 5.10.2005 च्या पत्रान्वये कळविलेले आहे की, दोन्ही सभागृहाचे मत घेऊन तो प्रस्ताव सादर करण्यात यावा." त्यांनी आपल्याला कळवून आता दोन महिने होऊन गेलेले आहेत.तेव्हा त्या संदर्भात आपण प्रस्ताव तयार केलेला आहे काय ? केला असेल तर या अधिवेशनामध्ये आपण तो प्रस्ताव मांडणार आहात काय ?हा प्रस्ताव तातडीने आणला पाहिजे.

श्री.जयंत पाटील : 5 ऑक्टोबर 2005 रोजी त्यांनी आपल्याला कळविल्यानंतर त्या प्रस्तावाच्या बाबतीत नॉर्मल उत्तर द्यावयाचे असेल तर छोटासा ठराव चटकन करुन त्यांच्याकडे पाठविला तर त्यामुळे सर्वाचे समाधान होईल परंतु यु.एन.डी.पी.ने जी मेथॉडॉलॉजी घालून दिलेली आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत पाटील (पुढे चालू...) ता.प्र.क्र.9272 ...

त्यामध्ये मानव विकासाचा निर्देशांक काढण्याची जी प्रोसिजर आहे ती आणि दांडेकर समिती आणि इंडिकेटर समितीने काढलेला जो निर्देशांक आहे तो लक्षात घेता जो उर्वरित शिल्लक राहिलेला बॅकलॉग आहे तो भरून काढण्याच्या दृष्टीने आपल्याला आता एक लॉजिकल कन्क्लूजन काढणारा प्रस्ताव आम्ही तयार केलेला आहे. मला वाटते की, काही गडबड न करता तो लवकरात लवकर येथे आण्याचा आमचा प्रयत्न आहे.

श्री. मधुकर चव्हाण : मग तो प्रस्ताव याच अधिवेशनात आपण आणू शकता. वाटल्यास त्यासाठी आपण आपल्या अधिकाऱ्यांना 5-7 दिवस बसून तो मसुदा तयार करण्यास सांगू शकता. पण तसे प्रयत्न होत असल्याचे आपल्या बोलण्यातून ध्वनित होत नाही, ही एक प्रकारे उपेक्षाच आहे. तेव्हा तुम्हाला हे करावयाचे नाही का ? तुमच्याबद्दल आमच्या मनामध्ये काहीही शंका नाहीत, पण आपल्या अशा वागणुकीमुळे शंकेला वाव राहतो, हे आपण लक्षात घ्यावे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मी या अधिवेशनामध्ये हा प्रस्ताव आणणार नाही असे म्हटलेले नाही. यापूर्वी सभागृहाने दोन तीन वेळा प्रस्ताव संमत करून त्यांनाकळविले आहे. आपण सातत्याने त्यांना त्याच त्या मुद्यांवर कम्युनिकेट केलेले आहे. तेव्हा आता पुन्हा तोच मुद्दा पाठविण्यात काही अर्थ नाही असे मला वाटते आणि म्हणूनच आहे त्यापेक्षा वेगळे म्हणणे मांडून त्यांना पटविण्याचा आपला प्रयत्न राहिला पाहिजे. ...

श्री. मधुकर चव्हाण : आपण दुसरे मुद्दे देणार आहेत हे बरोबर आहे. पण त्यासाठी किती वेळ आपल्याला लागणार आहे ? अगोदरच दोन महिने होऊन गेले आहेत. ...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मानव विकास निर्देशांकाच्या बाबतीत ...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या ठिकाणी प्रश्न असा आहे की, ऑक्टोबर मध्ये त्यांच्याकडून यांना पत्र आले आणि त्याबाबतचा सारा पत्रव्यवहार आपण येथे सभागृहात प्रामाणिकपणे ठेवला आहे. त्यांची ऑब्जेक्शन्स काय आहेत हेही आपल्याला माहिती आहेत. तेव्हा त्यासंबंधात आपली भूमिका काय आहे ते आपल्या अधिकाऱ्यांना सांगून त्यांना यासाठी वाटल्यास 7-8 दिवस रात्रंदिवस बसवून घ्या, त्यांना आपण सांगा की, आम्हाला या अधिवेशनामध्ये हा ठराव पास करावयाचा आहे तेव्हा तो इतक्या दिवसात तयार व्हायलाच पाहिजे. अन्यथा यासाठी

...... जे 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे चालू..) ता.प्र.क्र. 9272 ...

आणखी किती वेळ लागणार आहे ? या अधिवेशनामध्ये आपल्याला या संबंधीचा ठराव आणण्यात काय अडचण आहे ? 2006 च्या अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये आपण हा ठराव आणणार आहात का ? आपण याबाबत निश्चित काही सांगत नसल्याने आपल्या हेतूविषयी शंका घेण्यास जागा राहते आहे. माझे म्हणणे असे आहे की, आपण आपल्या अधिकाऱ्यांना या संदर्भात स्पष्ट निर्देश द्यावेत की, या अधिवेशनामध्ये हा ठराव आम्हाला संमत करून घ्यावयाचा आहे, त्याप्रमाणे काम व्हायला पाहिजे. तर तसे आपण करणार आहात का ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्यांनी पूर्णपणे बोलू दिले तरच मी सांगू शकेन की, यामध्ये आम्ही नेमके काय केले आहे आणि काय काय करतो आहोत, व काय करणार आहोत. सन्माननीय सदस्य जी मागणी करीत आहे त्याबाबतीत मी काही नकार दिलेला नाही. मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, आपल्याकडे मंत्रिमंडळासमोर हा प्रस्ताव येण्याच्या दृष्टीने तयार झालेला आहे आणि तो मंत्रिमंडळाच्या आजच्या किंवा जास्तीत जास्त पुढील बैठकीमध्ये येऊन त्यास मंजुरी घेतली जाईल. मंत्रिमंडळाने एखादी गोष्ट पूर्णपणे मान्य केल्यानंतर.. आपण म्हटले की, 5-7 दिवस बसून वर्कआऊट करा म्हणून.. तर मी आपल्याला सांगतो की, ऑक्टोबर मध्ये त्यांच्याकडून पत्र आल्यानंतर यामध्ये लॉजिकल कन्क्लूजन जी काही आहत ती आम्ही वर्कआऊट केलेली आहेत, त्या नुसार एक प्रस्ताव देखील आम्ही तयार केलेला आहे. अर्थात त्यासाठी थोडा अधिक वेळ लागला आहे हे मान्य. पण दरम्यान मी स्वत: दिल्लीला जाऊन सांगितले आहे की, हे पत्र जे आपण पाठविले आहे ते बरोबर नाही. आतापर्यंत आम्ही सगळ्यांनी एकमतानेच आपल्याकडे ठराव करून मागणी केलेली आहे. तेव्हा आताही मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रस्तावाला मान्यता घेतल्यानंतर तो तातडीने याच अधिवेशनामध्ये आपल्यापुढे येण्यास देखील काही अडचण नाही. मात्र हे करीत असताना सन्माननीय सदस्यांनी आता येथे जे मुद्दे मांडले आहेत, त्यांनाही आपण विश्वासात घेऊन ते मुद्दे त्या प्रस्तावात घेण्याचाही आपण प्रयत्न करू.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या ठिकाणी या प्रश्नावर बऱ्याच वेळपासून चर्चा सुरू आहे. आताच येथे माननीय मंत्री महोदयांनी यासंबंधातील पत्रव्यवहार काय आहे तो सांगितला आहे. सभापती महोदय, 1989 साली दोन्ही सभागृहांनी ठराव केल्याचे आपणच येथे सांगितले

...... जे 3 ..



KBS/ RJW/ D/ श्री.गायकवाड नंतर --- 12:45

आहे. म्हणजे 1989 ते आज 2005 डिसेंबर आहे, 16 वर्षांचा प्रदीर्घ काळ मध्ये गेला आहे. इतकी वर्षे ही प्रक्रिया सुरू आहे आणि असे असताना आता ऑक्टोबरमध्ये त्यांना पत्र आल्याचे मंत्र्यांनी सांगितले. केंद्र सरकारच्या मनामध्ये काय आहे ते समजायला मार्ग नाही. पण एखाद्या गोष्टीसाठी 16-16 वर्षे प्रोसेस चालणार असेल तर सरकार या संबंधात किती गंभीर आहे हे लक्षात येते. तेव्हा आमची आग्रहाची विनंती आहे की, तुम्ही असा सर्व प्रस्ताव तयार करून तो कॅबिनेटपुढे ठेवला आहे, आजचे कॅबिनेटची बैठक आहे अशी आमची माहिती आहे. तेव्हा आजच्या बैठकीमध्ये तो प्रस्ताव मंजूर करून घेऊन याच अधिवेशनामध्ये त्या ठरावावर दोन्ही सभागृहांची मान्यता आपण घेणार काय ? तशी ती घ्यावी असा आमचा आग्रह आहे.

( यानंतर श्री.सरफरे .... के 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9272....

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, आपल्या आग्रहाचा प्रश्न नाही. माझाही तोच प्रयत्न आहे...

डॉ. दीपक सावंत : तरमग आपण "हो" म्हणा...

श्री. जयंत पाटील : माननीय सदस्यांकडून नवीन सूचना आली आहे. आज संध्याकाळी मंत्रिमंडळाची बैठक आहे. तेव्हा आम्ही मंत्रिमंडळापुढे....

(विरोधी पक्षाचे अनेक मा. सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलू लागतात.)

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे....

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी माझे उत्तर ऐकल्यानंतर त्यांना हरकतीचा मुद्दा उपस्थित करावा लागणार नाही. माननीय सदस्यांच्या मनात काय आहे हे माझ्या लक्षात आले आहे. आजच्या संध्याकाळच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये ठराव यावा अशी आपली अपेक्षा आहे. शेवटी आपण जे प्रारुप करणार आहोत त्यामध्ये चूक राहू नये यासाठी माननीय सदस्य श्री. देशमुख साहेबांनी मुद्दे मांडले आहेत म्हणून त्यांच्याशी व काही माननीय सदस्यांशी मंत्रिमंडळामध्ये ठराव मंजूर होऊन आल्यानंतर व तो सभागृहामध्ये येण्यापूर्वी त्यांचेशी चर्चा करण्यात येईल. आणि या आठवडयामध्ये हा ठराव सभागृहासमोर आणण्यात येईल. त्या ठरावाला आपण एकमताने मंजूरी द्याल, त्याबद्दल माझ्या मनात शंका नाही. आपली मंजूरी यापूर्वी अनेक वेळा एकमताने मिळाली आहे. यामध्ये महत्वाची बाब अशी की, जो मसुदा तयार करावयाचा आहे तो रिजेक्ट होणार नाही, यासाठी आपल्या सर्वांच्या बुध्दिमत्तेचा वापर करुन सभागृहासमोर तो ठराव आणण्यात येईल.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पालघर, बोईसर मनोर तसेच वसई (जि.ठाणे) या परिसरात**

**घरफोडीच्या घटनांमध्ये झालेली वाढ**

**(४) * ११४२६ श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , श्री. विनायकराव मेटे , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. फौजीया खान , श्री. गुरुनाथ कुलकर्णी , श्री. वसंतराव चव्हाण , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. सदाशिवराव पोळ , श्री. वसंतराव काळे :** सन्माननीय उप मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर, बोईसर, मनोर तसेच वसई (जि.ठाणे) या परिसरात माहे जून,जुलै, ऑगस्ट,२००५ मध्ये मोठया प्रमाणावर घरफोडया झाल्याच्या घटना घडल्या आहेत हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आतापर्यंत किती घरफोडया झाल्या आहेत,

(३) असल्यास, याप्रकरणी किती दरोडेखोरांना अटक करण्यात आली आहे व त्यांच्याकडून किती रक्कम व ऐवज हस्तगत करण्यात आला आहे,

(४) उक्त जिल्हयात दरोडयाच्या घटनांना आळा बसण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे?

**श्री. सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर. आर. पाटील यांच्याकरिता** : (१) होय. काही प्रमाणात घरफोडयाच्या घटना घडल्या आहेत.

(२) जून, २००५ ते ऑगस्ट २००५ या कालावधीत सदर परिसरात एकूण १८ घरफोडीचे गुन्हे दाखल झाले आहेत.

(३) चारही पोलीस ठाण्याच्या हद्दीत वरील कालावधीत एकूण १८ गुन्हे दाखल असून १० गुन्हे उघडकीस आलेले आहेत. उघडकीस आलेल्या गुन्ह्यात एकूण २२ गुन्हेगारांना अटक करुन गुन्ह्यात चोरीस गेलेल्या एकूण रु. १०,१३,४०५/- ऐवजापैकी रु. २,५३,३७०/- चा ऐवज हस्तगत करण्यात आला आहे.

(४) अशा घटनांना आळा घालण्यासाठी दरोडा प्रतिबंधक पेट्रोलींग, रात्रौगस्त मध्ये वाढ, नाकाबंदी करुन संशयीत इसम/वाहने चेक करणे इत्यादी प्रतिबंधात्मक उपाय करण्यात येत आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

*** 11426** .....

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, तारांकित प्रश्न क्रमांक 11426...

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, छापल्याप्रमाणे. तथापि, आपल्या अनुमतीने छापील उत्तरामध्ये मी पुढील दुरुस्ती करु इच्छितो.

1) "एकूण 22 गुन्हेगारांना अटक करुन" ऐवजी "एकूण 27 गुन्हेगारांना अटक करुन" असे वाचावे.

2) "रु.2,53,370/-" याऐवजी "रु.2,56,940" असे वाचावे.

श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील : सभापती महोदय, जून, जुलै व ऑगस्ट या तीन महिन्यात 18 घरफोडया झाल्या. त्यातील बऱ्याच घरफोडया दिवसा झालेल्या आहेत. सर्वसामान्य जनतेचे जमा झालेले पैसे खात्यामध्ये जमा करण्यासाठी जात असतांना ते लुटण्यात आले आहेत. त्यामध्ये 4 लाख 63 हजार इतकी रक्कम लुटण्यात आली आहे. एकूण 18 गुन्हयांपैकी 10 गुन्हे उघडकीस आले आहेत. त्यामध्ये पकडण्यात आलेले आरोपी या गुन्हयांशी संबंधित आहेत काय? तसेच, अजून 8 लाख रुपयांची रक्कम वसूल करावयाची आहे, त्याबाबत तपास कोणत्या दिशेने सुरु आहे? ते गुन्हे कधी उघडकीस येणार आहेत?

**(सभापतीस्थानी मा. उपसभापती)**

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : एकूण 18 पैकी 10 गुन्हे उघडकीस आले त्यातील 27 आरोपी पकडण्यात आले हे उत्तरामध्ये सांगितले आहे. आणि त्यामध्ये 2 लाख 56 हजार 940 रुपये वसूल करण्यात आले आहेत. उर्वरित गुन्हयांचा तपास पोलीस यंत्रणेकडून चालू आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. पहिल्या प्रश्नामध्ये विचारण्यात आले आहे की, "मोठया प्रमाणावर घरफोडया झाल्या आहेत काय"? त्याला "होय" असे उत्तर दिले आहे आणि पुढे "काही प्रमाणात घरफोडया झाल्या आहेत" असे म्हटले आहे. म्हणजे किती घरफोडया झाल्यानंतर त्या मोठया प्रमाणात होतील? मोठया प्रमाणात घरफोडया होण्याबाबतचे निकष आपण कसे ठरविले आहेत?

**उपसभापती** : हा हरकतीचा मुद्दा होऊ शकत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

08-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही )K 4

DGS/ RJW/ D/ 12:50

*** 11426** .....

श्री. सिध्दाराम म्हेत्रे : मागील तीन महिन्याच्या काळात घरफोडया झाल्या व अलिकडच्या तीन महिन्यांच्या काळातही घरफोडया झाल्या. मागील तीन महिन्यांपेक्षा अलिकडच्या तीन महिन्याच्या काळात काही घरफोडया झाल्या म्हणून तशाप्रकारचे उत्तर दिले आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/RJW/D पूर्वी श्री.सरफरे . . . . 12:55

ता.प्र.क्र.11426 . . . .

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, ठाणे जिल्हयात नवी मुंबई,पनवेल या परिसरात मोठया प्रमाणात घरफोडया झालेल्या आहेत. मला स्पेसीफीक प्रश्न विचारावयाचा आहे. तेथील पोलीस स्टेशनला भेट दिल्यानंतर तेथील अधिकाऱ्यांनी सांगितले की, पोलिसांचे संख्याबळ वाढवून दिले तर याबाबतीत अधिक चांगल्या प्रकारे काम करण्यात येईल. तर त्याठिकाणी पोलिसांचे संख्याबळ वाढवून देणार आहात का ? असेल तर कधी देणार आहात ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, महाराष्ट्रात मार्च महिन्यापासून पोलीस दला मध्ये 11021 पदे भरण्यात येणार आहेत. ही पदे भरल्यानंतर ताबडतोब येथील पोलिसांचे संख्याबळ वाढवून देण्यात येईल.

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, मीरा-भाईंदर, वसई, पालघर याठिकाणी आणि अजुबाजूच्या परिसरात मागच्या दहा वर्षात लोकसंख्येत वाढ झाली आहे आणि त्याचबरोबर गुन्हेगारीतही वाढ झाली आहे म्हणजे ज्वेलर्सची दुकाने लुटणे, चेन खेचण्याचे प्रकार इ.गुन्हयांमध्ये भरपूर वाढ झाली आहे. या संपूर्ण परिसराच्या किनारपट्टीमध्ये, या परिसरात पोलीस कमिशनरेट निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव बऱ्याच वर्षापासून शासनाकडे प्रलंबित आहे. माझा प्रश्न असा आहे की, हा प्रस्ताव कधी निकालात निघणार आहे ? तसेच हा प्रस्ताव मार्गी लागेपर्यंत पोलिसांच्या संख्येत वाढ होणार आहे का ?

श्री.सिध्दाराम म्हेत्रे : सभापती महोदय, शासनाकडे पोलीस कमिशनरेट संबंधीचा प्रस्ताव आहे आणि त्याला मंजूरी देण्यात येईल. तसेच मी मघाशी सांगितल्याप्रमाणे मार्चपासून 11021 पोलिसांची पदे भरण्यात येणार आहेत. तसेच पोलीस कमिशनरेटबाबतचा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करण्यात येईल.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, महाराष्ट्रात सर्वात जास्त लोकसंख्येची वाढ झालेला जिल्हा म्हणजे ठाणे जिल्हा आहे. प्रश्न असा आहे की, यामुळे पूर्वीच्या निकषावर . . . .

**उपसभापती** : ठाणे जिल्हयात लोकसंख्येची वाढ झाली आहे, त्याला शासन जबाबदार आहे का ?

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, शासनच जबाबदार आहे. कारण एवढे रोजच्या रोज पर राज्यातून लोकांचे लोंढे येत आहे आणि त्यावर काही नियंत्रण नाही. या

. . . .एल-2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.11426 . . . .

श्री.जितेंद्र आव्हाड . . . .

जिल्हयामध्ये पूर्वीच्या निकषानुसार पोलीस स्टेशनची निर्मिती झालेली आहे. पण आता त्या भागातील लोकसंख्या वाढलेली आहे. पोलीस स्टेशनच्या संदर्भातील अनेक प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत. तेव्हा पोलीस स्टेशनमध्ये वाढ करण्याबाबतच्या प्रस्तावाला कधी मंजूरी देणार आहात ? याठिकाणी उत्तरामध्ये सांगितले आहे की, एकूण 27 गुन्हेगार पकडलेले आहेत. तर प्रत्येक दरोडयामध्ये वेगवेगळे गुन्हेगार होते की एखाद-दोन गुन्हयांमध्ये त्यांचा एकत्रितपणे संबंध होता ? दुसरी गोष्ट म्हणजे ज्याप्रमाणे मुंबईमध्ये श्री.साळसकर यांच्या नेतृत्वाखाली ॲन्टी रॉबर्स् स्कॉड नेमण्यात आले आहे. तशा प्रकारचे ॲन्टी रॉबर्स् स्कॉड ठाणे जिल्हयामध्ये आणि इतर ठिकाणी जेथे घरफोडीचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे, तेथे निर्माण करणार आहात का ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मागील पाच वर्षाची आकडेवारी पाहिली तर ठाणे जिल्हयातील चोऱ्या आणि दरोडयांच्या प्रकरणामध्ये यावर्षी घट झालेली आहे. त्याचबरोबर गुन्हयांच्या डिटेक्शनचे प्रमाण पाहिले तर तेही अधिक आहे. मात्र ही गोष्ट खरी आहे की, त्या परिसरातील लोकसंख्या भरपूर वाढलेली आहे आणि अशा वेळी ज्याप्रमाणात गुन्हे वाढत आहेत, त्या प्रमाणात तेथे पोलिसांची संख्या कमी पडत आहे. मघाशी माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्या प्रमाणे 11021 पदे भरण्यात येणार आहेत. गेल्या दहा वर्षात ठाणे जिल्हयाची लोकसंख्या इतर जिल्हयांच्या तुलनेमध्ये ॲबनॉर्मल पध्दतीने वाढलेली आहे. म्हणून त्याप्रमाणात पोलीस स्टेशनची संख्या वाढविण्यात येणार आहे. पण त्याचबरोबर ठाणे जिल्हयातील नागरिकांनी सुध्दा ॲबनॉर्मल पध्दतीने लोकसंख्या वाढणार नाही यादृष्टीने सहकार्य केले पाहिजे.

. . . .एल-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 6 च्या नागपूर ते अमरावती या भागाचे चौपदरीकरण करणे

**(5) * 9282 श्री. रमेश निकोसे, श्री. वसंतराव खोटरे, प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. नानासाहेब बोरस्ते , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे , श्री. जगदिश गुप्ता : तारांकित प्रश्न क्रमांक 5588 ला दिनांक 11 जुलै, 2005 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राष्ट्रीय महामार्ग क्रमांक सहाचा भाग असलेल्या नागपूर - अमरावती रस्त्याचे चौपदरीकरण करण्याच्या कामाची सद्य:स्थिती काय आहे,

(2) या प्रकल्पाच्या नागपूर ते तळेगाव या लांबीच्या कामाच्या निविदा अंतिम करण्यात आल्या हे खरे आहे काय,

(3) खरे असल्यास, कार्यपूर्तीसाठी कंत्राटदाराला किती मुदत देण्यात आली आहे,

(4) राष्ट्रीय राजमार्ग विकास प्रकल्प टप्पा 3 ए अंतर्गत येणाऱ्या या रस्त्याच्या तळेगाव ते अमरावती या भागाच्या चौपदरीकरणाचे काम हाती घेण्यात निश्चित कोणत्या अडचणी आहेत ?

**श्री.रविशेठ पाटील, श्री. छगन भुजबळ यांच्याकरिता** : (1) नागपूर अमरावती या रा.म. क्र. 6 च्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग विकास टप्पा क्रमांक 3 तर्फे हाती घेण्यात येत आहे. यापैकी नागपूर ते तळेगाव या भागाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग विकास टप्पा 3 ए अंतर्गत विकसित केला जात असून याची ठेकेदार निश्चिती झाली असून कार्यादेश देणे बाकी आहे. तळेगाव ते अमरावती या भागाचा विकास भारतीय राष्ट्रीय राजमार्ग विकास टप्पा 3 व अंतर्गत होत असून या कामाचा प्रकल्प अहवाल तयार करण्याच्या निविदा प्राप्त झाल्या असून केंद्र शासनाकडून याची छाननी चालू आहे.

(2) होय, परंतु अद्याप कार्यारंभ आदेश द्यायचे आहेत.

(3) नागपूर ते तळेगांव या भागाचे कार्यारंभ दिनांकापासून 30 महिन्यापर्यंत बांधकाम कालावधी निश्चित झालेला आहे.

(4) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग विकास टप्पा 3 ब अंतर्गत विकसित होणाऱ्या कामांसाठी केंद्र शासनाच्या मंजुरीची गरज आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 9282 ....

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, प्रश्न असा आहे की, नागपूर-तळेगाव या कामाला सुरुवात करणार आहात. हे काम लवकरात लवकर केव्हा होईल ? तसेच रामटेक हे तिर्थस्थानाचे तहसील असलेले गाव आहे. मनसर ते नागपूर रस्ता करण्याचा प्रस्ताव आहे काय ?

(उत्तर आले नाही.)

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, प्रश्न भाग 2 च्या उत्तरात "कार्यारंभ आदेश द्यायचे आहेत",असे म्हटलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, कार्यारंभ आदेश देण्यासाठी निश्चित अडचण काय आहे ? अडचण नसेल तर कार्यारंभ आदेश केव्हा देण्यात येतील ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मी थोडे विस्ताराने उत्तर देतो. कारण हा राष्ट्रीय महामार्ग आहे. सर्वसाधरणपणे राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्प 1 -ज्याला आपण एन.एच.डी.पी. फेज 1 म्हणतो. या अंतर्गत देशातील राष्ट्रीय महामार्गावर सुवर्ण चतुष्कोन योजना कार्यान्वित आहे. यानुसार देशातील चार महानगरींना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या विकासाचे काम चालू आहे. त्यानंतर एन.एच.डी.पी फेज 2 या अंतर्गत देशातील पूर्व-पश्चिम व दक्षिण-उत्तर शहरांना जोडणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाचे काम सुरु आहे. त्यानंतर एन.एच.डी.पी. फेज 3 या अंतर्गत देशातील 71 ठिकाणच्या 10417 कि.मी.लांबीचे चौपदरीकरण करण्याचे केंद्र सरकारने ठरविले आहे. कॅबिनेटमधे देखील याबाबतची मंजुरी दिलेली आहे. एकूण 10417 कि.मी.पैकी महाराष्ट्राच्या वाट्याला खूप प्रयत्न केल्यानंतर चांगला वाटा मिळालेला आहे. त्यामध्ये पनवेल-इंदापूर 84 कि.मी.लांबीचा रस्ता, गोंडे वडपे (ठाणे) हा 100 कि.मी.लांबीचा रस्ता, धुळे-पिंपळगाव हा 118 कि.मी.लांबीचा रस्ता, पिंळगाव-नाशिक-गोंदे हा 60 कि.मी.चा रस्ता, त्यानंतर धुळे ते मध्यप्रदेश सीमा 97 कि.मी.लांबीचा रस्ता, कळंबोली-मुंब्रा (सहा पदरी ) 20 कि.मी. लांबीचा रस्ता, त्यानंतर पुणे-खेड हा 30 कि.मी.लांबीचा रस्ता, त्यानंतर नागपूर ते छतीसगड सीमा हा 136 कि.मी.लांबीचा रस्ता, नागपूर-तळेगांव 90 कि.मी. चा रस्ता, तळेगांव-अमरावती 58 कि.मी. लांबीचा रस्ता, पुणे-सोलापूर 170 कि.मी. लांबीचा रस्ता असे जवळपास 1 हजार कि.मी. रस्ते चौपदरी करण्याच्या संबंधात केंद्र सरकारकडून मंजूरी कळविण्यात यश मिळालेले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. केंद्र सरकार हे रस्ते करत आहे. महाराष्ट्र सरकारचा काही संबंध नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ SBT/ RJW/ MHM/

ता.प्र.क्र. 9282 ....

श्री.छगन भुजबळ : हे रस्ते केंद्र सरकारनेच मंजूर केलेले आहेत. एन.एच.डी.पी. फेज 3 मध्ये जास्तीत जास्त रस्ते व्हावेत, म्हणून आपण प्रयत्न केलेला आहे. यासंबंधीचे मी रेकॉर्ड सादर करायला तयार आहे. एन.एच.डी.पी. फेज 3 मध्ये रस्ते चौपदरी करुन घेण्याच्यादृष्टीने प्रयत्न केलेला आहे. 10 हजार कि.मी. लांबीच्या रस्त्यामध्ये आपल्याकडील जास्तीत जास्त रस्त्यांचा त्यामध्ये समावेश व्हावा, म्हणून केंद्रीय मंत्री माननीय श्री. शरद पवार साहेब, आणि सन्माननीय श्री.टी.बालू यांच्या बरोबर जॉईन्ट बैठका घेतल्या. त्यांनी जास्तीतजास्त रस्ते घेण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले. माझ्याकडे यासंबंधातील रेकॉर्ड आहे, ते सभागृहासमोर ठेवायला तयार आहे. नागपूर-तळेगाव रस्ता फेज 3 अे मध्ये आणि तळेगांव-अमरावती हा रस्ता फेज 3 बी मध्ये घेतला जाणार आहे.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार... 13:05

ता.प्र.क्र.9282....

श्री. छगन भुजबळ...

एनएचडीपी-3(ए) मध्ये अनेक रस्ते बसले. नागपूर आणि तळेगावचा रस्ता बसला. दोन भागामध्ये त्याचे त्यांनी वर्गीकरण केले. नागपूर-कोंडाळी-40 कि.मी. आणि कोंडाळी-तळेगाव-50 कि.मी. या दोन भागाचे टेंडर्स राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्प या संस्थेने मागविले आहे. हया टेंडर्सची स्कुटिनी आणि पुढचा भाग सुरु आहे. फायनान्शिएल क्लोजर आणि इतर सगळे झाल्या नंतर हया रस्त्याच्या प्रत्यक्ष कामाला सुरुवात होईल. तळेगाव ते अमरावती असा या रस्त्याचा जो पुढचा भाग आहे तो एमएचडीपी-3 (बी) मध्ये टाकण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. तो एनएचडीपी-3(ए) मध्येच घ्यावा यासाठी शासन प्रयत्न करीत आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, एका ओळीचा माझा प्रश्न होता. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी माहिती अत्यंत उपयुक्त दिली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. परतु प्रश्न क्रमांक 2 ला "होय, परंतु अद्याप कार्यारंभ आदेश द्यायचे आहेत." असे उत्तर दिलेले आहे.तर हे कार्यारंभ आदेश देण्यामध्ये निश्चित कोणती अडचण आहे आणि अडचण नसेल तर हे आदेश केव्हा देणार?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, हे सगळे कार्यारंभ आदेश किंवा टेंडर्स काढावयाचे आहेत ते सगळे केंद्र सरकारच्या "न्हाई" संस्थेमार्फत मागविले जातात. "न्हाई" ही संस्था त्या टेंडर्सची स्क्रुटिनी करणार आहे. त्यांनी ती स्क्रुटिनी लवकरात लवकर करावी असे राज्य शासनाचे प्रयत्न आहेत. सगळे काम केंद्र शासन करणार आहे. त्यामुळे आपले काम लवकर व्हावे, अधिकचे काम आपल्याकडे व्हावे या साठी शासन प्रयत्नशील आहे.

श्री. नितीन गडकरी: सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा असा आहे की, त्या कामाला कुठलेही ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲप्रुव्हल देण्याचा अधिकार राज्य शासनाला नाही. फायनान्शिएल ॲप्रुव्हल देण्याचा अधिकार नाही.त्याचे टेंडर काढण्याचा अधिकार नाही. त्याच्यावर डिसक्रिएशन वापरण्याचा अधिकार नाही. इनडिपेंडन्टली हे सगळे एनएचएआयने हे सगळे टेकओव्हर केलेले आहे त्या कामाकरित डायरेक्टली आणि इनडायरेक्टली बांधकाम विभाग जबाबदार नाही. मग तुम्ही हा प्रश्न कसा स्वीकारता? मंत्रिमहोदयांनी सांगितले की, या कामासाठी श्री. पवारसाहेबांनी प्रयत्न केले. सभापती महोदय, मी यावर बोलू नये पण या शासनाचा या कामाशी कवडीचाही संबंध नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.9282....

श्री. नितीन गडकरी...

हे पूर्ण काम श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या चतुष्कोण योजनेत मंजूर झालेले आहे. त्यात फर्स्ट फेजमध्ये हा रस्ता नव्हता. सेकंडफेज येण्याच्या आधी ते एनएचएआयकडे ट्रान्स्फर झाले. एनएचएआय ही स्वायत्त बॉडी आहे. या कामाच्या संदर्भात शासनाकडे एक पैशाचा सुध्दा अधिकार नाही. ज्या कामासाठी हे शासन जबाबदार नाही तो प्रश्न आपण स्वीकारला कसा? सभापती महोदय, हे विधानमंडळ नियमाने चालणार की नाही ? एनएचएआयच्या कामाशी डायरेक्टली, इनडायरेक्टली एका पैशाचाही या शासनाचा संबंध नाही. या शासनाला अधिकार नाही. जे जबबदार नाहीत त्यांना प्रश्न विचारावयाचा कशासाठी? असे तर कोणीही सांगेल. मी सुध्दा या कामासाठी प्रयत्न केले आहेत. चार पत्रे मी देखील लिहिली आहेत.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी या ठिकाणी येण्याच्या आधी स्पष्ट सांगितलेले आहे. एनएचडीपी-1 खाली....(अडथळा) मी आगोदरच याबद्दल सांगितलेले आहे.केंद्र सरकार हे काम करीत असले तरी राज्यसरकारने प्रयत्न केल्याशिवाय सगळया गोष्टी ताबडतोबीने होत नाहीत. म्हणून आम्ही जे प्रयत्न केले ते सांगितल्यानंतर सन्माननीय सदस्यांना एवढे वाईट कां वाटावे? आम्ही त्यासाठी प्रयत्न केले. हे काम लवकर व्हावे म्हणून आम्ही मिटिंग घेतल्या. (अडथळा)..

श्री. नितीन गडकरी : चार वर्षापूर्वी ही योजना मंजूर झालेली आहे. तुमचा या योजनेशी काही संबंध नाही. ...

श्री. छगन भुजबळ : एनएचडीपी-3 ही योजना प्राईम मिनिस्टर मनमोहनसिंग यांच्या कॅबिनेटने मंजूर केली. हे जर चुकीचे असेल तर मी वाटेल ते करायला तयार आहे.

श्री. नितीन गडकरी : आपला या योजनेशी काही संबंध नाही. काही घेणे देणे नाही.....

**उपसभापती** : प्रश्नवेला संपली.

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

यानंतर श्री. खर्चे...

**कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

पृ.शी. व मु. शी : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री.राजेश टोपे ( सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज., मी आपल्या अनुमतीने माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 15 चे उप-कलम (3) अनुसार महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाच्या नियुक्तीकरिता राज्यपालांकडे शिफारशी करण्याकरिता गठित करण्यात आलेली समितीबद्दलची प्रसिध्द केलेली अधिसूचना कमाअ-2005/738/प्र.क्र.204/5, दिनांकित 2 ऑगस्ट, 2005 सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

----------

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 15 चे उप-कलम (2) अनुसार राज्यपालांनी राज्य मुख्य माहिती आयुक्त पदावर नियुक्ती केलेल्याबाबतची प्रसिध्द केलेली अधिसूचना क्रमांक सीआरटीआय/सी.आर. 291/05/5 दिनांकित, 7 ऑक्टोबर, 2005 सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

-------------

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र माहिती अधिनियम, 2005 प्रसिध्द केलेली अधिसूचना क्रमांक आरटीआय-2005/सी.आर.315/05/5 दिनांकित 11 ऑक्टोबर, 2005 सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

--------------

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 च्या कलम 24 चे उप-कलम (4) अनुसार महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेल्या गुप्तवार्ता व संरक्षण संघटनांना या अधिनियमाच्या कार्यकक्षेतून वगळण्याबद्दलची प्रसिध्द केलेली अधिसूचना क्रमांक सीआरटीआय-2005/सीआर265/05/5, दिनांकित 11 ऑक्टोबर, 2005 सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

--------------

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने न्यायमूर्ती श्री. पी.बी.सावंत चौकशी आयोगाच्या अहवालावर करावयाच्या कारवाईबाबत शासनाला शिफारस करणाऱ्या कार्यबलाचा अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : न्यायमूर्ती श्री. पी.बी.सावंत चौकशी आयोगाच्या अहवालावर करावयाच्या कारवाईबाबत शासनाला शिफारस करणाऱ्या कार्यबलाचा अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

----------

श्री. जयप्रकाश दांडेगांवकर (कृषी राज्यमंत्री : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा सन 2002-03 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : महात्मा फुले कृषी विद्यापीठाचा सन 2002-03 चा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

-----------

......3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. व मु. शी. : विनंती अर्ज सादर करणे.

डॉ. अशोक मोडक (कोंकण पदवीधर) : सभापती महोदय, सुरुवातीला ज्या विषयासंबंधी मी विनंती अर्ज आज सादर करीत आहे तो विषय सन 1967 पासून प्रलंबित आहे. विधानसभेमध्ये वारंवार यासंदर्भात लक्ष वेधण्यात आलेले आहे अशा प्रकारे आजपर्यंत सर्व आयुधे संपलेली आहेत म्हणून नाईलाजाने विनंती अर्जाच्या मार्गाचा अवलंब करावा लागत आहे. मी आपल्या अनुमतीने "देवस्थान इनाम गावांमधील शेतकरी व ग्रामस्थांची होणारी गैरसोय दूर करणेबाबत" यासंबंधी..........च्या स्वाक्षरीचा विनंती अर्ज मी सभागृहास सादर करतो.

**उपसभापती** : विनंती अर्ज सभागृहास सादर झाला आहे. हा विनंती अर्ज प्रतिवृत्त सादर करण्याकरिता विनंती अर्ज समितीकडे सोपविण्यात आला आहे. प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाल्यावर त्याची प्रत प्रत्येक सदस्याकडे पाठविली जाईल.

-----------

....4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>**औचित्याच्या मुद्दयासंबंधी.**</u>

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी औचित्याच्या मुद्दयाच्या अनुषंगाने सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, शासन आणि प्रशासन एकमेकांच्याविरोधात हायकोर्टात गेलेले आहे. मुंबई शहरातील पोलीस इन्स्पेक्टर श्री. जगन पिंपळे हे एक पोलीस अधिकारी होते. दारु पिणे आणि अंडरवर्ल्डशी संबंधित असा त्यांचा परिचय करुन देता येईल. सन 2004 साली याच प्रकरणावरुन त्यांच्याविरुध्द चौकशी करण्यात आली होती व त्यांना निलंबित केले होते. परंतु माननीय राज्यमंत्री श्री. सिध्दाराम म्हेत्रे यांनी दबाव आणून त्यांना कामावर घेण्यास भाग पाडले. माजी पोलीस महासंचालक श्री. रिबेरो आणि एक नागरिक यांनी मुंबई हायकोर्टाच्या न्यायाधिशांना एक पत्र लिहून ही वस्तुस्थिती कळविली. उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ति श्री. कर्णिक व श्री. आर.एम.लोढा यांनी श्री. रिबेरो आणि एक नागरिक यांचे पत्र पिटीशन म्हणून दाखल करुन घेतले. त्यानंतर माननीय राज्यमंत्र्यांना अशा प्रकारचे आदेश दिल्यासंबंधी कोर्टाने स्पष्टीकरणासाठी नोटीस पाठविली. अशा प्रकारे शासनाच्या एका पोलीस अधिकाऱ्याचे अंडरवर्ल्डशी संबंध असतांना सुध्दा त्याला रिइनस्टेट करण्यात आले. याच पोलीस इनस्पेक्टरला नाशिकमध्ये फयुएल ॲाडल्टरेशनच्या गुन्हयासाठी अटक झाली होती, त्यांच्यावर दोन केसेस होत्या तरी देखील त्यांना कामावर का घेण्यात आले ? सर्वात महत्वाचे म्हणजे आपले ॲडिशनल प्लिडर श्री. प्रदीप पाटील यांनी मागील महिन्यात कोर्टात एक निवेदन सादर केले व त्यामध्ये असे म्हटले होते की, "पोलीस खात्याने आणि गृह विभागाने मनाई केली असतांना सुध्दा माननीय राज्यमंत्र्यांनी दबाव आणला म्हणून त्या पोलीस अधिकाऱ्याला कामावर घ्यावे लागले." शासनाच्या विरोधात प्रशासन कोर्टात जात आहे असे शब्द त्यामध्ये वापरण्यात आले आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण ......

श्री. प्रदीप पाटील साहेबांनी हायकोर्टाला जे निवेदन दिलेले आहे त्यामध्ये असे लिहिले आहे की, "We are planning to appeal against Minister's order." एका पोलीस अधिका-याला वेगवेगळया गुन्हयाखाली चौकशी करुन त्याला निलंबित केले जाते. त्याच्यावर भयानक आरोप असतांना या पोलीस अधिका-याला पुन्हा कामावर घेतले जाते. त्यामुळे यासंदर्भात माझे म्हणणे असे आहे की, शासनाने याबाबत निवेदन करणे आवश्क आहे. शासनाच्या विरोधात प्रशासनाला हायकोर्टात जावे लागत आहे. शासनाच्या विरोधात प्रशासन हायकोर्टात जाऊन असे निवेदन करते की, "आमच्यावर दबाव आल्यामुळे संबंधित पोलीस अधिका-याला कामावर घ्यावे लागले". मंत्र्यांच्या ऑर्डरच्या विरोधामध्ये आम्ही अपिल करणार आहोत, निवेदन करणार आहोत. मला वाटते या गंभीर प्रकरणाची नोंद घेऊन संबंधित मंत्र्यांना किंवा शासनाला निवेदन करण्यास सांगितले पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, पिंपळे नावाच्य पोलीस अधिका-याविरुध्द मी तक्रार केली होती त्यामुळेच या पोलीस अधिका-याला निलंबित करण्यात आले होते. मी जेव्हा रॉकेलच्या भेसळीच्या संदर्भातील विषय काढला त्यातीलच हा एक पिंपळे आहे. या पोलीस अधिका-यांने सगळी वाईट कामे करुन टाकलेली आहेत. या पोलीस अधिका-या विरुध्द लूटमार, चोरी, बलात्कार, दरोडेखोरी, खुन, 302 असे सगळे गुन्हे आहेत. त्यामुळेच मी श्री. कश्यप, डी.जी. यांना पत्र लिहिले होते. माझ्या पत्रामुळेच हा पोलीस अधिकारी निलंबित झाला होता. खरे म्हणजे पोलीस खाते या पोलीस अधिका-याला घेण्यास तयार नाही. या पोलीस अधिका-याने जे गुन्हे केलेले आहेत ते पोलीस खात्याला लांच्छनास्पद आहेत. या पोलीस अधिका-या विरोधात माझ्याकडे सगळी कागदपत्रे उपलब्ध आहेत. मी असे प्रकार या पुढे करणार नाही असे त्याने मला सांगितले होते. हे जर असेच करणार असतील तर ही गोष्ट अतिशय वाईट आहे. मधील काळात मला माहिती पुरविणारे नाशिकचे श्री. प्रदिप हिमाणी यांना मर्डरची नोटीस दिली. मग मी डी.जी. साहेबांना पत्र लिहिले, नाशिक कमिशनर रॉय यांना सुध्दा पत्र लिहिले. त्यांना मी सांगितले की, ज्यांनी मला माहिती दिली त्या व्यक्तीचा हा पोलीस अधिका-याने दोन वेळा मर्डर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या व्यक्तीला मारण्यासाठी त्याने माणसे देखील पाठवली होती त्यामुळे श्री. हिमाणी हे घराच्या बाहेर निघू शकत नाहीत. त्यामुळे असे रेकॉर्ड असलेल्या व्यक्तीला तुम्ही कसे



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.......

नौकरीवर घेतले? या पोलीस अधिका-याचा बायोडेटा कोणालाही दिला तर त्याला देखील हा पोलीस अधिकारी घाणेरडाच वाटेल. या पालीस अधिका-याविरुध्द सगळया प्रकारचे गुन्हे असतांनाही महाराष्ट्राच्या गृह राज्यमंत्र्यांनी दबाव आणून पुन्हा त्याला कामावर घेतले आहे. यासंदर्भात हायकोर्टात पीएलआय झालेले आहे. आता हायकोर्टात प्रशासन असे प्रतिज्ञापत्र करते की, राज्यमंत्र्याच्या दबावामुळे आम्ही या व्यक्तीला परत कामावर घेतलेले आहे. महाराष्ट्राच्या गृहविभागाला शरमेने मान खाली घालावी अशी ही लज्जास्पद घटना घडलेली आहे. अशा प्रकारच्या व्यक्तीला कामावर परत घेण्यासाठी गृहराज्यमंत्री जर काम करीत असतील आणि हायकोर्ट त्यावर ताशेरे मारत असेल तर माझी आपल्याला विनंती आहे की, यासंदर्भात संपूर्ण चौकशी करा. मी या व्यक्तीबद्दलचे गुन्हे या सभागृहात सांगू शकत नाही इतके ते धाणेरडे आहेत. त्यामुळे माझी मा. उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी यासंदर्भात निवेदन करावे. मंत्र्याच्या विरुध्द प्रशासनाला हायकोर्टात जावे लागणे यापेक्षा अजून वाईट कोणती गोष्ट आहे? त्यामुळे या गंभीर प्रश्नाच्या संदर्भात सभापती महोदय, सरकारला निवदेन करण्यास सांगावे अशी माझी नम्र विनंती आहे.

**उपसभापती** : या प्रकरणाच्या बाबतीत शासनाने दोन दिवसात या सर्व प्रकारची माहिती घेऊन सभागृहात निवेदन करावे, शक्यतो सोमवारीच.

श्री. कन्हैय्यालाल गिडवाणी : सभापती महोदय, माझाही औचित्याचा मुद्दा आहे. दिनांक 6 डिसेंबर 2005 रोजी 3 सूचना होत्या त्यापैकी शेतक-यांच्या आत्महत्ये संदर्भात चर्चा झाली तसेच काल बुधवार दिनांक 7 डिसेंबर, 2005 रोजी बेळगावच्या संदर्भात सभागृहात चर्चा झाली. परंतु परवा मा. सभापती महोदयांनी ऊसाच्या प्रश्नाच्या संदर्भात चर्चा घेऊ असे त्यांनी मान्य केले होते त्यामुळे माझी आपल्याला विनंती आहे की, ऊसाच्या संदर्भातील चर्चा शुक्रवार दिनांक 9 डिसेंबर, 2005 रोजी घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे त्याच बरोबर आज जो ऊसाचा प्रश्न निर्माण झ ालेला आहे त्यामध्ये नाबार्ड हा विषय महत्वाचा

.....3

श्री. कन्हैय्यालाल गिडवाणी...........

आहे. नाबार्डच्या पॅकेजचा जो मसुदा आहे तो ऊसाची चर्चा होण्यापूर्वी सभागृहापुढे ठेवावा याबाबत मी विनंती अर्ज दिलेला आहे.

**उपसभापती** : ठीक आहे. या मुद्यासंदर्भात माननीय सभापतींबरोबर चर्चा करण्यात येईल.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे. ठाणे जिल्हयामध्ये मुरबाड तालुक्यात "सिध्दगड" आहे. तेथे क्रांतीवीर हुतात्मा भाई कोतवाल आणि हिराजी पाटील यांचे हुतात्मा स्मारक आहे. परंतु, जुलै महिन्यातील अतिवृष्टीमुळे, पाण्याच्या प्रवाहामुळे हे हुतात्मा स्मारक, दीपस्तंभ आणि रस्ता उध्वस्त झालेला आहे. यासंबंधीची बातमी वर्तमानपत्रातसुध्दा आलेली आहे. 2 जानेवारी हा दिवस या दोन्ही हुत्मात्यांचा स्तृतिदिन म्हणून पाळण्यात येतो. त्यावेळी ठाणे जिल्हयाचे पालकमंत्री यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाचा कार्यक्रम होतो. तेव्हा अनेक राजकीय नेते व हजारो कार्यकर्ते कार्यक्रमाला उपस्थित असतात. सदर स्मारकाचे, दीपस्तंभाचे काम पालक मंत्रिमहोदयांनी आदेश देऊन सुध्दा अद्यापि सुरू झालेले नाही. तेव्हा येत्या 2 जानेवारी पूर्वी हुतात्मा स्मारकाचे, दीपस्तंभाचे आणि तेथील रस्त्याचे काम पूर्ण करण्यासंबंधी शासनाला निर्देश द्यावेत अशी मी आपल्याला विनंती करीत आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी सूचना केल्याप्रमाणे दीपस्तंभाचे, हुतात्मा स्मारकाचे आणि तेथील रस्त्याचे काम दिनांक 2 जानेवारी पूर्वी पूर्ण करण्यात यावे असे मी शासनाला निर्देश देत आहे.

.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्रीमती संजीवनी रायकर, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे व इतर यांनी "स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या शाळा, कर्मशाळा व वसतिगृहे यामधील कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे त्यांनी नागपूर येथे दिनांक 12 डिसेंबर 2005 पासून बेमुदत अन्न सत्याग्रह करण्याचा दिलेला इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

पुढील सूचना माननीय सदस्य सर्वश्री जयंत पाटील व इतर यांनी "दिनांक 6 डिसेंबर 2005 रोजी तिडका, जिल्हा गोंदिया येथे शाळा सुरू ठेवल्यामुळे प्राथमिक शिक्षक श्री.पृथ्वीराज मेश्राम यांचा गळा कापून हत्या करण्याचा नक्षलवाद्यांनी केलेला प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे.

सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी आणि इतर यांनी "संगीत अध्यापकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी त्यांनी दिलेला बेमुदत उपोषणाचा इशारा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 7 डिसेंबर 2005 रोजी नागपूरमधील 'टार्गेट इंटरनेट कॅफे'वर अश्लील छायाचित्र दाखविल्या प्रकरणी पोलिसांनी टाकलेली धाड" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयात शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे.

तदनंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण व इतर यांनी "मुंबई व राज्यातील धर्मादाय रुग्णालये मुंबई विश्वस्त व्यवस्था अधिनियमाच्या अटीनुसार गरीब व दुर्बल घटकातील रुग्णांवर उपचार न करता शासनाचे फायदे मात्र उपभोगत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर माननीय सदस्य श्री.कन्हैयालाल गिडवाणी यांनी "महाराष्ट्रात सर्व जिल्हयांसाठी तफावत न ठेवता दूध उत्पादक शेतकऱ्यांना दुधाचे दर वाढवून मिळण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांनी "दिनांक 6 व 7 डिसेंबर 2005 रोजी केळापूर व नांदुरा तालुक्यातील शेतकऱ्यांनी कर्जाला कंटाळून केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री शरद पाटील व इतर यांनी "मौजे कुपवाड, जिल्हा सांगली येथील सर्वे नं.194/1-बी या जागेवर प्रत्यक्षात 50 वर्षापासून इमारती उभ्या असताना ती जागा मूळ मालकास परत देण्याचा तहसिलदार, मिरज यांनी दिलेला बेकायदेशीर निर्णय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

तद्नंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व इतर यांनी "श्री.शालीकराम तायडे, रा.नांदुरा, जि.बुलढाणा यांची मुलगी अर्चना हिचा दिनांक 30 जुलै 2002 रोजी मृतदेह आढळल्यानंतर श्री.तायडे यांनी हुंडाबळीची तक्रार करून देखील अद्याप तपास न लागणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री डॉ.अशोक मोडक आणि इतर यांनी "दिनांक 2 नोव्हेंबर 2005 रोजी मिरज, जिल्हा सांगली येथील 'सनातन प्रभात'च्या कार्यालयावर करण्यात आलेला हल्ला, तेथे निर्माण झालेले तणावाचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर माननीनीय मंत्र्यांनी निवेदन करावे.

**उप सभापती** : आता मी पुढील कामकाजाकडे वळतो.

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...4..

**पृ.शी.**: अकोला महानगरपालिका आयुक्तांचा अनागोंदी कारभार.

**मु.शी.**: अकोला महानगरपालिका आयुक्तांचा अनागोंदी कारभार या संबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर,नितीन गडकरी,सागर मेघे, जगदीश गुप्ता,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेते ) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"श्री. संजय काकडे यांनी अकोला महानगरपालिकेत आयुक्त पदाचा कार्यभार सांभाळल्यापासून सर्व नियम धाब्यावर बसवून सुरु केलेला अनागोंदी कारभार, शासनाद्वारे प्राप्त होत असलेल्या निधीचा वापर विहित मुदतीत न केल्यामुळे हा निधी शासनाकडे परत पाठविणे, राष्ट्रीय गलिच्छवस्ती सुधार योजनेचा २ कोटी रुपयांचा निधी गेल्या ९ महिन्यांपासून मंजूर होऊन वितरणाकरिता तयार असतांनाही त्याबाबतचे कोणतेही प्रस्ताव तयार न करणे, नगरपरिषदेच्या काळातील जुनी कालबाहय झालेली १ कोटी २० लक्ष रुपयांची देयके स्थायी समितीच्या पूर्वपरवानगीशिवाय व स्थायी समितीला कोणतीही पूर्वसूचना न देता वितरीत करणे, गुंठेवारी अधिनियमांतर्गत महापालिकेत जमा करण्यात आलेला विकास निधी त्याच प्रभागातील विकास कामांवर खर्च करावा असे निर्देश असतांनाही हा निधी इतरत्र वळवणे, मालमत्ता करांची २५ कोटी रुपयांची थकबाकीची वसूली करण्याबाबत कोणतीही उपाययोजना न करणे, महापालिकेतील पदाधिकाऱ्यांना वारंवार अपमानित करणे, राज्यमंत्र्यांचा दर्जा असलेल्या व अकोला शहराच्या प्रथम नागरिक असलेल्या महापौरांना गेल्या ५-६ महिन्यांपासून शासकीय वाहन उपलब्ध करुन न देणे, या व इतर अनेक आर्थिक बाबतीत बेजबाबदार वर्तणूक करुन तसेच कर्तव्य पार पाडण्यास हयगय करणाऱ्या व आडमुठे धोरण अवलंबिणाऱ्या अकोला महानगरपालिकेच्या आयुक्तांविरुध्द दिनांक १८ नोव्हेंबर, २००५ रोजी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत ५१ विरुध्द ० मताने अविश्वास ठराव पारीत करण्यात येणे, श्री. संजय काकडे यांच्या या मनमानी कारभारामुळे अकोला शहरातील सर्व विकास कामे ठप्प होणे, अकोला महानगरपालिकेने आयुक्तांविरुध्द मंजूर केलेल्या अविश्वास ..५/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

ठरावान्वये त्यांच्या जागी अन्य कार्यक्षम आयुक्तांची नियुक्ती करण्याबाबत मा.विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक २४ नोव्हेंबर, २००५ रोजी दिलेल्या पत्रानुसार शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची भूमिका."

श्री.राजेश टोपे (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

:: निवेदन ::

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, श्री.संजय काकडे यांची अकोला महानगरपालिकेमध्ये गेल्या वर्षी आयुक्त म्हणून नेमणूक झाली.

यानंतर श्री.अजित..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

08-12-2005 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी न्नाही ) R-1

AJIT/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.ओटवणेकर...... 13:25

श्री.पांडुरंग फुंडकर.....

हे महाशय तेथे आल्यानंतर अकोला शहराचा विकास होणे सोडाच पण त्यांनी अकोला शहरातील सर्व विकास कामे ठप्प करुन टाकली. अमरावती विभागीय आयुक्तांनी दिनांक 31.1.2004 रोजी च्या पत्रान्वये गलिच्छ वस्ती सुधार योजना कार्यक्रमास दोन कोटी रुपये मंजूर केलेले आहेत,तेव्हा आपण ताबडतोब प्रस्ताव पाठवावा असे अकोला महानगरपालिकेच्या आयुक्तांना कळविले. परंतु ही लक्षवेधी सूचना येईपर्यंत प्रस्ताव पाठविण्यात आला नव्हता. प्रस्ताव न पाठविल्यामुळे अकोला महानगरपालिकेला दोन कोटी रुपये मिळू शकले नाहीत. दुसरा विषय अतिशय गंभीर आहे. महानगरपालिकेकडे गुंठेवारीचे पैसे जमा होतात. जमा झालेल्या रकमेपैकी 85 टक्के रक्कम त्या-त्या भागात खर्च करावी अशी कायद्यात तरतूद आहे. यासंबंधी अकोला महानगरपालिकेने प्रस्ताव देखील केला होता, परंतु महानगरपालिका आयुक्तांनी ही रक्कम दुसरीकडे वळती करुन त्या पैशाचा गैरवापर केला. त्यासंबंधी अनियमितता झाली म्हणून ऑडीटने ऑब्जेक्शन घेतलेले आहे. या महानगरपालिकेची वसुली जवळपास 25 कोटी रुपयांची आहे. हे आयुक्त आल्यापासून जवळपास फक्त तीन कोटी रुपये जमा झालेले आहेत. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी निवेदनात जे उत्तर दिलेले आहे ते दिशाभूल करणार आहे. ते आपण दुरुस्त केले पाहिजे. नाहीतर मंत्री महोदय अडचणीत येतील. आपण निवेदनात म्हटले आहे की, प्रस्ताव केलेला आहे. माझ्या माहितीप्रमाणे प्रस्ताव झालेला नाही. ज्यावेळी प्रस्ताव झाला त्यावेळी सभापतींना अधिकार द्यावे असे ठरले. नंतर स्थायी समितीला अधिकार द्यावे असे ठरले. स्थायी समितीला अधिकार नाही असे सांगितले. स्थायी समितीला अधिकार नाही म्हणून महासभेत हा ठराव घ्यावा असे ठरले. परंतु महासभेत ठराव झालेला नाही. महासभेत कोणताही ठराव न होता दीड कोटी रुपयांची देयके देण्यात आली. आपले जर असे म्हणणे असेल की, ठराव होऊन दीड कोटी रुपयांची देयके दिलेली आहेत तर ते चुकीचे आहे. माझ्याकडे महानगरपालिकेचा रेकॉर्ड आहे. ठराव न होता देयके देणे, गुंठेवारीची जमा झालेली रक्कम त्या विभागावर खर्च न करणे, गलिच्छ वस्ती सुधारणा योजनेचे पैसे मंजूर झालेले असताना प्रस्ताव न पाठविल्यामुळे महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. त्याचप्रमाणे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.........

अकराव्या वित्त आयोगाची वर्क ऑर्डर तयार झालेली असताना ते काम थांबविण्यात आलेले आहे त्यामुळे बाराव्या वित्त आयोगाचे पैसे आले नाहीत अशाप्रकारे अकोला महानगरपालिकेचे काम ठप्प करण्याचे पाप हे आयुक्त करीत आहे त्यांच्या विरुध्द आपण कोणती कारवाई करणार आहात ? या आयुक्तांविरुध्द दिनांक 18 नोव्हेंबर 2005 रोजी महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत 51 विरुध्द 0 मताने अविश्वास ठराव पास झालेला आहे. आपण जिल्हाधिकाऱ्यांना चौकशी करण्यास सांगितलेले आहे. माझा प्रश्न आहे की, आपण यासंबंधी उच्चस्तरीय चौकशी नेमणार आहात काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी याठिकाणी अधिकची माहिती दिलेली आहे. मी निवेदनात म्हटलेले आहे की.......

यानंतर श्री.बोर्डे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MHM/ SBT/ पूर्वी श्री.अजित.... 13:30

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहामध्ये जी माहिती सांगितली आहे त्याच्या विरोधातील माहिती किंवा उत्तर शासनातर्फे निवेदनाच्या माध्यमातून आलेले आहे. त्यामुळे अगोदर मंत्रिमहोदयांनी उत्तर दुरुस्त करावे किंवा दिलेली सर्व माहिती खरी आहे असे तरी सांगावे व त्यानंतरच या लक्षवेधी सूचनेच्या उत्तराला सुरुवात करावी.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी उत्तराला सुरुवात करण्यापूर्वीच या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गुप्ता यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. मी या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने सांगू इच्छितो की, अकोल्याचे कमिशनरबाबत सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी काही माहिती या ठिकाणी नमूद केली आहे. सदनामध्ये या लक्षवेधी सूचनेसंबंधीचे निवेदन सादर करण्यात आलेले आहे. निवेदनात काही चुकीच्या गोष्टी आल्यामुळे त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न विरोधी पक्षनेत्यांनी केलेला आहे. सभागृहाच्या सदस्यांनी सांगितलेली माहिती खरी आहे असे समजली जाते, ही आपली परंपरा आहे. परंतु माझ्याजवळ जी माहिती उपलब्ध आहे त्या माहितीच्या आधारे 2 कोटी रुपये गलिच्छ वस्ती सुधार योजनेचा निधी मिळविण्यासाठी आयुक्तांनी निविदा प्रक्रिया पूर्ण केली आहे आणि त्याबाबतचा प्रस्ताव सुध्दा सादर केलेला आहे. परंतु या ठिकाणी विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले की, अजून तसा प्रस्तावच पाठविलेला नाही. त्यांनी सांगितल्यानुसार याबाबत मला निश्चितपणाने तपासून पहावे लागेल. तसेच त्यांनी असेही सांगितले की, आयुक्तांच्या कामकाजापध्दतीमुळे ऑडीट ऑब्जेक्शनसुध्दा आलेले आहे. अशा अनेक निरनिराळया गोष्टी त्यांनी सदनामध्ये मांडल्या आहेत. आयुक्तांविरुध्द प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकाऱ्यांना या प्रकरणाची चौकशी करण्याबाबत सांगितलेले आहे. जिल्हाधिकाऱ्यांकडून या चौकशीचा अहवाल 22 डिसेंबर, 2005 रोजी अपेक्षित आहे. त्यामुळे....

श्री.पांडुरंग फुंडकर : महोदय, मला हे समजत नाही की, मंत्रिमहोदय अहवालाची वाट का पाहत आहेत ? महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत आयुक्तांविरुध्द 51 विरुध्द 0 मताने अविश्वास ठराव मंजूर झालेला असताना सुध्दा अहवालाची वाट कशाला पाहावयाची ?

श्री.राजेश टोपे : महोदय, जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर जरुर कारवाई करण्यात येईल. मी या निमित्ताने सांगू इच्छितो की, शासनाचा कोणालाही पाठीशी घालण्याचा हेतू नाही.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जिल्हा परिषदेमध्ये जि.प.च्या बॉडीने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांविरुध्द ठराव पास केला तर त्याची तातडीने बदली करण्याची तरतूद ॲक्टमध्ये करण्यात आलेली आहे. तशीच तरतूद महानगरपालिकेच्या ॲक्टमध्ये असेल तर आयुक्तांविरुध्द 51 विरुध्द 0 मताने अविश्वासाचा ठराव पास झाल्यामुळे त्या आयुक्तांची कायद्याने बदली झाली पाहिजे. आपल्याकडे लोकशाही आहे, नोकरशाही नाही. जर एखादा कमिश्नर लोकशाहीला डावलून, कारभार करीत असेल तर ते बरोबर नाही. त्यामुळे अकोला महापालिकेच्या आयुक्तांची लवकरात लवकर बदली करण्यात यावी.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 36 (3) अन्वये अशा पध्दतीने 5/8 मतांनी ठराव मंजूर झाला तर बदली करावयास पाहिजे. या ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल येणे अपेक्षित होते. तरीही सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता कलम 36 (3) अन्वये 51 विरुध्द 0 मतांनी अविश्वासाचा ठराव मान्य झाला असेल तर निश्चितपणाने आयुक्त श्री.काकडे यांची ताबडतोब बदली करण्यात येईल.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, आता या अधिका-याची बदली करण्यात येणार असल्याचे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितलेले आहे परंतु यामध्ये एक गंभीर मुद्दा आहे. Office of the Senior Deputy Accountant General, यांचा रिपोर्ट तुम्हाला मिळाला आहे काय ? The Report is addressed to the Secretary to the Govt. of Maharashtra Urban Development Department, Mantralaya, Mumbai-32. तुम्हाला हा रिपोर्ट मिळाला असल्याची माझ्याकडे तारीख आहे. दिनांक 28.10.2005 रोजी आपल्याला हा रिपोर्ट मिळाला आहे. त्या रिपोर्टमध्ये काय लिहिलेले आहे हे आपल्याला माहीत आहे काय ? या अधिका-याबद्दल माननीय मंत्रीमहोदय एवढे प्रेम का दाखवत आहेत हे मला तरी समजत नाही. या अधिका-यांनी दहा कोटी रुपयांचे मिसअप्रोप्रिएशन ऑफ फंडस ॲन्ड इररेग्युलरीटीज केलेली आहे. या रिपोर्टच्या तिस-या पॅरामध्ये असे म्हटलेले आहे की, "Irregular utilisation of funds collected under the provisions of Gunthewari Act-136.99 lakhs. As provided in clause 6(1) of the Gunthewari Act, 2001 amount occurring to the planning Authority shall be kept in a separate head of account. layoutwise and utilised for providing on site and off site infrastructure in the layouts. Records relating to funds of Gunthewari Act revealed that being planning authority of Akola City, the Corporation authorities have collected the amount by enacting the provisions of Gunthewari Act from the people of unauthorised layouts as detailed below.अशा प्रकारे हे सगळे पैसे त्यांनी घेतलेले आहेत परंतु ज्या कामासाठी त्यांनी पैसे घेतले होते त्या कामासाठी त्यांनी ते न वापरता दुस-याच कामासाठी वापरलेले आहेत. अशा प्रकारे त्यांना नियमाप्रमाणे करता येत नाही. Further it was observed that though separate account was opened for collection of fund, no layoutwise receipt and expenditure was maintained. त्यांच्याकडे कोणत्याही प्रकारची रिसीट नाही. त्यांनी जो पैसा गोळा केला होता तो दुस-याच कामासाठी खर्च केला होता . However, funds so collected was not utilised for off site on site development activities in all layouts. Instead the same were utilised on the

..T-2.



Shri Nitin Gadkari contd.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

works which were not at all permissible under the provision act ibid. Yearwise position of irregular utilisation of funds were as follows." त्यानंतर त्यांनी आणखी काय केले हे मी आपल्याला सांगतो. या अधिका-यानी इतरांना ॲडव्हान्स वाटला होता . हा ॲडव्हान्स कोणत्या अधिका-यांना वाटण्यात आला होता त्याची नावे या रिपोर्टमध्ये देण्यात आलेली आहेत. अशा प्रकारे टेम्परी ॲडव्हान्स ज्यांना देण्यात आला होता ते कोणत्याही प्रकारचा हिशोब देत नाही. सन्माननीय राज्यमंत्र्यांचे आडनाव श्री.टोपे असे आहे आणि हे अधिकारी मात्र सर्वांनाच टोप्या घालत आहेत. अशा अधिका-याला माननीय मंत्रीमहोदय संरक्षण देत आहेत. श्री. साखरे हे शिक्षण विभागात असून यांना 20 हजार रुपयांचा ॲडव्हान्स दिनांक 7.9.2001 रोजी दिला होता. श्री.टाळे हे शिक्षण विभागात आसून यांना 1 लाख 14 हजार 900 रुपयाचा ॲडव्हान्स दिनांक 2.7.2002. रोजी दिला होता .त्याचबरोबर श्री.आर.एस चावला हे डेप्युटी एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर असून यांना 2 लाख 63 हजार 476 रुपयांचा ॲडव्हान्स दिनांक 31.5.2002 रोजी दिला होता. श्री जी.एम.पांडे हे स्वर्ण जयंती रोजगार या विभागात असून यांना 1 लाख 25 हजार 446 रुपयांचा ॲडव्हान्स दिनांक 24.8.2002 दिला होता परंतु त्यांनी कोणत्याही प्रकारे या पैशांचा हिशोब दिलेला नाही.2001-2002 साली त्यांना जे पैसे देण्यात आले होते त्याचा हिशोब मागण्यात आलेला नाही. This is a clear-cut case of misappropriation and fraud. केन्द्र सरकारच्या ऑडिटर आपल्या ऑडिट रिपोर्टमध्ये असे म्हटलेले आहे की , It is a clear-cut case of fraud. ही बाब आपल्या कशी लक्षात आली नाही ? अशा प्रकारे गंभीर स्वरुपाची बाब आपल्या निदर्शनास कशी कोण आणून देईल ? तीन माकडाप्रमाणे तुमच्या कानावर तोंडावर आणि डोळयावर पट्टी लावलेली आहे काय ?. आता मी ज्या रिपोर्टचा उल्लेख केलेला आहे त्या रिपोर्टच्या आधारे या अधिका-याला निलंबित करण्यात येणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय, या संदर्भात शासनाने अतिशय स्पष्टपणे आपली बाजू मांडलेली आहे. कायदा आणि लोकशाही मानणारे हे शासन असल्यामुळे महानगरपालिकेच्या सभागृहात 51 विरुध्द 0 असे मतदान झालेले असल्यामुळे त्या अधिका-याची बदली केलेली आहे.

नंतर श्री.सुंबरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. टोपे ....

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी जी माहिती दिली त्यामध्ये काही मुद्दे असे आहेत की, जे 2001 साली आलेले आहेत. श्री.काकडे हे तेथे जानवारी 2005 मध्ये आलेले आहेत आणि म्हणून आपण दिलेली माहिती आणि ऑडिट ऑब्जेक्शन्स वगैरे सर्व बाबी तपासण्याची गरज आहे. तेव्हा आपण दिलेली माहिती ही कलेक्टरांच्या चौकशीमध्ये अतिरिक्त मुद्दे म्हणून येऊ शकतील आणि याबाबतीत चौकशी होईल व त्या चौकशीमध्ये ते दोषी आढळले तर पुढील कारवाई निश्चितपणे करण्यात येईल.

श्री.जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, कलेक्टर हे आयुक्तांची चौकशी करणार का ? मग त्या दोघांमध्ये सुपिरिअर कोण आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अकोला महापालिका आयुक्त हे नॉन-आयएएस आहेत आणि ही महानगरपालिका आताच नव्याने निर्माण झालेली आहे. त्यामुळे तेथे कलेक्टर त्यांना सिनिअर आहेत आणि म्हणूनच त्यांच्याकडून महापालिका आयुक्तांची चौकशी होऊ शकते.

***

...... यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : डहाणू (जि.ठाणे) तालुक्यातील फुगा कारखान्यातून वापरल्या जाणाऱ्या विषारी रसायनांमुळे तेथील बालमजूर तसेच जनतेच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका.

मु.शी. : डहाणू (जि.ठाणे) तालुक्यातील फुगा कारखान्यातून वापरल्या जाणाऱ्या विषारी रसायनांमुळे तेथील बालमजूर तसेच जनतेच्या आरोग्यास निर्माण होत असलेला धोका याबाबत सर्वश्री संजय दत्त व रमेश निकोसे यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

----

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : अध्यक्ष महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

" डहाणू (जिल्हा ठाणे) तालुक्यात अनेक भागांमध्ये फुगा कारखाने मोठ्या प्रमाणावर विखुरलेले असल्याचे माहे नोव्हेंबर 2005 रोजी वा त्या दरम्यान आढळून येणे., फुगे बनविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विषारी रसायने व पावडरी वापरण्यात येत असणे, ही विषारी रसायने व पावडरी आरोग्यास घातक व धोक्याचे आढळून येणे, राज्यात बाल कामगारांना मुक्त करण्यासाठी टास्क फोर्सची स्थापना केलेली असतानाही डहाणू तालुक्यातील घातक व जीवघेण्या फुग्याच्या कारखान्यात आदिवासी व मितना समाजातील बालमजूर काम करीत असणे, त्यांची आजही कारखानदारांकडून पिळवणूक केली जात असणे, यामुळे या बालकामगारांचे आरोग्य धोक्यात येत असल्याचे आढळून येणे, उक्त कारखाने अनधिकृत असल्याने शासनाचा मोठ्या प्रमाणात महसूल बुडविला जात असणे, तसेच परिसरात मोठ्या प्रमाणात प्रदूषण वाढत असणे, यामुळे परिसरातील ग्रामस्थांच्या आरोग्याला निर्माण झालेला धोक, उपरोक्त कारखाने बंद करण्याची व या जीवघेण्या व घातक कारखान्यातील बालमजुरांची मुक्तता करण्याची आवश्यकता., या बाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. बाबा सिद्दीकी (कामगार राज्यमंत्री) : अध्यक्ष महाराज, लक्षवेधी सुचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>**निवेदन**</u>

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..... यू 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( लक्षवेधी सुचनेवरील मा.कामगार राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, या निवेदनाममध्ये खरी माहिती लपविली आहे असे मला वाटते. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, फुगे तयार करणाऱ्या कारखान्यांमध्ये बालकामगारांची पिळवणूक होते ही बाब वस्तुस्थितीवर आधारित नाही असे आपण आपल्या या निवेदनामध्ये म्हटले आहे तेव्हा या कारखान्यांमध्ये बालकामगार आजही काम करीत आहेत हे खरे आहे काय ? असल्यास, संबंधित कारखान्यांविरूद्ध कोणती कारवाई केली गेली आहे ? तसेच या कारखान्यांतून अमोनियाचा वायू मोठ्या प्रमाणात बाहेर पडतो असे आपल्या या निवेदनात म्हटले आहे तर मग त्याचा त्रास तेथील कामगारांना होत नाही का ?

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, उत्तर में स्पष्ट लिखा है कि बाल मजदूर कारखाने में काम नहीं कर रहे हैं. टास्कफोर्स के द्वारा जानकारी करते हैं. टास्कफोर्स के द्वारा प्राप्त जानकारी के अनुसार वहां बाल मजदूर काम नहीं कर रहे हैं. दूसरे प्रश्न का उत्तर यह है कि इस कारखाने में जो अमोनिया इस्तेमाल होता है वह घातक नहीं है.

श्री संजय दत्त : मंत्री जी, आपका उत्तर अधिकारियों द्वारा दी गई जानकारी पर आधारित है. क्या आप हमारे साथ चलकर इन कारखानों का इंसपेक्शन करने के लिए तैयार है ?

श्री बाबा सिद्दीकी : इंसपेक्शन करने के लिए हम तैयार है.

श्री संजय दत्त : तो ठीक है. हम तारीख निश्चित करके इन कारखानों का इंसपेक्शन करेंगे.

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, या कारखान्यांमध्ये प्रदूषण निवारण यंत्रणा बसविल्याचे या निवेदनामध्ये म्हटले आहे तर येथील अशा किती कारखान्यांमध्ये ही यंत्रणा बसविली आहे याची माहिती माननीय राज्यमंत्री महोदय देतील काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, तपासणीमध्ये आतापर्यंत कोणत्याही कामगाराला बाधा झाल्याचे आढळून आले नाही असे या निवेदनात म्हटले आहे. पण माझ्या माहितीप्रमाणे तेथील बालमजुरांच्या हातांना खरूज व असेच अन्य असाध्य रोग झालेले आहेत तसेच तेथील टीबीचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. तर त्याबाबतची माहिती मिळेल काय ?

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, डहाणू परिसर में फुग्गे तैयार करने के करीब 51 कारखाने हैं. इन कारखानों की हर साल जांच होती है. डॉक्टर के द्वारा मजदूरों के स्वास्थ्य की जांच होती है, इलाज किया जाता है. 75 कामगारों का इलाज किया गया है. इसलिए मैं यह कहूंगा कि माननीय सदस्या जो कह रही है वह सही नहीं है.

( यानंतर श्री.सरफरे .... व्ही 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी आतापर्यंत अशाप्रकारच्या किती कारखान्यांना भेटी दिल्या आहेत?

श्री. बाबा सिध्दिकी : डेप्युटी लेबर कमिशनर यांनी गेल्या 10 वर्षात 35 कारखान्यांना भेटी दिल्या आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांना मी हात जोडून आग्रहपूर्वक विनंती करीत आहे. मध्यंतरी जरीच्या कारखान्यामध्ये लहान मुलांचा मोठया प्रमाणात वापर केल्याचे प्रकरण उघडकीस आले. माननीय सदस्य श्री. संजय दत्त हे सभागृहामध्ये जेव्हा ठामपणे आणि जाहीरपणे सांगत असतात तेव्हा ते सत्य असते ही या सदनाची परंपरा आहे. तरीसुध्दा शासन किती निर्ढावलेले आहे हे मंत्रिमहोदयांच्या उत्तरावरुन दिसून येते. मानखूर्द येथे बाल कामगारांचे अनाथाश्रम आहे त्या ठिकाणी या मुलांना ठेवण्यात येते. माझा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ सतत जागरुक आहे असे आपण म्हणता. तरमग अलिकडे केव्हा या कारखान्याची तपासणी करण्यात आली? त्यामध्ये किती कारखान्यांनी प्रदूषण नियंत्रणाची यंत्रणा बसविल्याचे आढळून आले? तसेच, आपण म्हटले आहे की, "फुगा कारखान्यात अमोनिया, ॲसेटिक ॲसिड इत्यादींचा कच्चा माल म्हणून वापर करण्यात येतो व हे घातक घनकचऱ्याच्या वर्गीकरणात मोडत नाही, अमोनिया व ॲसेटिक ॲसिडचा वापर अल्प प्रमाणात असतो" याची आपण केव्हा तपासणी केली?

श्री. बाबा सिध्दिकी :सभापति महोदय, सम्माननीय सदस्य जो बता रहे हैं कि इन कारखानों में बाल मजदूर काम कर रहे हैं, तो इसके बारे में मैंने पहले ही जवाब दिया है कि मैं खुद माननीय सदस्य के साथ जब वे कहेंगे तब इन कारखानों में विजिट देने के लिए तैयार हूं. दूसरी बात माननीय सदस्य ने यह कही कि हम गंभीर नहीं है. ऐसी बात नहीं है. हम गंभीर है. अगर इस तरह की कोई बात वहां होगी तो शासन उसके बारे में कार्रवाई करेगा. 1991 में डहाणू को ग्रीन झोन घोषित किया गया है. 1994 में मुख्य न्यायाधीश श्री धर्माधिकारी की अध्यक्षता में एक कमेटी बनाई गई है. इस संबंध में महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडल एवं केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडल व डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण जागरुक रहता है. समय समय पर इन संस्थाओं के द्वारा कारखानों को चेक किया जाता है. निरी नामक संस्था ने 1996 में अपनी रिपोर्ट में यह कहा है कि इस परिसर में प्रदूषण नहीं है.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश निकोसे : सभापति महोदय, मैं खुद डहाणू में गया था. मुंबई से 20-25 किलोमीटर के आगे आदिवासी क्षेत्र शुरु हो जाता है. मैं जब डहाणू में घूम रहा था तो मुझे यह देखकर आश्चर्य हुआ कि सब आधुनिक ढंग का हो गया है. लोगों के कपड़े देखें तो वे भी आधुनिक ढंग के थे. लेकिन आदिवासी अभी भी आधे कपड़ों में रहते हैं. इसलिए मैं माननीय मंत्री जी से पूछना चाहता हूं कि क्या वे डहाणू परिसर के प्रतिनिधियों के साथ दौरा करके डहाणू स्थित कारखानों में जाकर हकीकत जानने की कोशिश करेंगे ? दुसरे असे की, त्या ठिकाणी परप्रांतियांनी कारखाने सुरु केले आहेत. आपल्याकडे मराठी माणूस फक्त रेल्वे स्टेशनवर हमालाच्या रुपामध्ये दिसतो. त्या कारखान्यातून जो अमोनिया वायू बाहेर पडतो तो नाकाव्दारे तोंडामध्ये व फुफ्फुसामध्ये, हृदयामध्ये जातो. त्यामुळे फुफ्फुसे खराब होतात व त्यामुळे माणसाला टी.बी. सारखा आजार होतो. तेव्हा त्या कारखान्यात बाल मजूर आहेत काय यासंबंधी आपण किती दिवसात चौकशी करणार आहात? तसेच, आपण डहाणूला जाण्यास तयार आहात काय?

श्री. बाबा सिध्दिकी :सभापति महोदय, मैं माननीय सदस्य श्री निकोसे जी को भी दावत देता हूं कि वे भी इन कारखानों में विजिट देने के लिए मेरे साथ चले.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/SBT/MHM पूर्वी श्री.सरफरे . . . . 13:50

**उप सभापती** : मला असे सांगावयाचे आहे की, त्या कारखान्याला आमंत्रण दिल्यासारखी भेट दिली तर मग तेथे काहीच सापडणार नाही. त्यामुळे जर तेथे भेट द्यावयाचीच असेल तर सरप्राईज व्हिजीट द्या आणि तुम्हाला तसे जमत नसेल तर माझ्यासारखा माणूस घ्या आणि मग आपण त्यांना कळू न देता तेथे भेट देऊ. पण मिलीभगतसारखी व्हिजिट करु नका.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय,

**उप सभापती** : यापुढे जाऊन सांगतो की, या जिल्हयाचे पालकमंत्री माननीय श्री.गणेश नाईक आहेत आणि तेच या खात्याचे मंत्री देखील आहेत. त्यामुळे त्यांनी मनात आणले तर येत्या 24 तासात ते या गोष्टींचा बंदोबस्त करतील. गणेश नाईकसाहेब बरोबर आहे की नाही?

श्री.गणेश नाईक : सभापती महोदय, होय.

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, निवेदनाच्या दुसऱ्या पानावर असे म्हटलेले आहे की,"सन 2004 मध्ये 1581 कामगार व सन 2005 मध्ये 727 रबरी फुगे बनविणाऱ्या कामगारांची शल्य चिकित्सा करुन आरोग्य तपासणी करण्यात आलेली आहे. अशा तपासणीमध्ये आतापर्यंत कोणत्याही कामगारास फुगे बनविण्याच्या प्रक्रियेमुळे कोणतीही बाधा झाल्याचे आढळून आले नाही." मग मला एक गोष्ट कळत नाही की, त्यांचे ऑपरेशन का करण्यात आले ? याठिकाणी अगोदर शल्य चिकित्सा करुन नंतर आरोग्य तपासणी करण्यात आली आहे . परंतु जर कामगारांना कोणत्याही प्रकारची बाधा झाली नव्हती तर मग त्यांचे ऑपरेशन का केले ? तसेच याठिकाणी बाल कामगार होते का ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, येथे ऑपरेशन कुठे केले आहे ?

श्री.अनंत तरे : सभापती महोदय, शल्य चिकित्सा म्हणजे काय ?

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, त्यांची आरोग्य तपासणी केली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शल्य चिकित्सा म्हणजे सर्जीकल एक्झॅमिनेशन.

श्री.बाबा सिद्दीकी : सभापती महोदय, कामगारांची आरोग्य तपासणी केली आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शल्य चिकित्सा म्हणजे काय ?

**उप सभापती** : चिकित्सा या शब्दाचा अर्थ तपासणी असाच होतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, शल्य चिकित्सा म्हणजे काय ?

. . . .डब्ल्यु-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : आपण ज्याला सर्जिकल म्हणतो ती शल्यचिकित्सा.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, निवेदनामध्ये म्हटलेले आहे की, डहाणू, ता.जि.ठाणे या परिसरात फुगा तयार करण्याचे सुमारे 51 कारखाने असून हे सर्व कारखाने, कारखाने अधिनियमांतर्गत नोंदणीकृत आहेत." माझा प्रश्न असा आहे की, या परिसरात नोंदणी नसलेले अनधिकृत कारखाने किती आहेत याची चौकशी केली आहे का ? तसेच या कारखान्यांमध्ये बालमजूर काम करीत नाहीत हे शासन कोणत्या आधारावर सांगत आहे ? तसेच फुगे बनविण्यासाठी मोठयाप्रमाणावर रसायने आणि पावडर वापरली जाते. ज्यावेळी विशिष्ट प्रमाणाच्या पातळीवर रासायनिक प्रक्रिया होऊ लागते तेव्हा विषारी वायू बाहेर येऊ लागतो अशी माझी माहिती आहे. हा विषारी वायू केवळ माणसानांच नाहीतर जनावरांसाठी देखील हानीकारक असतो. अशा वेळी त्या परिसरातून जाताना सुध्दा गुदमरल्यासारखे होते. तेव्हा याठिकाणी प्रदूषण होत नाही, विषारी वायू निघत नाही हे शासन कोणत्या आधारावर म्हणत आहे ?

श्री.बाबा सिद्दीकी :सभापति महोदय, 51 फेक्टरी रजिस्टर्ड हैं. डहाणू में एक भी फेक्टरी अनधिकृत नहीं है. वर्ष 2005 में महाराष्ट्र एयर पोलूशन कंट्रोल बोर्ड ने कारखानों की जांच की थी. इस बोर्ड ने अपनी रिपोर्ट में लिखा है कि, There is no waste water coming out of the balloon factory. दूसरी बात यह है कि समय समय पर टास्कफोर्स के द्वारा जांच की जाती है कि कारखानों में बाल मजदूर काम कर रहे है या नहीं. जहां पर बाल मजदूर काम करते हुए दिखाई देते हैं वहां सख्त कार्रवाई करते हैं.

यानंतर श्री किल्लेदार

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, डहाणू आणि पालघर परिसरामध्ये पोल्युशन करणाऱ्या भरपूर इंडस्ट्रीज आहेत. त्यामध्ये प्लॅस्टीकच्या बांगडया बनविणारे, प्लॅस्टीकचे चष्मे बनविणारे, फुगे बनविणारे कारखाने आहेत. मंत्री महोदयांनी फुगे तयार करणारे 51 कारखाने असल्याचे सांगितले. परंतु डहाणू आणि पालघरमध्ये पोल्युशन करणारे हजारो कारखाने आहेत. त्या ठिकाणी लहान मुले काम करतात. माझा प्रश्न असा आहे की,जे कारखाने निरिक्षक आहेत ते 8-15 दिवसातून, महिन्यातून कारखान्यांना भेट देत असतात, तर त्यांचा अहवाल शासनाकडे केव्हा सादर केला जातो ?

श्री बाबा सिद्दीकी : सभापति महोदय, जो 51 कारखाने है वे फुग्गे तैयार करने वाले कारखाने हैं. अगर माननीय सदस्य और किसी फेक्टरी की बात कह रहे हैं तो उसकी जानकारी मैं सदन के पटल पर रख सकता हूं.

...............................

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ RJW/ D/ SBT/

**लक्षवेधी सूचना क्रमांक 3 बाबत.**

**उपसभापती** : आता यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अनंत तरे यांची लक्षवेधी सूचना आहे. ती त्यांनी मांडावी.

श्री.अनंत तरे : महोदय, माझी ही लक्षवेधी सूचना उद्या ठेवावी म्हणून मी माननीय सभापती महोदयांना पत्र देऊन विनंती केलेली आहे व ती त्यांनी मान्य केलेली आहे.

--

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ RJW/ D/ SBT/

**पृ. शी.** : शाळा, महाविद्यालयांच्या थकित वेतनोत्तर अनुदानाबाबत.

**मु.शी.** : शाळा, महाविद्यालयांच्या थकित वेतनोत्तर अनुदानाबाबत प्रा.बी.टी.देशमुख, सर्वश्री व्ही. यु. डायगव्हाणे, वसंतराव खोटरे, नानासाहेब बोरस्ते, जी.एल.अैनापुरें,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" महाराष्ट्र राज्य शिक्षणसंस्था व्यवस्थापन महामंडळाने दिनांक 12 डिसेंबर 2005 रोजी विधानमंडळावर मोर्चा नेण्याचा व फेब्रुवारी-मार्च, 2006 पासून महाराष्ट्रातील सर्व शाळा, महाविद्यालयाच्या इमारती बंद ठेवण्याचे आंदोलन जाहीर करणे, महामंडळाच्या अध्यक्षांनी दिनांक 25 ऑक्टोबर, 2005 रोजी किंवा त्या दरम्यान मुख्यमंत्र्यांना, जिल्हाधिकारी अमरावती, यांच्यामार्फत एक निवेदन सादर करुन याबाबतची सूचना देणे, दिनांक 17 फेब्रुवारी, 2004 रोजी शाळा, महाविद्यालयांच्या थकित वेतनोत्तर अनुदानाबाबत मुख्यमंत्र्यांशी झालेल्या चर्चेतील काही आश्वासनांची कार्यवृत्तामध्ये नोंद होणे तथापि त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी न होणे, काही आश्वासनांची कार्यवृत्तामध्ये नोंद न होणे, दिनांक 5 ऑगस्ट, 2002 च्या बैठकीमध्ये श्री.गोविंदभाई श्रॉफ यांच्याशी झालेल्या चर्चेतील निर्णयाशी शासन बांधील असल्याचे मुख्यमंत्र्यांनी दिनांक 17 फेब्रुवारी, 2004 रोजी झालेल्या बैठकीत मान्य करणे, मात्र त्याप्रमाणे प्रत्यक्षात कोणतीही कृती न होणे, इतर मागण्याबाबत सातत्याने होत असलेले दुर्लक्ष, त्यामुळे एकूणच शिक्षण क्षेत्रात निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

श्री.हसन मुश्रीफ : (शालेय शिक्षणा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरीत केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ RJW/ D/ SBT/

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हे जे निवेदन केलेले आहे. या निवेदनामध्ये श्री.गोविंदभाई श्रॉफ यांना जी कमिटमेंट दिलेली होती, त्या कमिटमेंटची पूर्तता केलेली नाही. गोविंदभाई श्रॉफ यांना कमिटमेंट दिलेली होती. तत्कालिन माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी ताशी कमिटमेंट दिलेली होती.त्यानंतरचे माननीय मुख्यमंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांनी आश्वासन दिलेले होते की, "स्व.गोविंदभाई श्रॉफ यांना दिलेल्या आश्वासना संबंधात थकित वेतनेतर अनुदान देण्याची बांधिलकी शासनाने मान्य केली." त्याप्रमाणे संपूर्ण वेतनेतर अनुदान देण्यात आलेले आहे काय ? दिलेले नसेल तर 31 मार्च 2006 पर्यन्तचे देय वेतनेतर अनुदान आहे ते केव्हा देणार आहात ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 31 मार्च 2004 पर्यनत 276 कोटी रुपये अद्यापि वेतनेतर अनुदान देणे आहे. त्याप्रमाणे 42 कोटी 21 लाख रुपये वितरित झालेले आहे आणि 21 कोटी 45 लाख रुपये वितरित व्हावयाचे आहेत. अजून 233 कोटी रुपये देण्याचे शिल्लक आहे. येत्या मार्चमध्ये असा प्रयत्न आहे की, पूरक मागण्यांमध्ये याचा अंतर्भाव करावा. वेतनेतर अनुदान देण्यासाठी 400 कोटी रुपयाची पूरक मागणी केलेली होती, परंतु पूरग्रस्त परिस्थिती असल्यामुळे वित्त विभागाने या वर्षी पूरक मागणीला परवानगी दिली नाही. परंतु निश्चितपणे 233 कोटी 20 लाख रुपये 31 मार्चपर्यन्त देण्याबाबत वित्त विभागाकडे मागणी केलेली आहे. त्यांनी मान्य केल्यानंतर ताबडतोब हे अनुदान देण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : आपल्याला महामंडळाने जे निवेदन दिलेले आहे, त्यातील तिस-या परिच्छेदामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिल्याचे सांगितलेल आहे. 5 ऑगस्ट, 2002 रोजी शिक्षण संस्था महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष स्व.गोविंदभाई श्रॉफ यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांचेशी वेतनेतर अनुदानाबाबत चर्चा केली होती.त्या चर्चेच्यावेळी माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, "At the outset, the Hon. Chief Minister unequivocally stated that non-salary grant being committed expenditure shall be paid in full. It was also agreed that the remaining outstanding dues of non-salary grant for 2003, both schools and colleges will be provided for in the budget. " निश्चितपणे कबूल केले. त्यानंतर एक मोठे आंदोलन झाले. त्यानंतर पुन्हा मुख्यमंत्र्यांनी दिनांक 17 फेब्रुवारी 2004 ला सचिवांच्या सहीने लेखी लिहून दिले की,"स्व.गोविंदभाई श्रॉफ यांना दिलेल्या आश्वासनासंबंधात थकित वेतनेतर अनुदान देण्याची बांधिलकी शासनाने मान्य केली."

यानंतर कु.थोरात....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ SBT/ MHM/ RJW/ प्रथम श्री.किल्लेदार... 14:00

प्रा. बी. टी. देशमुख...

माझे म्हणणे असे आहे की, सा-या महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्था या अन्यायामुळे अत्यंत अस्वस्थ झालेली आहे. मुख्यमंत्री शब्द देतात आणि अधिकारी उध्दटपणा करतात. ही गोष्ट अत्यंत लाजीरवाणी आहे असे लोक गावोगाव सांगत आहेत, ही गोष्ट शासनाला शोभेशी नाही. म्हणून वित्त विभागाकडे दिले, याच्याकडे दिले, त्याच्याकडे दिले असे आपण सांगू नका. अपटुडेट वेतनेतर अनुदानाचे पेमेंट कोणत्या तारखे पर्यंत होईल ते सांगावे. कारण आता व्यवस्थापन महामंडळाने पुन्हा नोटीस दिलेली आहे. सभापती महोदय, पॉइंटेड प्रश्न असा आहे की, मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द शासन पाळणार आहे की नाही आणि पाळणार असेल तर वेतनोत्तर अनुदान अपटुडेट कोणत्या तारखेपर्यंत दिले जाईल ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 31 मार्च पर्यंत देण्याचा प्रयत्न करतोय असे मी सांगितलेले आहे. दि.5 ऑगस्ट, 2002 रोजी सन्माननीय श्री. गोविंदभाई श्राफ यांच्या नेतृत्वाखाली अनुदानीत शाळांचे एक शिष्टमंडळ मुख्यमंत्री श्री. विलासराव देशमुखसाहेबांना भेटले. हे वेतनेत्तर अनुदान शाळांच्या ज्या इमारती आहेत त्याचे भाडे थकीत आहे, ती देण्याची जबबदारी त्या संस्थांची आहे, ती शासनाची नाही. म्हणून ते देण्याचे बंद केलेले होते. परंतु सन्माननीय श्री. गोविंदभाई श्रॉफ आणि त्यांचे शिष्टमंडळ शासनाला भेटल्यानंतर शासनाने आपल्या निर्णयात बदल केला आणि वेतनोत्तर अनुदान देण्याचे ठरविले.श्री. गोविदभाई श्रॉफ 5 ऑगस्टला भेटल्यानंतर शासनाने 2000 मध्ये 32 कोटी रुपयांची तरतूद करुन ती वितरीत केली. 2002- 2003 मध्ये 27 कोटी 81 लाख रुपये दिले. 2003-2004 मध्ये 53 काटी 28 लाख रुपये दिले आणि 2004-2005 मध्ये 242 कोटी रुपये इतकी मोठी रक्कम खर्च केली. राज्य शासन आर्थिक अडचणीत असतांना सुध्दा श्री. गोविंदभाई श्रॉफ यांना शासनाने शब्द दिला म्हणून एवढी तरतूद करुन ती दिलेली आहे. उर्वरित 233 कोटी रुपये येत्या मार्चमध्ये बजेट मंजूर करुन ते पैसे देण्यात येणार आहोत.

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे :सभापती महोदय, 242 कोटी रुपये दिले असे मंत्रिमहोदयांनी सांगितलेले आहे. पण हे कोणत्या वर्षापर्यंत दिले? 1999 पासूनचे देणे होते. 2001 पर्यंत काही शाळांचे देणे दिले. काही शाळांचे अद्याप देणे द्यावयाचे आहे. 2001-2002 पासून 2005-2006 पर्यंत हे थकित आहे. 200, 250 कोटी रुपये देणे आहे असे आता मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी सांगितलेले आहे. ते पैसे देण्याच्या बाबतीत बघू, पाहू अशा प्रकारे सांगितले जात आहे. याला





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख...

काही अर्थ नाही. यासंदर्भात दि.12 डिसेंबर, 2005 मध्ये विदर्भातील संपूर्ण मॅनेजमेंट नागपूरमध्ये मोर्चा काढणार आहे यासंबंधीचे निवेदन शासनाला देण्यात आलेले आहे. सभापती महोदय, शाळा बंद करण्याचे मॅनेजमेंटचे आंदोलन या पूर्वी झालेले आहे आणि आता पुन्हा ते होणार आहे, अशी सुध्दा नोटीस दिलेली आहे. म्हणून या ठिकाणी उधारी न सांगता स्पष्टपणे सांगितले पाहिजे. शाळा चालू शकत नहीत. आज अनेक शाळामध्ये लायब्ररीसाठी, लॅबोरेटरीसाठी इक्विपमेंट घेणे बाकी आहे, फर्निचरची व्यवस्था नाही आणि काय शिक्षण देता? शिक्षण चांगले द्यावयाचे आहे असे सांगता, ते सारे थोतांड आहे. आणि म्हणून स्पेसिफिक सांगितले पाहिजे की, जे काही देणे आहे ते 2001 पर्यंत पूर्ण झालेले नाही ते पूर्ण करुन 2001 ते 2004 पर्यंतचे जे काही 250 कोटी रुपये देणे आहे ते मार्चचे अधिवेशन होण्यापूर्वी देण्याच्या संदर्भात ठोसपणे सांगितले पाहिजे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शिक्षण हे मानवी विकासाचे मूलभूत क्षेत्र आहे. शिक्षण हे भांडवली गुंतवणूक आहे. संस्था आणि शासन मिळून मुलांचे शिक्षण करावयाचे आहे.शासनापुढे अनेक अडचणी असतांना सुध्दा शासनाने जास्तीत जास्त पैसे देण्याचा प्रयत्न केलेला आहे. 31 मार्च ला 233 कोटी रुपये शासन देणार आहे हे मी मघाशी सांगितलेले आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : यु.एन.डी.पी.ने जी व्याख्या दिलेली आहे त्यामध्ये हे आहे. मानवी विकासाचे शिक्षण हे एक अतिशय महत्वाचे साधन आहे. शासनाने निवेदनात हे मान्य केले ही आनंदाची गोष्ट आहे. मुद्दा असा आहे की, आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. मंत्रिमहोदयांनी निवेदनामध्ये स्पष्टपणाने ही गोष्ट दिलेली नाही. ही गोष्ट टाळलेली आहे. त्यांनी जी रक्कम देण्याचे कबूल केलेले आहे ती देण्याच्या बाबतीत सुध्दा प्रयत्न करु असे सांगून पुन्हा पुन्हा ते तो प्रश्न पुढे ढकलत आहेत. तुम्ही हसता आहात. माननीय राज्य मंत्र्यांनी जरुन हसावे पण एकूण देणे किती आहे ? हे देणे शासनाच्या क्षमतेच्या बाहेरचे आहे असे नाही.राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी कबूल केलेली ही गोष्ट आहे आणि विशेष म्हणजे मंत्रिमहोदय, आपण स्वत: त्यावेळेला उपस्थित होतात. मुख्यमंत्र्यंनी कबूल केलेली गोष्ट चार-चार वर्षे होत नसेल तर ती अतिशय लाजीरवाणी गोष्ट आहे. बाहेर हे तुमचे कौतूक सांगतांना आम्हाला लोजेने मान खाली घालावी लागते. मंत्रिमहोदय, वारंवार सभागृहात कबूल करतात की, होय, श्री. गोविंदभई श्राफ यांना आम्ही लिहून दिलेले आहे. मग त्याचा काही तरी विचार करा. माझे म्हणणे असे आहे की,

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख..

या निवेदनामध्ये दिलेल्या रकमा पुन्हा पुन्हा सांगू नका. जरा गांभीर्य समजून घ्या. शाळांना, महाविद्यालयांना कुलपे लावण्याचा प्रसंग यावा हा दुर्दैवी प्रसंग आहे. पण गत्यंतर न राहिल्यामुळे तो निर्णय घ्यावा लागलेला आहे. म्हणून माझे म्हणणे असे आहे की, मंत्रिमहोदयांनी याबाबतीत वळणे घेऊ नयेत. सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, जर मंत्रिमहोदय, याला वळण देत असतील, मूळ उत्तर देण्याचे टाळत असतील व ..............................................

यानंतर श्री. खर्चे..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख .......

त्यांच्या कॅपॅसिटीतील ही बाब नसेल तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करावी व नंतर उत्तर द्यावे अशी आमची विनंती आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, 233 कोटी रुपये मार्चच्या बजेटमध्ये द्यावेत अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. यासंदर्भात मी माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय वित्तमंत्र्यांबरोबर चर्चा करुन प्रयत्न करणार आहे. कारण आपल्याला शाळा बंद ठेवून चालणार नाही. मार्चच्या बजेटमध्ये यासंबंधीची तरतूद करण्याचा आम्ही प्रयत्न करु.

प्रा. बी.टी.देशमुख : 31 मार्चपर्यन्त हे सर्व वेतनोत्तर अनुदान दिले जाईल काय ?

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मला आजपर्यंत वाटत होते की, आपले सरकार आणि मुख्यमंत्री केवळ शेतकऱ्यांनाच दिलेला शब्द पाळत नाही, त्यांची फसवणूक करते परंतु हे शासन तर आता शिक्षक आणि शिक्षण संस्थांची देखील फसवणूक करायला लागले आहे. एकीकडे माननीय मंत्री महोदय या ठिकाणी समन्वयाचा विचार सांगत आहेत. या वेतनेत्तर अनुदानातून शाळेचा इतर सर्व खर्च चालतो, शाळेमध्ये प्रयोगशाळेतील ॲप्रन कोठून आणणार, खडू व डस्टर कोठून आणणार, वहया कोठून आणणार ? हा सर्व खर्च यातून चालतो. इकडे शासन शिक्षकांना ढोरं मोजायला तसेच इतर 10 कामांना जुंपते परंतु अनुदान देण्यात कुचराई का करते हे समजत नाही. माझा प्रश्न असा आहे की, मा. मंख्यमंत्र्यांनी स्व. गोविंदभाई श्रॉफ यांना जे आश्वासन दिले होते ते आश्वासन मार्चमध्ये कुठल्याही परिस्थितीत संपूर्णत: पाळले जाईल काय असे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. तसे शक्य नसेल तर दिलगिरी व्यक्त करावी की माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले ते चुकीचे होते, त्यांना राज्याची आर्थिक परिस्थिती माहिती नव्हती, याबद्दल माननीय मुख्यमंत्र्यांच्या वतीने सभागृहाची माफी मागावी. माननीय मंत्री महोदयांनी अशा प्रकारे दोन्ही ठिकाणी, तबला आणि डग्ग्यावर हात ठेवू नये, अशी माझी सूचना आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सन 1998-99 पासून हे अनुदान बाकी होते. ज्यावेळी गोविंदभाई श्रॉफ यांच्या अध्यक्षतेखाली शिष्टमंडळ मुख्यमंत्र्यांना भेटले होते त्यानंतर किती तरी पैसे या संस्थेला शासनाने दिलेले आहेत. आता फक्त 233 कोटी रुपये एवढीच रक्कम द्यावयाची आहे. येत्या मार्चपर्यंत यासंबंधी निश्चितपणे तरतूद करण्यात येईल.

.....2

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी 233 कोटी बाकी असल्याचे या ठिकाणी सांगितले. त्यातून 42.91 कोटीची तरतूद केली असल्याचे सांगितले. त्यांनी पुढे असेही म्हटले आहे की, ज्युनियर कॉलेजसाठी सन 2004 आणि 2005 करिता अनुक्रमे 255 आणि 283 कोटी एवढी तरतूद केली आहे. परंतु अनुदानित शाळामध्ये नॉन सॅलरी ग्रँट मिळाली नाही तर त्यांना आवश्यक असलेले साहित्य विकत घेता येत नाही. म्हणून जी कमिटमेंट गोविंदभाई श्रॉफ यांना माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेली आहे ती पूर्ण करावी. मागील वेळ 1 जुलै रोजी सर्व मॅनेजमेंटने शाळा बंद ठेवल्यानंतर त्यांना 40 कोटी रुपये तात्काळ शासनाने रिलीज केले, पुन्हा आम्ही 12 तारखेला शाळा बंद ठेवणार आहोत, त्यानंतर शासन हे अनुदान देणार. यापेक्षा माननीय मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा करुन हे अनुदान दरवर्षी मिळाले पाहिजे अशी व्यवस्था करावी. त्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांसोबत चर्चा करावी लागेल म्हणून ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीने याबाबतचा निर्णय घ्यावा.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, शाळांचे नुतनीकरण करण्यासाठी अनेक लोक आता पुढे यायला लागले आहेत, लोकांच्या सहभागातून शाळा तयार होत आहेत, लोक शाळांसाठी मदत करण्यासाठी पुढे येत आहेत. आता हे सर्व काम करणे ही त्या संस्थांची जबाबदारी आहे यामध्ये शासन जबाबदार नाही. तरी सुध्दा 233 कोटी रुपये 31 मार्च पर्यंत देण्याचा आम्ही प्रयत्न करु.

**उपसभापती** : या प्रश्नाच्या संबंधित असलेले सर्व सन्माननीय सदस्य , तसेच मंत्रीमहोदय यांनी माननीय मा. मुख्यमंत्र्यांबरोबर या विषयाच्या संदर्भात 2 दिवसात चर्चा करावी व निर्णय घ्यावा व तो निर्णय सभागृहात सांगावा. तो पर्यंत ही लक्षवेधी सूचना राखून ठेवली जात आहे.

---------------

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

**पृ.शी.**: मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी फ्री-शिप व स्कॉलरशिप देण्याबाबत.

**मु.शी.**: मागासवर्गीय विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी फ्री -शिप व स्कॉलरशिप देण्याबाबत प्रा. शरद पाटील यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. शरद पाटील यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

प्रा. शरद पाटील (पुणे विभाग पदविधर ): महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय मंत्रालयाच्या पूर्व घोषित निर्णयानुसार राज्यातील विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करण्यासाठी महाविद्यालयाची वार्षिक फी व निवास भत्ता या रकमा शिष्यवृत्ती म्हणून पात्र विद्यार्थ्यांना फ्रि-शिप व स्कॉलरशिप स्वरुपात देण्यात येतात. सांगली जिल्हयातील मागास प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांना सन 1997-98 या शैक्षणीक वर्षापासून फ्री-शिपचा निधी अजापर्यंत उपलब्ध न झाल्यामुळे प्रलंबित आहेत. त्यामुळे पालकांसमोर मोठी आर्थिक समस्या निर्माण झालेली आहे. प्रस्ताव मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांचे पालक संबंधित कार्यालयामध्ये वारंवार हेलपाटे घालून चौकशी करतात व त्यांना होणारा त्रास, त्यामुळे पालक व विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेली शासनाविषयी चिडीची भावना, गेल्या सहा वर्षापासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नासंबंधी शासनाने निधी उपलब्ध करुन शासनाने तातडीने सोडविण्याची आवश्यकता त्याबाबत शासनाने घ्यावयाचा निर्णय व भूमिका याकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

----------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षकाने दुकानदारांकडून मोठी रक्कम मागितल्या बाबत.

**मु.शी.**: उत्पादन शुल्क विभागातील दुय्यम निरीक्षकाने दुकानदारांकडून मोठी रक्कम मागितल्या बाबत श्री. सुरेश जेथलिया यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना .

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया यांनी यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुरेश जेथलिया (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) :महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो. नांदेड जिल्हयातील उत्पादन शुल्क विभागातील किनवट येथील एका दुय्यम निरीक्षकाने एका दुकानदाराचे दोन पंचनामे करुन त्यांच्याकडून मोठी रक्कम मागितल्याबाबत दि. 17.7.2004 रोजी जिल्हाधिकारी , नांदेड यांच्याकडे तक्रारी करणे यासंदर्भात माहे 2004 मध्ये विधानपरिषदेत यासंदर्भात 7910 नंबरचा तारांकित प्रश्न विचारला असता मा. राज्य उत्पादन शुल्क मंत्री यांनी दिलेल्या उत्तरात सांगितले की, चौकशी गांभीर्याने केलेली नसल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे. परंतु आजतागायत याबाबत कोणतीही कारवाई झालेली नसणे, परिणामी जनतेचा शासनावरील उडत चाललेला विश्वास लक्षात घेता याबाबत त्वरित निर्णय घेऊन यावर निवेदन करावे, ही विनंती.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## <u>विशेष उल्लेख</u>

**पृ.शी.**: राज्य शासनाने आपत्ती व्यवस्थापन योजनेचा आराखडा सन 1998 मध्ये तयार करूनही अद्याप त्याची अंमलबजावणी न होणे.

**मु.शी.**: राज्य शासनाने आपत्ती व्यवस्थापन योजनेचा आराखडा सन 1998 मध्ये तयार करूनही अद्याप त्याची अंमलबजावणी न होणे याबाबत डॉ.दीपक सावंत यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते. राज्य शासनाने आपत्ती व्यवस्थापन योजनेचा आराखडा व आपत्कालीन व्यवस्था कशी असावी याबाबत सात वर्षापूर्वी योजना तयार केली होती. या योजनेचा बोजवारा उडाला हे 26 जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीच्या वेळी दिसून आले. मुंबई शहराला भूकंप, पूर व रासायनिक कारखाने यापासून फार मोठया प्रमाणावर धोका आहे. 26 जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मुंबई स्टँड स्टील झाली होती. 26 जुलै रोजी मुंबई निसर्गापुढे हतबल झाली. मुंबईतील आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी शासनाकडे कोणत्याही प्रकारची यंत्रणा नाही असे समजते. राज्यातील वाढत चाललेले शहरीकरणे, झोपडया व प्लास्टीक इत्यादीमुळे पावसाच्या पाण्याचा निचरा होत नाही. पावसाच्या पाण्याचा निचरा न झाल्यामुळे मुंबईतील रस्त्यावर पाणी तुंबल्यामुळे अनेक जणांचे बळी गेले. पूर परिस्थिती निर्माण झाली की, त्यामुळे विविध साथीचे आजार पसरतात. या सर्व बाबींचा आपत्कालीन व्यवस्थानामध्ये समावेष आहे. आपत्ती व्यवस्थापन योजना आराखडयाचे प्रमुख राज्याचे मुख्य सचिव आहेत. त्यांनी विधान सभा व विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांना सदर आराखडा कसा आहे, यासंबंधीची माहिती दिलेली नाही. म्हणून माझी विनंती आहे की, आपत्कालीन व्यवस्थापन आराखडा लवकरात लवकर विधान सभा व विधान परिषदेसमोर आणवा व तो कसा आहे हे सदस्यांना ज्ञात व्हावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अशासकीय अनुदानित तंत्र शिक्षण संस्थेतील शिक्षकांना निवड श्रेणी लागू न केल्याबाबत.

**मु.शी.**: अशासकीय अनुदानित तंत्र शिक्षण संस्थेतील शिक्षकांना निवड श्रेणी लागू न केल्याबाबत सन्माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या श्रीमती संजीवनी रायकर यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती संजीवनी रायकर (मुंबई शिक्षक) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

अशासकीय अनुदानित तंत्रशिक्षण संस्थातील आठवी ते दहावी इयत्तांना शिकविणाऱ्या शिक्षकांकरिता दिनांक 17 जानेवारी 2004 च्या शासकीय निर्णयानुसार सहायक अभियांत्रिकी अधीक्षक या पदाकरिता निवडश्रेणी दिलेली नाही. त्याच बरोबर शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणीची थकबाकी वेतनश्रेणीच्या 50 टक्के भविष्ययनिर्वाह निधीत जमा झाली नाही व 50 टक्के रोखीने 10 वर्षाच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने देण्याबद्दल अद्याप निर्णय झालेला नाही. तसेच, सुधारित वेतनश्रेणी 1 एप्रिल 2004 पासून रोखीने अदा करण्यात आले. परंतु, स्टाफिंग पॅटर्न उशिरा झाल्यामुळे 1 एप्रिल 2004 ते 1 फेब्रुवारी 2005 पर्यंतची थकबाकी अजून मिळालेली नाही. तांत्रिक शिक्षकांना वरिष्ठ वेतनश्रेणीची थकबाकी दिनांक 1 जानेवारी 1995 ते 28 फेब्रुवारी 1999 पर्यंतची रक्कम भविष्यनिर्वाह निधीत जमा झालेली नाही. त्याचप्रमाणे 1 मार्च 1999 नंतरची रक्कम रोखीने देण्यात आलेली नाही. या बरोबरच तांत्रिक शिक्षकांना निवडश्रेणी लागू करण्यात आली आहे, परंतु निवड श्रेणीबद्दल कोणत्याही प्रकारे कार्यवाही झालेली नाही. मुख्य म्हणजे जी शाळा ॲकेडेमिक वर्ग घेते त्यांनाच हया सुविधा आहेत. मात्र, त्याच शाळेत तांत्रिक विषय शिकविणाऱ्यांना मात्र या सुविधा दिलेल्या नाहीत. तेव्हा ही जी डिस्पॅरिटी आहे ती दूर करावी अशी माझी विनंती आहे.

...........

...3..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील 32 आरक्षणे बदलल्याबाबत.

**मु.शी.**: कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील 32 आरक्षणे बदलल्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांनी एक विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. ती त्यांनी मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (विधान सभेने निवडलेले) : महोदय, मी पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील एकूण लोकसंख्येपैकी 40 ते 42 टक्के लोक हे शहरांमध्ये राहतात. या शहरांचे नीट नियोजन केले पाहिजे. तिथल्या विकास आराखडयांमध्ये जे भूखंड असतात ते भूखंड ज्या कारणांसाठी राखून ठेवलेले असतात त्याच कारणांसाठी कठोरपणे राखून ठेवले पाहिजेत. परंतु, महाराष्ट्र शासन मात्र राज्यातील सर्व शहराची कशी वाट लावते आहे, हे मी विशेष उल्लेखाद्वारे सभागृहासमोर आणू इच्छितो.

सभापती महोदय, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेची निवडणूक नुकतीच झालेली आहे. या निवडणुकीच्या धामधुमीत, निवडणुकीच्या वातावरणात तेथील नगरसेवकांना, जनतेला अंधरामध्ये ठेवून कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचा मुहूर्त साधून तेथील विकास आरखडयात आरक्षित असलेले भूखंड राज्य सरकारच्या नगरविकास खात्याने बिल्डर लॉबीच्या घशात घातले आहेत. सुमारे 1200 कोटी रुपयाच्या किंमतीच्या डोंबिवली-कल्याण महानगरपालिकच्या क्षेत्रातील 32 शासकीय भूखंडांचे आरक्षण उठवून शासनाने बिल्डर लॉबीचे उखळ पांढरे केले आहे. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या धामधुमीत नगरविकास खात्याने कल्याण विभागात सांस्कृति केंद्र, मनोरंजन केंद्र, आठ प्राथमिक शाळांची आरक्षणे, आठ बगिचे, दोन पोलिस चौक्या, एक कृषि उत्पन्न बाजार समिती, दोन भाजी मार्केट, एक वाहनतळ, एक विधी व न्याय विभागाची वसाहत अशी एकूण 32 आरक्षणे उठविली आहेत आणि त्याचे रुपांतर निवास आणि व्यापारी वापरासाठी करण्यात आलेले आहे. डोंबिवलीमध्ये नागरी सुविधांसाठी जागा नसल्याबद्दलची ओरड आहे. लोकसंख्या वाढली आहे याचा उल्लेख आताच सभागृहामध्ये करण्यात आला आहे. तेव्हा असे पाप शासन का करीत आहे, हेच मला कळत नाही.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण.....

डोंबिवली विभागात नागरी सुविधांसाठी जागा उपलब्ध नसताना सुध्दा त्याठिकाणी दोन रस्ते, बारा बगीचे, तीन प्राथमिक व माध्यमिक शाळा, दोन वाहनतळ, आणि तीन मैदाने, तीन दवाखाने आणि तीन ठिकाणी म्हाडाने बेघरांसाठी घरे बांधण्यासाठी जी जागा ठेवली होती त्यांची आरक्षणे बदलून ती निवासी व व्यापारी झोनमध्ये दाखविली आहेत. भविष्यात कल्याण - डोंबिवली महानगरपालिकेच्या नियोजन समितीने यापूर्वीच आरक्षित भूखंडावर झालेली अतिक्रमणे लक्षात घेऊन आरक्षणात काही किरकोळ बदल सुचविले होते आणि 1999 साली विकास आराखडा मंजुरीसाठी शासनाकडे पाठविला होता. परंतु गेली सहा वर्षे हा आराखडा नगरविकास विभागात बासनात गुंडाळून ठेवण्यात आलेला आहे. सभापती महोदय, विशेष बाब म्हणजे राज्य शासनाने यापूर्वी मंजूर केलेल्या विकास आराखड्यात आरक्षित असलेल्या भूंखडाचे आरक्षण व्यवयायिक जमिनीमध्ये केले. कल्याण-डोंबिवलीतील ज्या भागाच्या किंमती आकाशाला भिडलेल्या आहेत त्या भागाचाच आराखडा मंजूर करण्यात आलेला आहे. ही सूचना फक्त एकाच वर्तमानपत्रात इंग्रजीमध्ये देण्यात येऊन फक्त 60 दिवसांची मुदत दिली होती. पण ते कोणाच्याही लक्षात आले नाही. म्हणून या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनाला विनंती करतो की, आपण जर हा बदल केला असेल तर त्याबाबत पुनर्विचार करण्यात यावा. कारण आज कल्याण-डोंबिवली येथील लोकसंख्या वाढत आहे. याची शासनाने गंभीर नोंद घ्यावी आणि या सर्व व्यवहाराची चौकशी करावी अशी माझी शासनाला आग्रहाची मागणी करीत आहे.

---------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शुश्रूषा-गृह नोंदणी (सुधारणा) विधेयक.

L.C. BILL NO. XXIII OF 2005.

(A BILL TO AMEND THE BOMBAY NURSING HOMES REGISTRATION ACT, 1949.)

श्री.रणजित कांबळे ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्र. 23 मुंबई शुश्रृषा-गृह नोंदणी अधिनियम, 1949 यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडण्यासाठी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2005 चे वि.प.वि.क्र.23 मांडतो.

**उपसभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, प्रथम विधेयक पुर:स्थापनार्थ मांडले जाते त्यानंतर त्या विधेयकावर सविस्तर चर्चा होते. पण ज्यावेळी विधेयक पुर:स्थापनार्थ मांडले जाते त्यावेळी संबंधित मंत्रिमहोदयांनी त्या विधेयकाचा उद्देश व कारणे थोडक्यात मांडली पाहिजेत. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी येथे काही उल्लेख केलेला नाही हे बरोबर नाही.

**उपसभापती** : ठीक आहे.

-------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: सार्वजनिक अभिलेख विधेयक.

L.C. BILL NO. XXII OF 2005.

(A BILL TO REGULATE THE MANAGEMENT, ADMINISTRATION AND PRESERVATION OF PUBLIC RECORDS OF THE STATE GOVERNMENT, LOCAL AUTHORITIES, PUBLIC SECTOR UNDER-TAKINGS, STATUTORY BODIES AND CORPORATIONS, COMMISSIONS AND COMMITTEES CONSTITUTED BY THE STATE GOVERNMENT AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.राणा जगजितसिंह पाटील (सांस्कृतिक कार्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सन 2005 चे वि.प.वि.क्र.22 राज्य शासन, स्थानिक, प्राधिकरणे (local authorities0, सार्वजनिक क्षेत्र उपकम, वैधानिक मंडळे आणि राज्य शासनाने घटित केलेली महामंडळे, आयोग व समित्या यांच्या सार्वजनिक अभिलेखांचे व्यवस्थापन, प्रशासन आणि जतन यांचे विनियमन करण्यासाठी आणि तत्संबंधित व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, सार्वजनिक अभिलेख आणि राज्य पुराभिलेख याचे महत्व वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. सन 1993 मध्ये केंद्र सरकारने पब्लिक ॲक्ट मंजूर केलेला आहे. परंतु हा ॲक्ट फक्त केंद्रीय कार्यालयांसाठी आणि युनियन टेरिटरीमध्ये लागू आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील....

रायपूर येथे भरलेल्या, भारतीय ऐतिहासिक अभिलेख आयोगाच्या 58 व्या अधिवेशनामध्ये ठरविण्यात आले की, प्रत्येक राज्याने गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या धर्तीवर स्वत:चा ॲक्ट बनवावा आणि त्यानुसार हा ॲक्ट तयार करण्यात आला आहे. ज्या ठिकाणी पब्लिक रेकॉर्ड आहे, त्या ठिकाणी ऑफिसरपैकी एका व्यक्तीची नेमणूक त्या रेकॉर्डचे जतन करण्यासाठी करावयाची आहे. सार्वजनिक अभिलेखांशी संबंधित बाबींवर राज्य शासनाला सल्ला देण्यासाठी आणि प्रस्तावित कायद्याच्या तरतुदींची योग्य अंमलबजावणी करण्यासाठी, राज्य पुराभिलेख सल्लागार मंडळ घटित करण्याचे प्रस्ताविलेले आहे. सार्वजनिक दस्ताऐवज महाराष्ट्राच्या बाहेर नेता येणार नाही असा या विधेयकाच्या माध्यमातून निर्णय घेत आहोत. 100 वर्षांपेक्षा जी जुनी रेकॉर्डस् आहेत ती या विधेयकाद्वारे नष्ट करता येणार नाहीत. ॲक्टचे उल्लंघन केले तर 10 हजार रुपये दंड आणि 5 वर्षांच्या कारावासाच्या शिक्षेची तरतूद केलेली आहे. जतन करण्यात आलेले जे अभिलेख आहेत त्याबाबत मी सांगू इच्छितो की, 1398 मधील फारसी भाषेतील फजलनामा उस्मानाबाद जिल्हयातील परांडा तालुक्याच्या ठिकाणी लिहिण्यात आला आहे. ईस्ट इंडिया कंपनी भारतात आल्यानंतर सुरत फॅक्टरीच्या माध्यमातून डायरी लिहिण्याची पध्दत होती. त्यामुळे 1630 सालातील डायरी आज आपल्याकडे उपलब्ध आहे. 1832 मध्ये "दर्पण" नावाचे पहिले मराठी वर्तमानपत्र प्रकाशित झाले, त्या वर्तमानपत्राची कॉपी आपल्याकडे आहे. हा ॲक्ट केंद्र सरकारच्या ॲक्टप्रमाणे तयार केलेला आहे. मी आता जे विधेयक या ठिकाणी मांडलेले आहे त्याला सभागृहाने संमती द्यावी अशी मी सभागृहाला विनंती करीत आहे.

प्रश्न प्रस्तुत झाला.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी मा.तालिका सभापती, श्रीमती सुधा जोशी )**

श्री.मधुकर सरपोतदार (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित ) : सभापती महोदया, सन 2005 चे वि.प.वि.क्र.22-महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख विधेयक, माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी मांडलेले आहे. त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

मंत्रिमहोदयांनी या विधेयकासंदर्भात माहिती देताना सांगितले की, केंद्र सरकारने 1993 मध्ये जो कायदा केला त्याच कायद्याच्या धर्तीवर एक परिषद झाली आणि त्या परिषदेमध्ये सुचविण्यात आले की, प्रत्येक राज्याने आपापल्या राज्यातील अभिलेख आणि रेकॉर्ड जतन करण्यासाठी कमिटी/मंडळ नेमावे. या विधेयकाच्या माध्यमातून सर्व महत्वाची रेकॉर्डस् जतन करण्याबाबत सुचविण्यात आलेले आहे. मंत्रिमहोदयांनी असेही सांगितले की, सर्वात पहिल्या प्रकाशित झालेल्या "दर्पण" मराठी वर्तमानपत्राच्या 1832 सालातील प्रती आपल्याकडे आहेत. मला वाटते केंद्र सरकारने कायदा केल्यानंतर खऱ्या अर्थाने आता आपण जागे झालो आहोत. परंतु महाराष्ट्र राज्याच्या दृष्टीने महत्वाचे असलेले काही पुरावे, कायदे, निर्णय किंवा कागदपत्रे आपण जतन केलेली नाहीत. 10-15 वर्षांपूर्वीचे रेकॉर्डस् ठेवण्यासंदर्भात आपल्याकडे काय कायदा आहे ? फक्त 10 वर्षापर्यंतचे रेकॉर्ड ठेवा असे सांगितले जाते. 10 वर्षापूर्वीचे रेकॉर्डस् सादर करा असा आग्रह धरला जात नाही हा सर्वसाधारण अनुभव आहे. प्रत्यक्षात त्यासाठी कायद्याची काय तरतूद आहे आणि आजपर्यंत असे रेकॉर्ड ठेवण्याची पध्दत काय आहे ? याबाबत मंत्रिमहोदयांनी सदनाला माहिती दिली असती तर बरे झाले असते. या विधेयकाच्या माध्यमातून आपण राज्यातील सार्वजनिक अभिलेख जतन करण्यासंदर्भात कायदा करणार आहोत. परंतु हे सर्व अभिलेख जतन करावयाचे ठरले तर त्यासाठी किती जागा उपलब्ध होईल ? कारण हा फार मोठा पसारा आहे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...

अशा प्रकारे सगळे पुराभिलेख सांभाळणे हे काम सोपे नाही. सर्व रेकॉर्डस सांभाळावयाचे म्हणजे त्याची काळजी चांगल्या प्रकारे घ्यावी लागणार आहे. लोकसभेची लायब्ररी आहे तशीच महाराष्ट्र विधानमंडळाचीसुध्दा लायब्ररी आहे.ही लायब्ररी सांभाळण्यासाठी नियमित नोकरवर्ग आहे. त्या ठिकाणी सगळया प्रकारची काळजी घेण्यात येत असते.पुस्तकांना वाळवी लागता कामा नये या दृष्टीने योग्य ती उपाययोजना केली जाते. सपूर्ण कागदपत्रांची आणि पुस्तकाची तपासणी केली जाते आणि सर्व व्यवस्थित आहे किंवा नाही हे पाहिले जाते.जे रेकॉर्डस आपण सांभाळणार आहोत ते मेन्टेन करण्यासाठी आपण यंत्रणा निर्माण करणार आहात आणि त्यासाठी एक प्रमुख नेमण्यात येणार आहे तसेच त्या प्रमुखाचे वेतनमान ठरविण्यात येणार आहे व त्यांची योग्य पध्दतीने काळजी घेतली जाणार आहे.अशा प्रकारे ही नवीन यंत्रणा निर्माण करण्यासाठी मान्नीय मंत्रिमहोदयांनी हे विधेयक या ठिकाणी आणलेले आहे.या साठी एकूण किती खर्च येणार आहे याविषयीची माहिती मी या विधेयकात वाचली नाही. परंतु या व्यवस्थेकरता आता किती खर्च येणार आहे ?.पुढील पाच दहा वर्षात किती खर्च येणार आहे.? महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पामध्ये त्याची तरतूद करण्यात येणार आहे काय ? आणि जर तरतूद होणार असेल तर ती किती होणार आहे यासंबंधीची माहिती दिली गेली पाहिजे. सगळा पुराभिलेख सांभाळण्याकरता जी यंत्रणा निर्माण करण्यात येणार आहे त्या यंत्रणेची तत्परता काय राहणार आहे ? त्यांची योग्यता किती असणार आहे ?. या यंत्रणेची स्ट्रेंग्थ किती राहणार आहे ? यासंबंधीची संपूर्ण माहिती दिली पाहिजे.आज ताबडतोबीने कायदा अंमलात आणला तर ही संपूर्ण व्यवस्था कशी होणार आहे ? हे लेख सांभाळणे केवळ मुंबईपुरतेच मर्यादित राहणार नाही.मुंबई आणि महाराष्ट्रातील बाकीच्या 32 जिल्हयामधील रेकॉर्डस आपल्याला सांभाळावयाचे आहेत.निरनिराळया समित्यांचे सुध्दा रेकॉर्ड सांभाळावयाचे आहे. महाराष्ट्र विधानमंडळाच्या ज्या निरनिराळया समित्या आहेत त्यांचे रेकॉर्ड येथे सांभाळले जाते. परंतु इतर ज्या समित्या आहेत त्यांचे रेकॉर्ड सांभाळावयाचे असेल तर त्या करिता किती मोठी यंत्रणा निर्माण करावी लागेल ? आणि ही यंत्रणा निर्माण केली तर शासनाला ती परवडणार आहे काय ? अन्यथा भविष्य काळात ती बंद केली जाईल या बाबतीत मी कालच आपल्याला एक उदाहरण दिले होते.कोकण विकास महामंडळ आपण निर्माण केले होते परंतु नंतर ते बंद करण्यात आले होते. त्याचबरोबर विदर्भ विकास महामडळ निर्माण केले होते परंतु ते सुध्दा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ...

नंतर बंद करण्यात आले होते.विदर्भ विकास महामंडळावर कोटयावधी रुपये खर्च केल्यानंतर ते बंद करण्यात आले होते. अशा प्रकारे कोणतीही कृती करीत असतांना शासन ती कायम स्वरुपाची करणार आहे काय ? जे करणार आहे त्यामध्ये पुढे परिवर्तन करणार नाही अशा प्रकारचे निर्णय घेणार आहोत काय ? हे संपूर्ण रेकॉर्ड आपण सांभाळणार आहोत त्याला आग लागणार नाही, ते जळून जाणार नाही, त्याला वाळवी लागणार नाही, त्या संदर्भात प्रतिबंधात्मक इलाज करुन ते रेकॉर्ड चांगल्या अवस्थेत ठेवले जाईल. अशा प्रकारची व्यवस्था या विधेयकात करण्याची आवश्यकता होती. परंतु ती करण्यात आल्याचे माझ्या वाचनात आले नाही. मला शासनाला असे सांगावयाचे आहे की, पुराभिलेख सांभाळणे ही अत्यंत चांगली गोष्ट आहे.संपूर्ण रेकॉर्ड सांभाळणे ही आवश्यक गोष्ट आहे. मागचा संदर्भ कोठेही द्यावा लागतो आणि हा संदर्भ देत असतांना पूर्वीच्या रेकॉर्डचा उपयोग होऊ शकतो, त्याचा चांगला वापर होऊ शकतो हे जर सत्य असेल तर त्यासाठी कोठून व्यवस्था करणार आहात ? यासाठी आकस्मिकता निधीतून व्यवस्था करणार आहात काय ? याबाबतीत माहिती दिली नाही.. माननीय मंत्रिमहोदयांनी हे विधेयक येथे आणलेले आहे ही चांगली गोष्ट आहे. त्याचे मी मोठया मनाने स्वागत करतो. परंतु ही व्यवस्था चांगल्या प्रकारे निर्माण करण्यात यावी आणि भविष्य काळात ती चांगल्या प्रकारे सांभाळली जावी ,त्याला भविष्य काळात धोका निर्माण होता कामा नय असे मला सांगावयाचे आहे.शासनाला वाटले म्हणून ही पध्दत बंद करता कामा नये .त्यासाठी जो कर्मचारी वर्ग नेमण्यात येणार आहे. त्यांना त्यांच्या नोकरीची शाश्वती दिली जाणार आहे काय? या कामासाठी जे कर्मचारी नेमण्यात येणार आहे त्यांची बदली होणार आहे काय ? शासकीय कर्मचारी म्हणून त्यांची नेमणूक होत असताना एका ठिकाणचा कर्मचारी काढून दुस-या ठिकाणी आणि दुस-या ठिकाणचा कर्मचारी काढून तिस-या ठिकाणी नेमला जातो. अशा प्रकारे जर या कर्मचा-यांच्या बाबतीत झाले तर ते बरोबर नाही. स्पेशल कामासाठी नेमण्यात आलेले हे कर्मचारी आहेत. त्यांच्या सुध्दा बदल्या केल्या तर त्यांच्या कामावर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे.खास बाब म्हणून त्याकडे शासन पाहणार आहे काय ?या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांनी माहिती द्यावी.मी अगोदरच सागितले आहे की, ही कल्पना चागली आहे तसेच कायदा सुध्दा चांगला आहे. परंतु अंमलबजावणी चांगल्या प्रकारे झाली पाहिजे. मुख्यमंत्री आश्वासन देतात परंतु इतर अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करतात .त्यामुळे लोकप्रतिनिधींना

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार ....

या ठिकाणी भांडावे लागते अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.माननीय मुख्यमंत्र्यांचा शब्द या शासनात पाळला जात नाही तेव्हा हे विधेयक मंजूर झाल्यानंतर पुराभिलेख्यांची काळजी घेण्याचा जर प्रसंग आला तर त्याचे पुढे काय होईल याची मला काळजी वाटते. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदया, अशा प्रकारच्या विधेयकाची खरे तर या अगोदरच आवश्यकता होती. या संदर्भात मला दोन मुद्दे मांडावेसे वाटतात. पहिली गोष्ट म्हणजे पुराभिलेख हे ज्या अवस्थेमध्ये आज महाराष्ट्राच्या ठिकठिकाणच्या भागामध्ये विखुरलेल्या स्थितीत आहेत, हे विधेयक ज्या क्षणी अमलात येईल त्याबरोबर त्याचे मायक्रोफिल्मिग करून घेऊन त्याच्यावरील जो सर्व आशय आहे त्याचे जतन सीडीच्या रूपाने होणे आवश्यक आहे. आता ते पुराभिलेख कोणत्या अवस्थेत आहेत हे प्रथमत: पाहिले गेले पाहिजे. कारण त्यामध्ये पडझ ाड फार मोठ्या वेगाने होत असते. म्हणून त्याचे मायक्रो फिल्मिंग करून घेतले तर त्याचा जास्तीत जास्त उपयोग संशोधकांना होऊ शकेल असे मला वाटते.

दुसरा मुद्दा असा आहे की, आपण या विधेयकामध्ये म्हटलेले आहे की, हे पुराभिलेख आज ज्या अवस्थेमध्ये आहेत ... 7 नंबरच्या मुद्यामध्ये येथे म्हटलेले आहे की, '..अभिलेख अधिकारी, त्याच्या ताब्यात असलेले कोणतेही सार्वजनिक अभिलेख, अनधिकृतपणे काढून टाकले जाणे, नष्ट केले जाणे, विलोपित केले जाणे वा त्यात फेरफार केले जाणे याबद्दलचा अहवाल देतील आणि त्याबाबत आवश्यक अशी कारवाई करतील. याबद्दल देखील आपण ताबडतोब एक आढावा संपूर्ण जिल्ह्याजिल्ह्यात घेणे अत्यावश्यक राहील. येथे मला एक उदाहरण द्यावेसे वाटते की, सातारा जिल्ह्यातील कराड येथे जे इदगाह मैदान आहे तेथून जवळच वैभव लक्ष्मीच्या मंदिरामध्ये असणारे अनेक शिलालेख विस्कळीत स्वरूपामध्ये ठिकठिकाणी दगडांमध्ये पडलेले आहेत. त्या शिलालेखांवर देवीच्या प्रार्थना आहेत, या बद्दल देखील अनेक तपशील असणारे ऐतिहासिक ग्रंथ आजही उपलब्ध आहेत. परंतु हे शिलालेख तुकडे पडलेल्या अवस्थेत असताना आपले अभिलेख अधिकारी ते स्वत:च्या ताब्यात कसे घेणार आणि त्याचे जतन कसे करणार, याची कार्यपद्धती देखील सुनिश्चित करणे अतिशय आवश्यक आहे असे मला वाटते. पुराभिलेखांच्या संबंधात बोलत असतानाच अनेक पुराभिलेख येथून चोरून नेऊन त्याचा दुसरीकडे एक ॲंटिक म्हणून गैरवापर केल्याची देखील अनेक उदाहरणे आहेत. म्हणून पुराभिलेख जोडून पाहून त्याचा आशय, पहिल्यापासून शेवटपर्यंतचा त्याचा भाग तेथे उपलब्ध आहे काय हे पाहिले गेले पाहिजे. कारण आज अनेक ठिकाणी छिन्नविछिन्न अवस्थेत हे पुराभिलेख सापडताहेत म्हणून त्यांचा एक स्टेटस् रिव्ह्यू, सद्य: परिस्थितीबद्दलचा आढावा हा घ्यावा लागणार आहे आणि हे हा कायदा अमलात आणला जात

.... एफएफ 2 ...

डॉ. गोऱ्हे ....

असतानाच घेणे अति आवश्यक आहे असे मला वाटते. जी गोष्ट आपण ताब्यात घेत आहोत त्याचे जतन, जपणूक करण्याची क्षमता देखील शासकीय अधिकाऱ्यांमध्ये निर्माण करण्याचा दृष्टीकोनातून देखील आपल्याला खास प्रशिक्षित असलेले अधिकारी नेमले गेले पाहिजेत असे मला आवर्जून, खास करून सांगावेसे वाटते. एवढे बोलून या विधेयकाचे मी स्वागत करते व भाषण संपविते.

****

...... एफएफ 3 ...

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदया, आपण कायदा करतो आहोत असे असताना मला हे समजत नाही की, कायदा करताना आपण इतकी घाई, गडबड का करीत आहोत ? कायदा करताना चुकीचा कायदा करायचा आणि तोच पाळायचा, आणि परत आम्हा सदस्यांना यावर बोलू नका म्हणून आग्रह करायचा ही कोणती पद्धत आहे हेच मला समजत नाही. म्हणजे आपण या महाराष्ट्राचे वाटोळे करायचेच असा निर्णय आपण केला असेल तर तसे स्पष्टपणे सांगितले तर मग सगळ्यांनी मिळून तसा निर्णय करावा, मग आमचीही काही हरकत त्याला असणार नाही.

सभापती महोदया, यामध्ये सगळ्यात महत्त्वाची गोष्ट अशी आहे की, हा कायदा अत्यंत महत्त्वाचा आहे. महाराष्ट्राचे रेकॉर्ड आणि पुराभिलेख म्हणजे ज्याला ऐतिहासिक महत्त्व आहे अशा गोष्टी या दोन वेगळ्या गोष्टी आहेत असे असताना या दोन्ही गोष्टी एकत्रित का यामध्ये घातल्या आहेत हेच मला समजत नाही. एखादा ऐतिहासिक दस्तऐवज आहे, ज्याला काही पारंपारिक मूल्य आहे, तो वर्षानुवर्षे टिकला पाहिजे, तो इतिहासाचा एक पुरावा होऊ शकतो. तो आणि आपला दैनंदिन रेकॉर्ड हे दोन्ही एका कायद्यात आणून एका रेकॉर्ड ऑफिसरला, जरी येथे पुराभिलेख अधिकारी वेगळा असला तरी, एकाच कायद्याच्या अनुषंगाने आपण एक करतो आहोत ही सर्वात मुलभूत अशी पहिली चूक आपण करतो आहोत. Day to day record म्हणजे दैनंदिन कार्यवाहीचे रेकॉर्ड हे वेगळे असते. त्याची day to day फंक्शनिंगची पद्धत वेगळी असते. आणि जो काही 100-200-500 वर्षे रेकॉर्ड टिकला पाहिजे तो पुराभिलेख, त्याला काही ऐतिहासिक महत्त्व आहे आणि मग त्याचे प्रिझर्वेशन असेल, त्याचे आयडेंटिफिकेशन असेल, त्याचे जे काही महत्त्व असेल, हा सारा कंसेप्टच माझ्या दृष्टीकोनातून वेगळा आहे. पण आपण सरळ सरळ घाईगडबडीने या दोन्ही गोष्टी यामध्ये एकत्रित केलेल्या आहेत. समजा, मी उद्या आपल्या मंत्री महोदयांना एक पत्र दिले तर ते पत्र .. मी आपल्याला वाचून दाखवितो की, यामध्ये आपण काय तरतूद केलेली आहे ती. रेकॉर्ड म्हणजे काय हे सांगताना आपण यामध्ये म्हटले आहे की, "Public records" includes,- (i) any document, manuscript and file;". म्हणजे मी उद्या मंत्री महोदया, सन्माननीय विजयदादांना एक पत्र जरी लिहिले की, मला आपल्या माळशिरसला भेट द्यायची आहे .. तर It can be a record कारण any document is a

..... एफएफ 4 ..

श्री.श्रीकांत जोशी ..

record. आता हे सगळे सांभाळायचे का? परंतु मी विजयदादांवर त्यांनी सहकार क्षेत्रामध्ये किती चांगले काम केले आहे या विषयी एक चांगला लेख लिहिला असेल, तर तो लेख कदाचित पुढील 20-25 वर्षानंतरही उपयोगी ठरू शकतो. पण एखाद्या अकलूजची 100 वर्षाची एखादी ऐतिहासिक पुरावा असलेली गोष्ट असेल, आता डॉ. अशोक मोडक यांनी इतिहास संशोधनामध्ये एक चांगले काम केले आहे. तर.. That paper has to be preserved for 100 years. आपण मात्र पब्लिक रेकॉर्डमध्ये 'एनी फाईल' असे म्हटले आहे. इतका साधा, सरळ कायदा करून तो कायदा परिपूर्ण होणार आहे काय ? याचा आपण विचार करावा. हाच प्रश्न पहिल्यांदा मला माननीय मंत्री महोदयांना करावयाचा आहे. या विधेयकामध्ये आपण पब्लिक रेकॉर्डस्ची जी व्याख्या दिलेली आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, "Public records" includes,- (i) any document, manuscript and file;" यामध्ये प्रिझर्वेशनच्या अगोदर काही ना काही स्क्रिनिंग करण्याची गरज आहे की नाही ?

( यानंतर श्री. सरफरे ..... जीजी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. श्रीकांत जोशी...

आणि ते स्क्रिनिंग करायचे असेल तर त्याची ॲथॉरिटी कुठली? आणि त्यामध्ये आपण फक्त पब्लिक इंपॉर्टन्सच्या गोष्टी ठेवणार आहोत, पब्लिक रिलेटेड गोष्टी ठेवणार आहोत. कायद्याविषयी महत्वाचे सल्ले ठेवणार आहोत. साधा कुठलाही कागद, एखादी पावती जरी असली तरी तिचे रेकॉर्ड ठेवून आपल्यावरील काम वाढविणार आहोत. Those institutions only have great future which have good record, record-keeping and good history, ज्यांचा इतिहास चांगला नसतो त्यांचे भविष्य चांगले नसते. त्यामुळे रेकॉर्ड किपिंगचे महत्व आपल्याला निश्चितपणे सांगू शकतो. परंतु कायदा करीत असतांना पब्लिक रेकॉर्डमध्ये "एनी डॉक्युमेंट" आपण लिहिले आहे हे "एनी डॉक्युमेंट" लिहीत असतांना कायद्याच्या दृष्टीने आपण विचार केला आहे काय? या माझ्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर आपण द्यावे. त्याचप्रमाणे "Any microfilm, microfiche and facsimile copy of a document," म्हणजे एखाद्याने जर डिस्टॉर्टेड इमेज केली तर तीसुध्दा थांबवून ठेवायची कां? याचा सुध्दा विचार केला पाहिजे. कारण पुढील काळातील जग हे कॉम्प्युटरचे जग आहे. याची आपल्याला कल्पना नाही कारण आपण दिसतो त्यापेक्षा अधिक जास्त विद्रुप केले जाऊ शकतो. या सगळया फिल्म्स रेकॉर्ड म्हणून आपल्याला ठेवायच्या आहेत कां? मला असे वाटते की, या सर्वांचे रेकॉर्ड ठेवण्यापूर्वी त्याला "ॲक्सेप्टेबल रेकॉर्ड" , "ॲक्सेप्टेबल नॉर्म्स असलेले रेकॉर्ड" हा शब्द कुठेतरी वापरावयास पाहिजे होता. दुर्दैवाने तो वापरलेला नाही. मला त्याच्याहीपुढे असा महत्वाचा प्रश्न विचारावयाचा आहे की, या रेकॉर्ड किपिंगमध्ये फक्त स्टेट गव्हर्नमेंट एवढे समाविष्ट नाहीतर इतर सर्व संस्थां समाविष्ट आहेत. त्यामध्ये म्युनिसिपल कॉर्पोरेशन, जिल्हापरिषद सर्वांचा समावेश केलेला आहे. आणि त्याठिकाणी रेकॉर्ड ऑफिसर म्हणून कुणाला नेमत आहोत? "record officer" means the officer nominated by the records creating agency under sub-section (1) of section 5". जिल्हा परिषदेची, महानगरपालिकेची, नगरपालिकेची अशी परिस्थिती आहे की, त्यांच्याकडे सीईओ नाहीत. त्यांच्या लोकांना प्यायला पाणी नाही, त्यांच्याकडे बसायला माणूस नाही अशी अत्यंत भयावह स्वायत्त संस्थांची परिस्थिती आहे. मराठवाडयातील 52 नगरपालिकांपैकी 32 नगरपालिकांमध्ये पकडून आणलेले ॲडिशनल सीईओ होते. तिथे हेड ऑफ दी डिपार्टमेंट नाहीत. मी आपल्याला दाखवतो की, लोकल ॲथॉरिटी आणि इतर बॉडीमधील परिस्थिती ही माणसांची स्टारव्हेशन अशापध्दतीची परिस्थिती आहे. गेल्या पाच वर्षात कुठलीही रिक्रुटमेंट आपण करावयास तयार नाही. अशा परिस्थितीत त्या जिल्हा परिषदा, त्या नगरपरिषदा त्या स्वायत्त संस्था आणि

शेकडो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. श्रीकांत जोशी...

महामंडळे आहेत. ती महामंडळे एकेक आपण बंद करीत निघालो आहोत. त्या महामंडळाचे रेकॉर्ड ऑफिसर नेमण्याचा अधिकार आपण कुणाला दिला आहे? "record officer" means the officer nominated by the records creating agency under sub-section (1) of section 5".

त्या महामंडळाचा जो कुणी सीईओ असेल तो रेकॉर्ड ऑफिसर नेमेल. ते रेकॉर्ड हे शासनाचे कायमचे रेकॉर्ड म्हणून जतन करण्याचे या कायद्याने आपण ठरविले आहे. हे करण्याविषयी आग्रह नाही. परंतु हे करायला पाहिजे हे निश्चित आहे. परंतु हे करीत असतांना सलग सरळ रेकॉर्ड करायचे, ते रेकॉर्ड कुठे जतन करायचे याविषयी स्पष्टता नाही. ती स्पष्टता यामध्ये आणावी लागेल. काही रेकॉर्ड एका मोठया कॉप्युटरमध्ये फोटोच्या स्वरुपात डाऊनलोड करुन ठेवता येऊ शकते. ते रेकॉर्ड रेफरन्ससाठी घेता येऊ शकते. त्याची प्रिंट आऊट काढता येऊ शकेल. परंतु काही रेकॉर्ड हे ओरिजिनल स्वरुपात ठेवायला पाहिजे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, 1947 पासून जवळपास 58 वर्षे स्वातंत्र्य प्राप्तीला झाली आहेत. परंतु रजिस्ट्रीच्या बाबतीत रेकॉर्ड आजपर्यंत परिपूर्ण झाल्याचे सांगता येणार नाही. मी आपल्याला कित्येक उदाहरणे देऊ शकतो. एकदा एन.ए. झालेली जमीन पुन्हा ॲग्रिकल्चर होते. व पुन्हा ती एन.ए. होते. जसे पाहिजे तसे त्यामध्ये गोंधळ होतात. पुण्याचा एफएसआय घोटाळा तुम्हाला काय दाखवितो? टीडीआरचा गोंधळ कसा झाला? There was no proper record in Pune Municipal Corporation. पुणे महानगरपालिकेचे रेकॉर्ड किपिंग चांगले असते तर महत्वाच्या वेळेस त्या टीडीआरचा वापर नीट करता आला असता. अशापध्दतीने करोडो रुपयांचा लँडचा गोंधळ झाला. ज्याठिकाणी लँड रेकॉर्ड हा शब्द आहे, लँड रेकॉर्ड डिपार्टमेंट आहे, त्या ठिकाणी प्रचंड गोंधळ आहे. मला कळत नाही हे लँड रेकॉर्ड करीत असतांना व हा कायदा करीत असतांना व त्याची अंमलबजावणी करीत असतांना काहीतरी एक सायन्स वापरायला पाहिजे होते. हा सायन्स गुड गव्हर्नन्स् असायला पाहिजे. गुड गव्हर्नन्स्साठी हा कायदा आणला आहे कां? असेल तर या कायद्याची अे.बी.सी.डी. प्रमाणे निश्चित कॅटगरी करायला पाहिजे. आपण नेहमी सांगतो की, कोणताही कायदा करीत असतांना को-गव्हर्नर्स यासाठी वेगळा कायदा असतो. सर्व्हिस सेक्टर म्हणजे जिथे एक्सपांडेड गव्हर्नन्स् म्हणतो गव्हर्नमेंट फॉर द वेल्फेअर ऑफ द सोसायटी म्हणून आपण चार ठिकाणी काम करतो. अशा ठिकाणच्या कायद्याचे अस्तित्व थोडेसे वेगळे सॉफ्ट व थोडेसे मॉडरेट व फ्लेक्झिबल असायला पाहिजे. कारण तो कायदा कडक ठेवता येणार नाही. कारण जेवढया वेल्फेअर

डॉ. श्रीकांत जोशी...

ॲक्टिव्हिटीज ठेवतो त्या टाईमबाऊंड असतात, कायम स्वरुपी नसतात. त्यापुढे गव्हर्नमेंटची ईक्विटी आहे, गव्हर्नमेंटचा 100 टक्के कंट्रोल नाही परंतु Government in partnership with somebody ... म्हणून काही ठिकाणी काम करु शकते. ज्याची मॅनेजमेंट पूर्णपणे शासकीय नाहीतर अशासकीय आहे व त्याठिकाणी गव्हर्नमेंटचा सपोर्ट आहे अशा ज्या संस्था आहेत त्याठिकाणी गव्हर्नमेंटची फक्त ईक्विटी आहे. तेथील कायदे जाचक केले तर तेथील इंस्टिटयूट उभी राहू शकणार नाही अशी परिस्थिती आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी . . . .

म्हणून को-गव्हर्नन्स्, सर्व्हीस सेक्टर आणि गर्व्हमेंट हॅविंग पार्टीसिपेशन या तीन गोष्टींचे कायदे नेहमी वेगळे केले पाहिजेत हा माझा आग्रहाचा मुद्दा आहे. पण आपण येथे सगळयांना एका माळेमध्ये घेतलेले आहे. आपण यापध्दतीचे कायदे जेव्हा इम्प्लीमेंट करण्याचा प्रयत्न कराल, त्यावेळेस नवीन स्वायत्त महामंडळामध्ये कुठलीही एखादी मल्टीनॅशनल कंपनी किंवा कोणताही एखादा टाटासारखा मोठा सेक्टर तुमच्याबरोबर या कायद्याकडे बोट दाखवून येईल आणि मग तेथे सांगावे लागते की, या मंडळाला आमचे कायदे लागू नाहीत. म्हणून माझे म्हणणे आहे की,रेकॉर्ड किपींगच्या बाबतीत आपण ज्या घाईगर्दीने, ज्या घिसाडघाईने करीत आहात, ते बरोबर नाही. हे स्टॅण्डर्स् ठरविण्याचे अधिकार कोणाला आहेत ? तर राज्य शासनाला आहेत आणि राज्य शासनामध्ये कोणाला आहेत तर कल्चरल सेक्रेटरीला आणि कल्चरल सेक्रेटरी, संपूर्ण महाराष्ट्रा तील सगळे सुपरविजन, सगळे सर्व्हेलन्स्, सगळे नेटकेपणे करण्याचे काम हा एकटाच करणार आहे अशा पध्दतीचे आपण या कायद्यात म्हटलेले आहे. तुम्ही संपूर्ण महाराष्ट्र डोळयासमोर ठेऊन एक गोष्ट सांगावी की, मुंबईमध्ये कल्चरल सेक्रेटरी बसणार असून दिवसाचे आठ तास काम करणार आहे आणि रेकॉर्ड किपींगच्या बाबतीत ग्रामीण भागापासूनचे सर्व निर्णय तोच घेणार आहे. निर्णयाच्या बाबतीत ॲपिलेट अधिकारी तोच असणार आहे. तोच डायरेक्शन करणार आहे आणि यापध्दतीने या कायद्याची अंमलबजावणी होऊन आमच्या खेडयापाडयात असलेल्या शेकडो जनतेला आपण खऱ्या अर्थाने चांगले रेकॉर्ड देऊ शकणार आहोत का ? आज खऱ्या रिपोर्ट किपिंगची गरज कुठे आहे ? तर ती तीन ठिकाणी आहे. एक म्हणजे जमिनीच्या बाबतीत, दुसरी म्हणजे माणसांच्या बाबतीत. खरे म्हणजे पहिला क्रमांक माणसांच्या बाबतीत असावयास पाहिजे पण माणसांच्या बाबतीतील रेकॉर्ड बऱ्यापैकी आहे म्हणजे यामध्ये माणसे स्वत: हरवून गेली आहेत असे कुठे झालेले नाही. इकडे-तिकडे कुठे गेली असतील तर ती सापडतात म्हणून मी त्याला पहिला क्रमांक दिला नाही. पण जमिनीचे घोळ प्रचंड प्रमाणात आहेत. तिसरा क्रमांक अदर इन्स्टीटयुटच्या बाबतीत खरे म्हणजे रेकॉर्ड व्यवस्थित ठेवण्याची गरज आहे. आज इतके वर्षे झाली तरी आजही आपण महाराष्ट्रातील मतदारांना चांगल्या प्रकारचे आय कार्ड देऊ शकलो नाही. सिटीझन रजिस्टरची कल्पना पुढे आली, पण अजून आपल्याकडे सिटीझन रजिस्टरचे रेकॉर्ड तयार झालेले नाही आणि आता आपण म्हणत आहोत की, आपण सर्व रेकॉर्ड तयार करणार आहोत. दुसरी गोष्ट

. . . .2एच-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी . . . .

म्हणजे शासनाच्या जमिनी ज्यापध्दतीने हडपल्या जातात. मघाशी एका प्रश्नाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्री सभागृहामध्ये असताना सन्माननीय सदस्य सांगत होते की, येथे बघता-बघता लोक आले आणि त्यांनी झोपडया बांधल्या. 2 चे 3, 3 चे 4, मनोरा येथे बघा सात रो झाल्या, आठ रो झाल्या वगैरे. याच्या डिटेल्समध्ये गेल्यानंतर असे लक्षात येत होते की, There was no record available for the human-beings. आपल्याकडे रोज किती माणसे येतात याचे रेकॉर्ड नाही, आलेल्या माणसांचे रेकॉर्ड आहे का ? आपल्याकडे तसे रेकॉर्ड नाही. आपण हळूहळू रेकॉर्डलेस, गर्व्हनन्स्लेस परिस्थितीकडे जात आहोत आणि पुन्हा अशा पध्दतीचे कायदे करुन यामध्ये अजून कॉम्प्लीकेशन्स वाढण्याची शक्यता आहे. माझी या निमित्ताने आपल्याला विनंती आहे की, एकदा चांगल्या टीमकडे जाऊन हा कायदा कसा असला पाहिजे हे ठरविले पाहिजे. There should be a different law for Bombay. बॉम्बेच्या रेकॉर्ड किपींगचा कायदाच कदाचित तुम्हाला वेगळा करावा लागेल. मेट्रोपॉलीटन सिटीचा रेकॉर्डस् तुम्हाला वेगळया पध्दतीने ठेवावा लागेल आणि त्याचे कायदे सुध्दा वेगळया पध्दतीने करावे लागतील. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील कायदे सुध्दा तुम्हाला वेगळया पध्दतीने करावे लागतील. ग्रामीण भागामध्ये अशी परिस्थिती असते की, जमिनी दुसऱ्याच्या नावावर दाखविल्या जातात. 7/12 च्या उताऱ्यावरुन एकमेकांचे खून सुध्दा पडण्याची शक्यता असते. आपले म्हणणे आहे की, याचे सगळे रेकॉर्ड असले पाहिजे. आज सावकारीचा विषय निघाला होता. या विषयामध्ये कित्येक ठिकाणी रजिस्ट्री केलेल्या आहेत, तशा त्या झालेल्या आहेत ही वस्तुस्थिती आहे. ज्यावेळेला याचे रेकॉर्ड किपींग होईल,यामध्ये ट्रान्स्परन्सी आणण्याबाबतही उल्लेख आहे. जेव्हा तुम्ही सगळया रजिस्ट्री लोकांना पहावयास द्याल तेव्हा मग लोकांच्या लक्षात येईल की, सावकारीमध्ये शेतकऱ्यांच्या किती पध्दतीने रजिस्ट्री केलेल्या आहेत आणि मी हे मागेही सांगितले होते. म्हणून मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना सूचना केली होती की, यापुढे सेलर आणि परचेसर या दोघांचेही फोटो लावण्याचे कम्पलसरी करावे. त्यांनी ती सूचना स्विकारली आणि त्यादृष्टीने कार्यवाही सुरु झाली पण त्याची अंमलबजावणी अजून पूर्ण झालेली नाही. ज्यावेळेस सेल-डीडवर दोघांचेही फोटो लावणे कम्प्लसरी होईल, त्यावेळी काही सरकारी अधिकाऱ्यांच्या, काही पुढाऱ्यांच्या कर्मचाऱ्यांच्या, ड्रायव्हरच्या, शिपायाच्या लक्षात येईल की, त्यांच्या नावावर शेकडो एकर जमीन आहे आणि मग ते खुष होतील की,अरे वा,आमच्या साहेबांनी

. . . .2एच-3



APR/D/RJW 14:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी . . . .

आमच्या नावावर 100 एकर जमीन घेऊन ठेवलेली आहे याची कल्पनाच नव्हती. यामुळे अशा पध्दतीचे रेकॉर्डस् लक्षात येऊ शकतील. हे सगळी रेकॉर्डस् समोर येतील, तेव्हा त्याचे ॲनलायझिंग, त्याचे प्रॉपर स्टोअरेज आणि त्यावरील ॲक्शन टेकन सुध्दा कोणी ना कोणी करावयास पाहिजे. फक्त एक कोणीतरी रेकॉर्ड ऑफीसर नेमावयाचा आणि त्याच्या हातात सगळे द्यावयाचे. मला असे वाटते की, हे घाईगडबडीने, घिसाडघाईने केलेले हे बिल आहे. यामध्ये पुरेसा वेळ देऊन, याचे नीट सेपरेशन करुन लॅण्ड रेकॉर्डचे वेगळे कायदे करावयास पाहिजेत. हयुमन-बिईंगच्या रेकॉर्डसाठी वेगळे कायदे करावयास पाहिजेत. कुठे ना कुठे तरी माणसांचे रेकॉर्ड आपण जतन करण्याची गरज आहे. हयुमन इंडीकेटरचा विषय निघाला. सगळया ठिकाणी सांगितले की, या-या जिल्हयामध्ये हयुमन डेव्हलपमेंट इंडीकेटर अतिशय कमी आहे. का कमी आहे ? शेतीच्या बाबतीतील रेकॉर्ड कुठेही व्यवस्थितपणे उपलब्ध होत नाही. शेती खात्याच्या रेकॉर्डच्या बाबतीत तर वेगळाच गोंधळ आहे. आमचे माननीय मंत्री श्री.राणा जगजितसिंह पाटील येथे उपस्थित आहेत. त्यांनाही विचारावे. कुठेही एकच दर, खरीपला एकच दर पाठवतात. आतापर्यंत मला कधीही शेतीच्या बाबतीत गाववाईज्, एकरवाईज्, 7/12 वाईज् रेकॉर्ड सापडलेले नाही. म्हणजे हे बोगस रेकॉर्ड आपल्याला सांभाळून ठेवावयाचे आहे का ? दादांची बैठक असेल तेव्हा जिल्हा परिषदेची एक फाईल येते. पण त्या फाईलचा आणि प्रत्यक्ष कामाचा काहीही संबंध नसतो. पण रेकॉर्ड म्हणून सांभाळून ठेवा अशी स्थिती असते. म्हणून मला असे वाटते की, ख-या अर्थाने हे जे रेकॉर्ड प्रिझर्व करावयाचे आहे, यामध्ये सुध्दा एक सायन्स असण्याची गरज आहे. बैठकीसाठी सबमिट केलेल्या कागदपत्रांचा रिॲलीटीशी काहीही संबंध नाही. व्हेरीफाईड डॉक्युमेंट वीथ ॲफीडेव्हीट स्वरुपाचे असेल आणि लॉंग टर्ममधील असेल तर त्याचे रेकॉर्ड सांभाळण्याची गरज आहे.

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (पुढे चालू...

उगीच काही ना काही फायलींगचा गोंधळ आहे. मला एका मित्राने असा प्रश्न विचारला होता की, मंत्रालयाची इंग्रजांनी व्यवस्था ही नरिमन पॉईन्टजवळ का केली, हे माहिती आहे काय ?. त्यावर मी म्हटले की, त्या ठिकाणी चांगली हवा येत असेल, पाणी असेल, म्हणून तेथे व्यवस्था केली असेल. त्यावर तो म्हणाला, ते कारण नाही. मंत्रालयाजवळ अरबी समुद्र आहे. मंत्रालयामध्ये तुम्ही जे कागद देता, ते कागद फेकून द्यायच्या लायकीचे असतात. दुसरे कारण मंत्रालयामध्ये काहीच काम होत नाही. आम्ही हजारोंनी पत्रे देतो, त्याची उत्तरे देखील येत नाहीत. ते कागद उचलतात आणि अरबी समुद्रामध्ये नेऊन टाकतात. हे मला त्यांने गमतीने सांगितले. तो नेहमी सांगतो की, मंत्रालय कुठे असावे ? तर ते अरबी समुद्राच्या शेजारी असावे. कारण दुसरीकडे कोठेही एवढे कागद पचणार नाहीत. अरबी समुद्र एवढा मोठा आहे की, तो ते कागद गिळून टाकतो. मला असे वाटते की, अशा पध्दतीचा कायदा उपयोगाचा नाही. हे विधेयक चिकित्सा कमिटीकडे पाठवावे. महत्वाचा विषय आहे. त्या ठिकाणी सविस्तर चर्चा होऊ द्यावी. सगळे त्यामध्ये विषय येऊ द्यावेत. त्या सर्वांवर चर्चा होऊ द्यावी. संपूर्ण देशासाठी एक मॉडेल ॲक्ट ठरावा अशापध्दतीचा कायदा आपण करावा. कोणीतरी सांगितले म्हणून कायदा करण्याऐवजी महाराष्ट्राला एक स्वत:ची परंपरा आहे. त्याचे स्वत:च्या रेकॉर्ड आहे. पुराभिलेखाच्याबाबत सांगण्याचा माझा विषय नाही. सनमाननीय सदस्य डॉ.मोडक साहेब आणि श्री.बी.टी.साहेब त्याबाबत सांगतील. मला इतिहासाचा अभ्यास नाही. मी इंजिनियर आहे. म्हणून मॅनेजमेंटच्या दृष्टीकोनातून, बेस्ट कॉम्प्युटर सिस्टीम उभी करण्याच्या दृष्टीकोनातून मी काही सूचना करु शकतो. आपले काम सोपे होऊ शकते,आपण पेपरलेसकडे हळूहळू वळू शकू. अशा दृष्टीकोनातून आपण कायदा करावा, अशी विनंती या निमित्ताने मी करतो. आपण हे विधेयक एका वेगळया समितीकडे पाठवावे आणि त्यानंतरच विधेयक आणून कायदा करावा,अशी माझी सूचना आहे.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2...

प्रा.जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदया, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख विधेयक, 2005 या विधेयकाचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, जे इतिहास विसरतात ते इतिहास घडवू शकत नाहीत. आमच्या येणाऱ्या पिढ्यांना चांगला इतिहास घडविता यावा, या दृष्टीकोनातून जे काही लिगल डॉक्युमेंटस् आहेत, जे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, साहित्यिक या विविध दृष्टीकोनातून अत्यंत महत्वपूर्ण अशाप्रकारचे अभिलेख आहेत, त्यांचे जतन करुन ठेवण्यासाठी हे विधेयक आणलेले आहे, त्याबद्दल मी खरोखरच शासनाचे आणि मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो. महोदया, खरे पाहिले तर हा कायदा या अगोदरच व्हायला पाहिजे होता, असे सनमाननीय सदस्या डॉ.निलम गोऱ्हेताई म्हणाल्या, त्यांच्याशी मी सहमत आहे. पण विलंबाने का होईना, हे विधेयक आलेले आहे, त्याचे कायद्यामध्ये रुपांतर होत आहे, ही निश्चित स्वागतार्ह बाब आहे. अनेक गोष्टी सांगता येतील, परंतु सभागृहाचा मी जास्त वेळ घेऊ इच्छित नाही. पण ऐतिहासिक दृष्टीकोनातून महत्वाचे असलेले कागदपत्र आहेत, कायदेशीर दृष्टीकोनातून जे डॉक्युमेंटस् आहेत, ऑथेंटिक डॉक्युमेंटस् आहेत, रिलायबल डॉक्युमेंटस् आहेत, त्यांचे योग्य प्रकारे जतन करुन ठेवणे गरजेचे आहे. अजूनही शिवबांच्या काळातील अनेक डॉक्युमेंटस् बखरीच्या रुपाने आपल्याकडे आहेत. अशाप्रकारचे जे ऐतिहासिक डॉक्युमेंटस् आहेत किंवा दैनंदिन जीवनामध्ये ज्या अत्यंत महत्त्वाच्या घटना घडतात, अशी कागदपत्रे जतन करुन ठेवणे ही येणाऱ्या पिढीच्यादृष्टीने अत्यंत महत्वाची बाब आहे. ही कागदपत्रे जतन करत असतांना ती योग्य प्रकारे सुरक्षितपणे जतन केली जावीत, अत्यंत शास्त्रशुध्द पध्दतीने ती जतन केली जावीत, याची काळजी घेतली जावी. अलिकडे अनेक अत्याधुनिक अशाप्रकारची व्यवस्था उपलब्ध आहे. मग ती कॉम्प्युटरच्या माध्यमातून असेल, मायक्रो फिल्मच्या माध्यमातून असेल, सीडीच्या माध्यमातून असेल, या माध्यमातून त्याचे जतन आपल्याला करता येईल. अत्यंत मॉडर्न टेक्नॉलॉजीचा वापर करुन अभिलेख कसे सुरक्षित ठेवता येतील हे पाहिले पाहिजे. म्हणजे भावी पिढीसाठी ऐतिहासिक डॉक्युमेंट म्हणून त्यांना त्याचा संदर्भ म्हणून वापर करता येईल. आपण जे काही अभिलेख चांगले असतील, वाईट असतील ते जतन करुन ठेवणार आहेत. यामुळे येणाऱ्या पिढीला उत्कृष्ट अशाप्रकारचे मार्गदर्शन प्राप्त होणार आहे. हे या विधेयकाचे महत्व आहे, असे मला वाटते. सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी बोलताना म्हणाले की, मुंबई ही फार मोठी नगरी आहे, समुद्राच्या काठावर आहे, मुंबईचे वेगळे डॉक्युमेट

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ RJW/ D/

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे चालू.....

ठेवले पाहिजेत. मला वाटते, महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी करण्याचा तर या लोकांचा विचार नाही ना ? महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी होता कामा नये, याची जाणीव ठेवावी

यानंतर कु.थोरात....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाड....

मुंबईचे रेकॉर्ड,अभिलेखे वेगळे ठेवावेत आणि उर्वरित महाराष्ट्राचे वेगळे ठेवावेत ही बाब कोणत्याही मराठी माणसाला पटण्यासारखी नाही. मुंबईसहीत संपूर्ण महाराष्ट्राचे अभिलेखे, डाक्युमेंट्स, महत्वाची कागदपत्रे आहेत ती भविष्यात येणा-या पिढीसाठी उपयुक्त ठरणार आहेत. त्याचे उत्कृष्टपणे जतन करण्याची जबाबदारी या विधेयकाच्या माध्यमातून, कायद्याच्या माध्यमातून घेतली तर निश्चितच फायद्याचे ठरेल. त्यासाठी उत्कृष्ठ अशा प्रकारची यंत्रणा निर्माण करुन अत्यंत तज्ञ अशा प्रकारची मंडळींना त्यामध्ये नेमून या अभिलेख्यांचे जतन आणि संरक्षण करण्याचे काम शासनाच्या वतीने या कायद्याच्या माध्यमातून व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि पुन्हा एकदा या विधेयकाचे मी स्वागत करतो. धन्यवाद.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदया, महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख विधेयक, 2005 या विधेयकावर बोलण्यासाठी मी उभा आहे. सन्माननीय मंत्रिमहोदयांनी कृपाकरुन या विधेयकाचे पृष्ठ क्रमांक 5 बघावे. या पृष्ठावर सगळयात शेवटी कलम 9 दिलेले आहे. त्यात असे म्हटले आहे की, "कलम 4 किंवा कलम 8 च्या कोणत्याही तरतूदींचे उल्लंघन करणारी कोणतीही व्यक्ती पाच वर्षापर्यंत असेल इतक्या करावासाच्या शिक्षेस किंवा दहा हजार रुपयांपर्यंत असेल इतक्या दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र होईल." आता कलम 4 आणि कलम 8 चा आपण अभ्यास केला पाहिजे. कलम 4 मध्ये असे म्हटले आहे की, "कोणतीही व्यक्ती, राज्य शासनाच्या पूर्व मान्यते शिवाय, कोणतीही सार्वजनिक दस्तऐवज महाराष्ट्र राज्याच्या बाहेर नेणार नाही किंवा नेण्याची व्यवस्था करणार नाही". आणि कलम 8 मध्ये असे म्हटले आहे की, " त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये अन्यथा तरतूद केली असेल ती खेरीज करुन, कोणताही सार्वजनिक अभिलेख विहित करण्यात येईल अशा रीतीने व अशा शर्तींना आधीन राहून असेल त्याव्यतिरिक्त नष्ट करण्यात येणार नाही किंवा त्याची विल्हेवाट लावली जाणार नाही." मला वैयक्तिकरीत्या ही सगळी कलमे अतिशय महत्वाची वाटतात. सभापती महोदया, याठिकाणी कायदा तयार करतांना एक आकृतिबंध ठरला आहे. आपण जरा पान क्रमांक 7 बघावे. त्यामध्ये जे जे म्हटले आहे ते That is washed out or that is nullified. कलम 16 मध्ये असे म्हटले आहे की, "या अधिनियमानुसार किंवा त्याखाली केलेल्या नियमांनुसार, सदभावनेने केलेल्या अथवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही गोष्टीबाबत, कोणत्याही व्यक्तीविरुध्द, कोणताही दावा, खटला किंवा अन्य कायदेशीर कारवाई दाखल करण्यात येणार नाही." मला याची जरा धास्ती वाटते. कायद्यात असे म्हटले आहे की, त्यांनी केलेली कृति सद्‌भावनेने केलेली आहे. महाराष्ट्रातून कर्नाटकात हे दस्तऐवज नेले, पंजाबला हे दस्तऐवज नेले. हे दस्तऐवज दुस-या राज्यात नेले हे मी मान्य करतो पण ते सदभावनेने नेले आहेत. तेव्हा शासनाला याबाबतीत वेगळे काही म्हणावयाचे असेल तर कृपाकरुन खुलासा करावा.अमुक अमुक दस्तऐवज नष्ट केले पण ते सदभावनेने नष्ट केले असे म्हटल्याबरोबर त्या माणसाला त्या दाव्यातून, शिक्षेतून, कारावासातून, मुक्तता मिळणार असेल तर मी मघाशी म्हटल्याप्रमाणे Is it not a nullification?. हे आगोदरच्या सगळया तरतुदींवर बोळा फिरविणारे ठरेल की नाही? अशी एक शंका मला विचारावयाची आहे. हा विषय एवढया पुरता मर्यादित नाही. मध्यंतरी अंधश्रध्दा निर्मूलन विधेयकाच्या

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. अशोक मोडक....

बाबतीत जेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांच्या दालनात आमची चर्चा चालू होती. तेव्हा एक शब्दप्रयोग मला वाचायला मिळाला होता. त्याबाबतीत मी आणखी एक वेगळा आक्षेप घेतला. नशिबाने ते कलम क्रमांक 9 बहुदा आता त्या कायद्यात राहिलेले नाही. या विधेयकात कमीतकमी सदभावना ही कोणाच्याही बाबतीत असू शकते एवढे तरी मोकळेपणाने म्हटले आहे. पण त्या कायद्यात शासकीय अधिका-यापर्यंतच सदभावनेचा विषय मर्यादित ठेवण्यात आला होता. मी त्यावर येथे जास्त भाष्य करीत नाही. कारण तो विषय वेगळा आहे. पण कायद्याचा पॅटर्न म्हटल्यानंतर जर "सद्भावनेचे कलम " सगळीकडेच असेल तर सदभावनेने एखादी कृति केली तर त्याला एक्झम्शन मिळणार आहे कां ? यासंबंधात मंत्रिमहोदयांनी खुलासा केला तर मला वाटते बरे होईल.

------

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जगजितसिंह राणा (सांस्कृतिक राज्यमंत्री) : माननीय सभापती महोदय, सर्वप्रथम एका गोष्टीचे मला स्पष्टीकरण केले पाहिजे ते म्हणजे हया ज्या स्टेट आर्काईव्हज आणि पब्लिक रेकॉर्डस आहेत या दोन्ही गोष्टी जतन करण्याचे काम आपण करीत आहोत, आतापर्यंत ते चालूच आहे. मघाशी मी उल्लेख केल्याप्रमाणे सन 1998 मधील पारशी भाषेतील दस्तऐवज व्यवस्थित जतन करुन ठेवलेला आहे. "दर्पणसारख्या पहिल्या प्रकाशित झालेल्या वृत्तपत्राचे आपण लॅमिनेशन केलेले आहे आणि मायक्रोफिल्मींगची प्रक्रिया चालू आहे. आपल्या राज्यात मुंबई, कोल्हापूर, नागपूर आणि पुणे अशा चार ठिकाणी मुख्य आर्काईव्हज आहेत. पुण्यात चार कोटी असे पेपर्स आहेत, ज्याचे जतन करणे अत्यंत गरजेचे आहे, हे झाले स्टेट आर्काईव्हजच्या बाबतीत. आता पब्लिक रेकॉर्डच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर वेगवेगळया ऑर्गनाईजेशन्स आहेत. आपल्या कायदयामध्ये अशा प्रकारच्या डाक्युमेंट्सचे क्लासिफिकेशन करण्यात आले असून त्यानुसार "अे" या प्रकारातील डाक्युमेंट नष्ट करता येत नाही. "ब" प्रकारचे डाक्यु मेंट 30 वर्षापर्यंत जतन करणे आवश्यक असते, "सी" डाकुमेंट 5 वर्षे आणि "डी" या प्रकारातील अभिलेख एक वर्षासाठी जतन करण्यात येतात. आता या कायदयातील कलम 8 (1) मध्ये असे म्हटले आहे की, "Save as otherwise provided in any law for the time being in force," हे सर्व आपण कन्सीडर करतो. स्टेट आर्काईव्हजच्या बाबतीत उदाहरण द्यावयाचे झाले तर, जर कोणी पत्र पाठविले तर अशा प्रकारचे डाकुमेंट्स किती वर्षे जतन करावे याविषयी कायद्यात तरतूद आहे. पब्लिक रेकॉर्डच्या बाबतीत मी स्पष्टीकरण दिले आहेच. हे रेकॉर्ड सांभाळण्यासाठी आपण रेकॉर्ड ऑफिसरची नेमणूक केलेलीच आहे, पुन्हा यामध्ये नव्याने आपल्याला यंत्रणा उभी करावयाची गरज नाही, आपल्या कायदयाप्रमाणे ते आपल्याला करावेच लागते. या नवीन कायदयाबाबत सांगावयाचे तर यामध्ये आपण 5 वर्षापर्यंतची शिक्षा आणि 10 हजारपर्यंतचा दंड अशी तरतूद केलेली आहे. त्याचबरोबर यासाठी पुराभिलेख सल्लागार मंडळ नेमण्याची देखील तरतूद आपण यात करीत आहोत. यामध्ये आपण नव्याने काही वेगळे करतो अशातला भाग नाही. सन्माननीय सदस्य डॉ. मोडक साहेबांनी क्लॉज 16 च्या संदर्भात जो विषय उपस्थित केला, त्याबाबत स्पष्टीकरण करतांना मी असे सांगेन की, "in pursuance of this Act or the rules made thereunder." ॲक्टमध्ये कुठेच आपण

...kk-2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणत नाही की तुम्ही डिफेस करा. यामध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की "in good faith done or intended to be done in pursuance of this Act or the rules made thereunder." गुड फेथमध्ये चुकीची गोष्ट कोणी केली असेल तर त्याला माफ केले जाईल अशी तरतूद नाही. या कायदयातील तरतुदीप्रमाणे काम करीत असतांना चूक झाली तर त्यासंदर्भात ही तरतूद केलेली आहे. तसेच या ठिकाणी अभिलेखाच्या होणाऱ्या चोऱ्यांबबत उल्लेख करण्यात आला. या सर्व गोष्टींसाठी आपण पुराभिलेख सल्लागार मंडळाची नेमणूक करीत आहोत आणि या फिल्मिगच्या संदर्भात देखील या बोर्डाने माहिती द्यावयाची आहे, सुचना करावयाच्या आहेत. आपण रेकॉर्डमध्ये असलेल्या डिफरन्सबद्दल उल्लेख केला, त्याबाबत सांगावयाचे झाले तर आपण ज्याप्रमाणे हिस्टॉरिकल डाक्युमेंट्स जतन करतो त्याप्रमाणेच पब्लिक डाक्युमेंट्स जे महत्वाचे वाटतील, उदा. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या हस्ताक्षरात राज्यघटनेचा मसुदा लिहून ठेवलेला आहे, तो मसुदा पब्लिकच्या दृष्टीने जास्त महत्वाचा वाटत नसला तरी तो देखील व्यवस्थित जतन करुन ठेवला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राणा जगजितसिंह पाटील ...

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या हस्तक्षरात राज्यघटनेचा जो मसुदा लिहिला आहे त्याला सुध्दा ऐतिहासिक महत्व आहे ते रेकॉर्डसुध्दा आपण व्यवस्थित ठेवलेले आहे. त्याच बरोबर जे रेकॉर्डस् क्रिएट केले होते अगदी इस्ट इंडिया कंपनी जेव्हा अस्तित्वात आली होती त्यावेळचे पब्लिक रेकॉर्डचे सुध्दा आपण जतन केलेले आहे. शेवटी एवढेच सांगावयाचे आहे की, आपण हे काम नव्याने करीत आहोत असे नाही तर सर्व रेकॉर्डस् जतन करण्याची प्रक्रिया वर्षानुवर्षे चालूच आहे. फक्त हे रेकार्डस् व्यवस्थित करण्यासाठी आपण हे बील आणीत आहोत. त्याच बरोबर कोणी चूकीची गोष्ट करीत असेल, चो-यामा-या होत असतील आणि राज्याच्या बाहेर ऐतिहासिक महत्वाच्या गोष्टी जात असतील तर त्या होऊ नयेत म्हणून आपण हा कायदा अंमलात आणण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्याच बरोबर केंद्र शासनाने हा कायदा अंमलात आणलेला आहे. आपल्याकडे स्पेसिफिक सूचना असतील. उदा. आपण संगणकाच्या संदर्भात सांगितले, पेपरलेस ऑफिसच्या बाबतीत आपण काही सूचना केल्या तर त्या सर्व सूचना आपल्याला सल्लागार मंडळाकडे देता येतील आणि त्या अंमलात आणता येऊ शकतील. महोदया, 2005 चे विधान परिषद विधेयक क्रमांक 22 चे जे बील आहे....

श्री. श्रीकांत जोशी : अध्यक्ष महोदया, या दोघांना एकाच कायद्यात घेणे हे चूकीचे आहे असे माझे मत आहे. ऐतिहासिक दस्तऐवज जर कोणी खराब करीत असतील तर त्याच्या विरुध्द गुन्हे दाखल करण्याची सगळी प्रोसेस वेगळी असली पाहिजे. जे रेकॉर्डस् आहेत त्याच्या विषयातील कायदा वेगळा असला पाहिजे असे माझे मत होते. रेकॉर्ड आणि ऐतिहासिक दस्तऐवज दोन्ही एकाच माळेत गुंफणे हे कायदेशीर दृष्टया बरोबर आहे का? दुसरा जो प्रश्न विचारला होता की, सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार ते केले जाईल. परंतु हे वेग आणि कायद्याच्या भाषेतील वाटत नाही. तुम्ही फारसे असे म्हणू शकाल की, रुल्स आणि प्रोसिजर ले करण्याचे अधिकार कल्चरल सेक्रेटरी किंवा तुमचा जो प्रसिडेंट आहे त्याला देऊन टाकू. He may find the rules suitable depending upon the conditions. परंतु अशा पध्दतीचे कलम नसल्यामुळे हा कायदा ज्या पध्दतीने आला आहे तो वेग स्वरुपाचा कायदा वाटतो. यातील पळवाटांतून काहीही निष्पन्न होणार नाही. या कायद्याच्या खोलात जाण्याची आवश्यकता आहे. तुम्हाला कायदा करणे जर बंधनकरक असेल तर खुशाल करा, परंतु आता आपल्याला त्यामध्ये

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी..........

ॲमेंडमेंट करावी लागेल. या कायद्यामध्ये सुधारणा करुन, हा कायदा परिपूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे रेकॉर्डस् आणि पुरातन अभिलेख एकाच माळेत का आणले, तसेच हा कायदा परिपूर्ण करण्यासाठी तुम्ही नंतर बैठक घेणार आहात काय? याबाबतचा खुलासा मंत्रिमहोदयांनी करावा अशी माझी विनंती आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : पब्लिक रेकॉर्ड हे शेवटी ऐतिहासिक महत्वाचे असतात. अगदी केंद्र शासनापासून हिस्टॉरिकल इम्पॉर्टंट रेकॉर्डस् आणि पब्लिक रेकॉर्डस् या दोघांचे जे कॉन्झर्वेशन आहे, प्रिझर्व्हेशन आहे, ही जी प्रक्रिया असते ती एकत्रितरित्या केली जाते. त्यामुळे त्यामध्ये बायफरकेशन करणे शासनाला योग्य वाटत नाही. त्याचबरोबर आपण जो उल्लेख केला त्यातील 3 (1) चा क्लॉज मी आपल्याला सांगू इच्छितो. त्यामध्ये म्हटले आहे की, "The State Government shall have the power to co-ordinate, regulate and supervise the operations connected with the administration, management, preservation, selection, disposal and retirement of public records under this Act." हे आपण अगदी क्लिअरली मेन्शन करीत आहोत. आपण म्हणाला आहात की, सचिवांना आदेश द्यावेत, परंतु शासनाने यासंदर्भातील अधिकार राखून ठेवलेले आहेत. या ॲक्टनुसार याबाबतचे अधिकार हे शासनाकडेच राहणार आहेत. मी पुन्हा एकदा नमूद करु इच्छितो की, सल्लागार समिती हे यातील एक महत्वाचे अंग आहे. ऐतिहासिक कागदपत्रे जे लोक नष्ट करतात, चोऱ्या करतात, तसा प्रकार होऊ नये म्हणून अशा दोन-तीन महत्वाच्या गोष्टी या विधेयकाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करीत आहोत. सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले होते, त्या सर्व प्रश्नांची मी उत्तरे दिली आहेत असे मला वाटते, त्यामुळे सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 22-महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख विधेयक सभागृहाने संमत करावे अशी माझी सदनाला विनंती आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती ( श्रीमती सुधा जोशी )** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 18 ( दोन्ही सम्मिलित ) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1,संपूर्ण शिर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

....3



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदया, सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 22 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मी आपल्या अनुमतीने मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : सन 2005 चे वि.प.वि. क्रमांक 22 संमत झाले.

यानंतर श्री. ओटवणेकर ....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**अर्धा तास चर्चा**

**पृ.शी.**: राज्यात मोठया प्रमाणावर होत असलेली
वृक्ष व तिवरांची तोड.

**मु.शी.**: राज्यात मोठया प्रमाणावर होत असलेली
वृक्ष व तिवरांची तोड यासंबंधी डॉ.अशोक मोडक,वि.प.स.
यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

डॉ.अशोक मोडक (कोकण विभाग पदवीधर) : अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो. :-

"वर्तमानकाळात मोठया प्रमाणावर वृक्षतोड चालू असणे, तिवराची म्हणजेच खारफुटीची झ ाडे तोडली जाणे, परिणामी पर्यावरणाचा ऱ्हास होणे व निरनिराळया आपत्तींना सामोरे जावे लागणे, अशा परिस्थितीत कल्याण येथील जनता सहकारी बँकेने स्वखर्चाने वनीकरण राबविण्याचे ठरविणे, या बँकेचे वरिष्ठ संचालक श्री.वा.द.साठे यांनी मा.वनमंत्री यांना या संदर्भात पत्र पाठवून अनुकूल प्रतिसाद मिळविणे, तसेच अशा तऱ्हेने राज्यातील इतरही सहकारी बँकांना वनीकरण मोहिमेत सामावून घेण्याच्या दृष्टीने शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

सभापती महोदया, सध्या सगळीकडे पर्यावरणाचा ऱ्हास हा विषय वर्तमानपत्रातून आणि भाषणातून गाजतो आहे. 17 ऑक्टोबरला मुंबई उच्च न्यायालयाने अतिशय ऐतिहासिक निवडा घोषित केला. त्या निवडयातसुध्दा पर्यावरणाच्या दृष्टीने अल्डस हक्स्ले या विचारवंताचे वचन उद्धृत करून सन्माननीय न्यायमूर्तींनी अतिशय सार्थ अशी चिंता वर्तविली आहे. अल्डस हक्स्ले असे म्हणतात, "आईच्या गर्भातील अपत्याला केवळ 1/3 ऑक्सिजन मिळाला तर भविष्यात जन्माला येणारे मूल मूर्ख म्हणून येऊ शकते." न्यायमूर्ती महोदय हक्स्ले यांच्या विचारांचा आधार घेऊन अशी भिती व्यक्त करतात की, मुंबई सारख्या महानगरात आणि एकूणच महाराष्ट्रात सगळीकडे फार मोठया प्रमाणावर जंगल तोड झाली, नद्या-नाले यांच्यावर आक्रमणे झालीत तर तुम्हा-आम्हाला मिळणारा ऑक्सिजन कमी कमी होत जाईल आणि वेळीच काळजी घेतली नाही तर पुढच्या पिढयाही मूर्ख म्हणून जन्माला येतील. आज या ठिकाणी अर्धा तास चर्चा उपस्थित करताना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक...

17 ऑक्टोबरला मुंबई उच्च न्यायालयाने जो निवाडा घोषित केला आहे, त्या निवाडयातील अवतरणाकडे मी आपले लक्ष वेधून घेऊ इच्छितो. याला आणखी एक पार्श्वभूमी आहे. गेल्यावर्षी 2004 मध्ये कल्याण नागरिकच्या एका अंकात जनता सहकारी बँकेचे वरिष्ठ संचालक श्री.वा.द.साठे यांचा अतिशय चांगला लेख माझ्या वाचनात आला. वैतरणा धरणाला जोडून आणखी एक धरण बांधावे. त्यासाठी स्वाभाविकपणे काही झाडे तोडावी लागतील. हे नुकसान भरून काढण्यासाठी बीड जिल्हयात वृक्षारोपण करावे, अशातऱ्हेचा काही तरी उपक्रम आहे. त्यासंबंधी श्री.वामनराव साठे म्हणतात की, बीडला जाऊन झाडे लावण्याची गरज काय आहे? ठाणे जिल्हयात आपण उत्तरेकडे गेलो तर तेथे फार मोठया प्रमाणावर पडिक जमीन उपलब्ध आहे. मला या निमित्ताने आपल्याला असा प्रश्न विचारावयाचा आहे आणि त्यानंतर मला पुढचे निवेदन करावयाचे आहे की मूळात ही जी काही पडिक जमीन आहे, त्या पडिक जमिनीचा थोडा हिशोब जर दिला तर मला वाटते चर्चेला एका अर्थाने आणखी गती देता येईल. या पडिक जमिनीवर वृक्ष लागवड करण्यासाठी ठाणे जिल्हयातील 6 शेडयुल्ड बँकाना सहभागी करून घेतले तर श्री.वामनराव साठे यांची योजना अंमलात आणण्या जोगी आहे.

सभापती महोदय, मला येथे एका गोष्टीचा आनंद अभिव्यक्त करावासा वाटतो. मी मंत्रिमहोदय श्री.बबनराव पाचपुते यांना 10 ऑगस्टला पत्र लिहिले आहे, त्यांनी 25 तारखेला अतिशय अनुकूल असा प्रतिसाद पत्रोत्तराने दिला. म्हणून मला खात्री आहे की, येथे जी चर्चा आता रेकॉर्डवर येणार आहे, त्या चर्चेचा समारोप मंत्रिमहोदयांच्या भाषणाने होईल. येथे केवळ ठाणे जिल्हयातील शेडयुल्ड बँकांचा विषय नसून महाराष्ट्रातील सर्व बँकांना सहभागी करून महाराष्ट्रातील वनीकरणाच्या मोहिमेला अधिक वेगाने साकार करता येईल. ही योजना काय आहे ? प्रत्येक बँकेच्या मुख्य कार्यालया जवळ 10 ते 20 कि.मी.अंतरावर असलेली सुमारे 50 एकर जमीन किमान 25 वर्षाच्या लिजवर विकसित करण्यासाठी, वनीकृत करण्यासाठी वनखात्याकडून मिळाली पाहिजे. त्या जागेत पाण्याची नैसर्गिक व्यवस्था असली तर ते उत्तमच आहे. अन्यथा विहीर करणे, बोअर घेणे, बंधारा बांधणे अशी जी काही जलसंपादनाची व्यवस्था असेल ती बँक करायला तयार आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक.........

वरील जमिनीत किमान 10 ते 12 हजार झाडे योजनापूर्वक 10 ते 15 वर्षाच्या कालावधीत लावणे आवश्यक आहे. एक एकरामध्ये साधारणत: 200 ते 250 झाडे लावण्यात यावीत. दादासाहेब लिमये यांनी रायगड जिल्ह्यातील पाली गावात शाळेतील शिक्षक आणि मुलांना घेऊन ही योजना अंमलात आणली. त्याठिक्‍ाणी त्यांनी एकरामध्ये 500 झाडे लावली. फक्त झाडे लावून ते थांबले नाहीत तर त्यांनी ती झाडे जगविली. आजही ती झाडे मोठ्या प्रमाणावर फुललेली आहेत. हा आधार असल्यामुळे मी हे विधान केलेले आहे. आपल्याला एकरामध्ये 500 झाडे लावून ती टिकविता येतील. झाडे कोणत्या प्रकारची असावीत याचे मार्गदर्शन वन विभागाने करावे. खड्डे खणणे, झाडे लावणे, खत पाणी घालणे, झाडे वाढविणे, झाडांचे संरक्षण करणे ही सर्व जबाबदारी बँकेची राहील. वन विभागाने रोपटी मोफत पुरवावीत. जगविण्यात आलेल्या सर्व झाडांची मालकी वन विभागाकडे रहावी. झाडांपासून मिळणारे उत्पन्न म्हणजे फळ, पालापाचोळा, गवत बँकेने घ्यावे. झाडांच्या संरक्षणासाठी ट्रीगार्डची आवश्यकता असल्यास ते बँकेने पुरवावे. बँकांना दरवर्षी होणाऱ्या निव्वळ नफ्यातून एक ते दोन टक्के रक्कम खर्च करण्याची परवानगी सहकार आयुक्तांकडून वन विभागाने त्या बँकेला मिळवून द्यावी. झाडे लावण्यासाठी बँकेचे सभासद, कर्मचारी, हितचिंतक, विद्यार्थी व नागरिक यांचे सहकार्य घेता येईल. बँकेच्या कर्मचाऱ्यांचे अभ्यासवर्ग, शालेय विद्यार्थ्यांच्या व भागधारकांच्या सहली यासाठी या जागेचा उपयोग होईल. त्यांनाही त्याठिकाणी श्रमदानातून काही वास्तू उभी करता येईल. शक्य असल्यास तेथे नर्सरी होऊ शकते. झाडांची राखण करणे, देखभाल करणे, साफसफाई करणे यासाठी काम करण्यासाठी तेथील स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. आंबा, फणस, चिंच, साग, वड, पिंपळ आदि वृक्षांची लागवड करणे. तसेच गिरीपुष्पासारख्या झाडांची लागवड करुन त्याच्या पारंब्याचा भातशेतीसाठी खत म्हणून उपयोग करणे असे अनेक पैलू या उपक्रमाचे आहेत. तसेच झाडांचा पडलेला पालापाचोळा व रानटी गवत यांचा खतासाठी उपयोग होऊ शकतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.अशोक मोडक.........

सभापती महोदया, माननीय मंत्रिमहोदयांनी माझेकडे जे उत्तर पाठविलेले आहे त्याचा उल्लेख मी मघाशी केलेला आहे. मला मंत्रिमहोदयांना एक विनंती करावयाची आहे की, आपण मुंबईमध्ये आपल्या दालनात श्री.वामनराव साठे यांना बोलवावे, मी स्वत: येण्यास तयार आहे. आपण एकत्र चर्चा करुन एक प्लॅन तयार करु. त्याचा दुसरा टप्पा म्हणजे ज्या सहा शेडयुल बँका आहेत, त्या बँकांच्या प्रमुखांनाही चर्चेसाठी बोलवावे. आपण एक मॉडेल प्लॅन अमलात आणला तर सहकार खाते काय करु शकते, याचा वस्तुपाठ आपल्याला देता येईल. याला लॉजिक आहे. मा. धनंजय गाडगीळ यांनी 1970 मध्ये पंजाब विश्व विद्यालयात भाषण करताना एक अतिशय मौलिक विचार मांडला होता. ते असे म्हणाले होते की, "सहकार क्षेत्राकडे मी भविष्यातील को-ऑप.कॉमनवेल्थ या संकल्पनेतून पाहतो". उद्या अशारितीने एक सहकारी विश्व या माध्यमातून उभे करता आले तर मला असे वाटते की, विखे-पाटील असतील, वैकुंठभाई मेहता असतील, धनंजयराव गाडगीळ असतील अशा या श्रेष्ठींच्या ऋणातून आपल्याला अंशत: मुक्त होता येईल. त्यांचा वसा आणि वारसा पुढे चालविला याचे सार्थ समाधान आपल्याला गाठीशी बांधता येईल. मला खात्री आहे की, मा.मंत्रिमहोदय अनुकूल उत्तर देतील.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, माझी आपणास विनंती आहे की....

**तालिका सभापती** ( श्रीमती सुधा जोशी ) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छिते की, चर्चा उपस्थित करणाऱ्या सन्माननीय सदस्यांचे भाषण झाल्यानंतर सन्माननीय मंत्रिमहोदय उत्तर देतात व इतर सन्माननीय सदस्य प्रश्न विचारतात अशी प्रथा आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते ( वन मंत्री ) : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी अतिशय चांगल्या विषयावर चर्चा उपस्थित केलेली आहे त्याबद्दल मी त्यांचे प्रथम मनापासून आभार मानतो. नैसर्गिक आपत्ती कोसळल्यावर आपल्याला खारफुटीच्या झाडांचे महत्व समजले.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते....

आपण आपल्या स्वार्थासाठी निसर्गावर मात करण्याचे काम करुन स्वत:चेच नुकसान करुन घेतलेले आहे. ज्यावेळी त्सुनामी लाटांनी मोठया प्रमाणावर नुकसान झाले त्यावेळी खारफुटीबाबतची चर्चा समुद्रकिनाऱ्यावरील लोकांतच नव्हेतर संपूर्ण देशात झाली. त्सुनामी लाटांना रोखण्याचे सामर्थ्य सरकारने निर्माण केलेल्या कोणत्याही गोष्टीमध्ये नव्हते. ज्या ठिकाणी खारफुटीची झाडे आहेत, विशेषत: चेन्नई या ठिकाणी त्सुनामींमुळे कमी नुकसान झालेले आहे. समुद्रकिनाऱ्याचे रक्षण करावयाचे असेल तर खारफुटीच्या वनस्पतींचे जास्तीतजास्त संवर्धन आणि संरक्षण झाले पाहिजे आणि या निमित्ताने ही वनस्पती आज चर्चेचा विषय आहे. संपूर्ण किनारपट्टीवर आपल्या वन विभागाकडे 8500 हेक्टर जमीन आहे. राज्याच्या सरकारी खात्यांकडे जी जमीन आहे ती 22,500 हेक्टर इतकी आहे. त्याशिवाय इतर ठिकाणी खाजगी जमीन आहे. खारफुटीची वनस्पती समुद्रकिनाऱ्याजवळ असते आणि समुद्रात येणाऱ्या भरतीमुळे ती वनस्पती बाहेर फेकली जाते आणि पुन्हा आत येते. विशेषत: दलदल असलेल्या भागामध्ये ही वनस्पती असते. ज्या ठिकाणी चिवट माती असते त्या ठिकाणी ही वनस्पती मोठया प्रमाणावर येते. ही वनस्पती समुद्राच्या लाटा आणि त्सुनामीचे रक्षण करण्याचे काम करते. जलचर प्राण्यांचे पुन:जीवन या वनस्पतीमार्फत होते, मासे या वनस्पतीमध्ये अंडी घालतात, खेकडयांचा वंश चालविण्यासाठी सुध्दा या खारफुटी वनस्पतीचा उपयोग होतो, ही वस्तुस्थिती आता सर्वांच्या लक्षात आली आहे आणि त्यामुळे या वनस्पतीकडे सर्वांचेच लक्ष केंद्रीत झाले आहे. विशेषत: मुंबईच्या परिसरात ही वनस्पती मोठया प्रमाणावर आहे. ही वनस्पती टिकविणे आपल्या सर्वांची एकत्रित जबाबदारी आहे. ज्या ठिकाणी खारफुटीची वनस्पती असते त्या ठिकाणी इमारती बांधण्यासाठी ॲसिड टाकून त्या वनस्पतीला नष्ट केले जाते किंवा त्या वनस्पतीला मागे ढकलले जाते. आपल्याला ही वनस्पती जेवढी टिकविता आली तेवढी आपण टिकविलेली आहे. यासंदर्भात काही लोक हायकोर्टामध्ये गेले आणि त्यानंतर हायकोर्टाने आदेश दिलेत की, 8 आठवडयांच्या आत सर्व्हे करुन, 12 आठवडयांच्या आत वन खात्याकडे जमीन सुपूर्द करावी. ती जमीन आमच्याकडे आली तर या वनस्पतीचे उत्तमप्रकारे संवर्धन आणि संरक्षण केले जाईल तसेच लागवड सुध्दा केली जाईल. हायकोर्टात गेल्यानंतर लोकांनी खाजगी जमिनीवरील संपूर्ण खारफुटीच्या वनस्पतीची तोड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते....

करण्याचे काम हाती घेतले आहे. ती जमीन सुध्दा आपल्याकडे वळवावयाची आहे. ही वनस्पती म्हणजे निसर्गाने आपल्याला दिलेले एक वरदान आहे. समुद्रकिनाऱ्यावर राहणाऱ्या लोकांकडून माशांचे प्रजनन होण्याच्या दृष्टीकोनातून खारफुटी वनस्पतीचे संरक्षण करण्याचे काम उत्तमप्रकारे सुरु आहे. हायकोर्टाच्या आदेशानुसार जमीन सरकारकडे आल्यानंतर खारफुटीच्या वनस्पतीचे संरक्षण होण्यासाठी स्वतंत्र अधिकारी नेमून, याबाबत योग्यप्रकारे व्यवस्थापन करणार आहोत. ज्यावेळी आपण विमानातून प्रवास करतो त्यावेळी आपल्याला समुद्रकिनाऱ्यावर जो हिरवागार पट्टा दिसतो तो खारफुटीच्या वनस्पतीचा असतो आणि त्याच वनस्पतीचे संरक्षण करण्याचे काम आपणासर्वांचे आहे.

आपल्याकडे एकूण पडिक जमीन 53 लाख हेक्टर आहे, त्यापैकी 20 लाख 76 हजार हेक्टर वन खात्याची आहे. या पडिक जमिनीचे पुनर्वसन करण्यासाठी महाराष्ट्र सरकार वेगळया प्रकारचे प्राधिकरण निर्माण करु इच्छिते. वन खात्याच्या जमिनीवर 40 टक्क्यांपेक्षा जास्त सावली ज्या जमिनीवर येत नाही अशा ठिकाणी जे वन असते ते उत्कृष्ट प्रकारचे वन आहे. 40 टक्क्यांपेक्षा खाली म्हणजे 10 टक्क्यांपर्यंत घनता असेल तर ते चांगले वन असते, 10 टक्क्यांपेक्षा खाली घनता असल्यास असल्यास ते झुडपी वन मानतो. काही ठिकाणी अशीही जमीन आहे की, ती पूर्णत: बॅरन आहे, त्या ठिकाणी काहीच होत नाही. राज्यातील वन खात्याकडे असलेल्या 20 लाख 76 हजार हेक्टर जमिनीपैकी साधारणत: 7 लाख हेक्टर जमीन 10 टक्क्यांपेक्षा खाली म्हणजेच झुडपी जमीन आहे.

नंतर श्री.गायकवाड....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते .....

तीन ते साडे तीन लाख हेक्टर्स जमीन अशी आहे की ज्या ठिकाणी फक्त गवत उगवते किंवा काहीही उगवत नाही. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी जो मुद्दा मांडलेला आहे तो गांभीर्याने घेण्याची आवश्यकता आहे. जगामध्ये मनुष्याला आणि सजीव प्राण्याला ऑक्सीजनची आवश्यकता आहे.हा ऑक्सीजन तयार करणारा कोठेही कारखाना नाही तरी सुध्दा सजीव प्राणी आणि माणसे जगतात त्याचे कारण वनस्पती आपल्याला मोठया प्रमाणावर ऑक्सीजन देत आहेत. जो निसर्ग आपल्याला ऑक्सीजन देत आहे तो निसर्ग आज आपल्याला टाहो फोडून सांगत आहे की,"मला वाचवा आणि माझे संरक्षण करा." तेव्हा हे वन वाचवले पाहिजे ही शासनाची जबाबदारी आहे .झाडे वाचविण्याचे शासनाचे काम सुरु आहे.गेल्या वर्षापासूनच माझ्याकडे हा विभाग आला आहे.वनामध्ये आग लागते त्याचे प्रमाण आता कमी झालेले आहे त्याचबरोबर चो-यांचे प्रमाण कमी झालेले आहे.या बाबतीत 100 टक्के यश मिळालेले आहे असे मी म्हणणार नाही परंतु 70 टक्यापर्यन्त आम्हाला यश मिळालेले आहे. ही चांगली गोष्ट आहे. .जगात एक संस्था निर्माण झाली आहे आणि त्या संस्थेचे असे मत आहे की, पृथ्वीवर उष्णता वाढत चालली आहे. दोन सेल्सशियस इतकी उष्णता आता वाढलेली आहे आणि अजून 2 सेल्सशियस उष्णता वाढली तर दक्षिण आणि उत्तर धृवावर जो बर्फ आहे तो बर्फ मोठया प्रमाणावर वितळावयास सुरुवात होईल आणि त्यामुळे समुद्राची पातळी अडीच मिटरने वाढेल. सध्या जो समुद्र आहे तो अडीच मिटरने उंच झाला तर बरीच मोठी जमीन पाण्याखाली जाईल.आता 1/3 जमीन पाण्याखाली गेलेली आहे आणखी तेवढीच जमीन पाण्याखाली जाईल.त्यामुळे संपूर्णपणे माणसांचे जीवन उद्ध्वस्त होईल अशा प्रकारचे शास्त्रज्ञांचे मत आहे .यासाठी एक संघटना तयार झालेली असून त्यांनी असे सांगितले आहे की ,आपल्या देशामध्ये आणि राज्यामध्ये वनाचे प्रमाण 33 टक्के असले पाहिजे.पृथ्वीवरील .उष्णतामान जर आटोक्यात ठेवावयाचे असेल तर झाडे लावण्याशिवाय आपल्या समोर दुसरा कोणताही पर्याय नाही. कार्बनडॉय ऑक्साईड, कार्बन मोनाक्साईड या सारखे जे विषारी वायू तयार होतात त्याचे पुन्हा ऑक्सीजनमध्ये मशिनरीच्या माध्यमातून रुपांतर केले तर एक टन कार्बन डॉय ऑक्साईडचे रुपांतर ऑक्सीजनमध्ये करण्यासाठी 550 डॉलर्स खर्च येईल.परंतु या निसर्गाच्या माध्यमातून या कार्बनडॉय ऑक्साईडचे रुपांतर ऑक्सीजन मध्ये करावयाचे असेल तर त्याला 5 डॉलर्स एवढा खर्च येईल. आपल्याला निसर्गाला वाचवावयाचे असेल तर आपल्याकडे वनांचे प्रमाण





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते .....

33 टक्के असले पाहिजे. महाराष्ट्रात वनाचे प्रमाण आज 21 टक्के आहे हे प्रमाण 2012 सालापर्यन्त 33 टक्के करावयाचे असेल तर त्यासाठी आपणा सर्वांना गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता आहे. जी सरकारी जमीन आहे ती कोणी तरी घेत आहे तेव्हा ही सर्व जमीन वन खात्याच्या अधीन ठेवली पाहिजे. ज्या ठिकाण पडीक जमीन आहे ती जमीन वनाखाली केव्हा येणार आहे ? याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडलेला आहे तो बरोबर आहे.ही जमीन वनाखाली आणण्यासाठी सरकारकडे पैसे नाहीत. वन खात्याला आज खालची प्रायॉरिटी दिली जाते. गेल्या पाच वर्षातील आमच्या बजेटची आकडेवारी जर आपल्याला सांगितली तर आपल्या लक्षात ही गोष्ट येईल.पाच वर्षापूर्वी बजेटमध्ये 1 रुपयातील 52 पैसे आम्हाला मिळत होते.त्यानंतर हे प्रमाण खाली घसरत जाऊन गेल्या वर्षी 1 रुपयांतील 17 पैसे आम्हाला मिळाले होते..यावर्षी 1 रुपयांतील 7 पैसे आम्हाला मिळालेले आहेत. या पैशातून वन राखावयाचे आहे, वनाच्या आगी

विझवावयाच्या असतात ,वनाचे संवर्धन करावयाचे असते , अधिक वनाची लागण करावयाची असते. ही सगळी कामे करणे शक्य नाही कारण त्याकरता पुरेसा पैसा नही.त्यामुळे सध्या जे काही वन आहे त्याचे संरक्षण करणे एवढेच आमचे काम आहे.वनाची लागण करण्यासाठी आपल्याकडे सामाजिक वनीकरण नावाचे दुसरे खाते आहे.ते सुध्दा मोठया प्रमाणावर हे काम करु शकेल असे वाटत नाही. मागे मी गृह खात्याचा मंत्री असतांना , सभागृहात चर्चा झाल्यानंतर मी असे सांगितले होते की, पोलीस खात्याच्या आणि आपल्या संरक्षणासाठी कधी तरी आपल्याला बजेटमध्ये खास तरतूद करावी लागेल.तशाच प्रकारे वनासाठी स्वतंत्र बजेट करण्याची आता वेळ आलेली आहे.असे मला सांगावयाचे आहे. आज पृथवीवरील उष्णता सतत वाढत चालली आहे ती आणखी वाढली तर दोन्ही धृवावरील बर्फ वितळण्यास सुरुवात होईल. आज माणसाची स्वार्थी वृत्ती सतत वाढत चालली आहे.त्यामुळे सर्व वन नष्ट होत चालले तर त्यामुळे पुढे विपरित परिणाम होईल.आज वन नष्ट होत चालले आहे.जनावराना वनात सोडून दिले जात आहे त्यांच्या नखामुळे जमीन खराब होत आहे. आपल्याला साईल कॉन्झरव्हेशनचे काम करावे लागणार आहे, पाण्याच्या बाबतीत कार्यक्रम हाती घ्यावा लागणार आहे. या सगळया योजनांचा अभ्यास आपण केला तर वन वाचविण्याशिवाय आणि त्याचे संवर्धन केल्याशिवाय आपल्या समोर दुसरा पर्याय राहिलेला

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते .....

नाही.सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा मांडला आहे तो महत्वाचा आहे. यासाठी कोणता उपाय आहे? असे आपण विचारलेले आहे. तेव्हा यासाठी उपाय आहेत परंतु ते शोधण्याची आवश्यकता आहे.जी पडीक जमीन आहे ती वनाखाली आणण्याच्या बाबतीत शासनाची ताकद नसेल तर ...

नंतर श्री.सुंबरे

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाचपुते .....

तर ज्यांची ताकद आहे अशा संस्था, कंपन्या, उद्योग वा मोठे लोक आहेत की ज्यांना वनाविषयी प्रेम आहे अशांना एकत्रित करून त्यांच्याकडे जर असे भाग हस्तांतरित केले तर त्यातून आपला फायदा होईल. मी वनमंत्री झाल्याबरोबर केंद्र सरकारकडे एक योजना पाठविली होती. आमच्याकडील पडिक जमीन आम्ही खाजगी संस्थांना वन विकसित करण्यासाठी देण्यास तयार आहोत. त्या योजनेनुसार कायद्याप्रमाणे ती जमीन आमच्याच ताब्यात राहील, पण त्यावर ती जमीन ज्यांना काही वर्षांसाठी, 7 वर्षांसाठी दिली गेली असेल त्यांना झाडे लावता येतील आणि त्यांची जपणूक देखील त्यांनीच करावयाची आहे. परंतु यातून तुम्हाला फायदा काय ? हा प्रश्न येतो. आम्ही योजना तयार करून पाठविली की, 30 वर्षे तरी त्या संस्थेला अशा प्रकारे वन जमीन वन विकसित करण्यासाठी म्हणून द्यायची आणि देताना त्यावर किती वन आहे याची मोजणी करून द्यायची आणि त्या जमिनीवर त्यांनी उत्तम प्रकारे वन तयार करावयाचे. त्यांनी तेथे उद्या साग लावले तर सुरूवातीस 2-3 वर्षामध्ये वा 7-10 वर्षामध्ये त्यांना त्यापासून काही फायदा मिळू शकणार नाही. म्हणून मग त्यादृष्टीने स्वतंत्र अशी व्यवस्था करावी या करिता आपण 30 वर्षांचा काळ गृहीत धरला. एखाद्या संस्थेला 30 वर्षांसाठी जर ती जमीन वन विकसित करण्यासाठी म्हणून दिली तर त्या जमिनीवर वन वाढेल, प्राणी वाढतील आणि चांगल्या प्रकारे ऑक्सिजन देखील आपल्याला मिळेल. तेव्हा अशा प्रकारे एक योजना करून आम्ही केंद्राला पाठविली. केंद्रातील लोकांनी आमचे म्हणणे मान्य केले की, हे बरोबर आहे म्हणून. इतकेच नाही तर त्यांनी या संदर्भात भोपाळ येथे एक कार्यशाळा घेतली. त्यामध्ये देशातील सर्व संबंधित प्रमुखांची चर्चा होऊन हा निर्णय झाला की, हा कालावधी 30 वर्षांचा नाही तर 20 वर्षांचा करून द्यावा असे सांगण्यात आले. वन कायद्यानुसार आमच्या ताब्यात जमीन ठेवून तुम्हाला ती जागा विकसित करण्यासाठी दिली तर तुम्ही त्यावर वन वाढवू शकाल. अनेक अशा संस्था आहेत, समाजसेवी संस्था आहेत, एनजीओज् आहेत, काही मोठे लोक आहेत की, जे यासाठी पुढे येण्यास तयार आहेत. अर्थात आतापर्यंत आमच्याकडे अजून कोणी यासाठी आलेले नाही वा मिळाले नाही. पण त्या दृष्टीने आमचा पाठपुरावा चालला आहे. पण जेव्हा यासाठी आम्हाला परवानगी मिळेल तेव्हा आपण याबाबत जरूर प्रयत्न करू. सभापती महोदया, शासनाने या संदर्भात दुसरी एक योजना तयार केली आहे. संयुक्तिक वन व्यवस्थापन म्हणून ही योजना आहे. यामध्ये आपल्याला एक संधी मिळाली आहे.

..... क्यूक्यू 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पाचपुते ....

आज महाराष्ट्रात 45 हजार गावे आहेत आणि त्यापैकी 16,300 गावे अशी आहेत की, ज्या गावांजवळ वन आहे किंवा वनाची जमीन आहे, किंवा पडिक जमीन आहे. या संदर्भात आम्ही असा एक निर्णय घेतला की, या सगळ्या गावांमध्ये संयुक्तिक वन व्यवस्थापन समित्या करावयाच्या. त्याप्रमाणे आपण समित्या केल्या असून आज जवळपास साडेपंधरा हजार कमिट्या तयार झालेल्या आहेत. त्यामध्ये आम्ही ग्रूप तयार केले की कोणाला जास्त फायदा मिळणार आहे. 20 हेक्टर पेक्षा जास्त जमीन ज्या गावामध्ये आहे त्यांचा एक वेगळा गट करायचा, नंतर 20 ते 10 हेक्टर पर्यंतचा गट करावयाचा आणि 10 हेक्टर पेक्षा कमी जमीन असलेल्यांचा एक गट करावयाचा. या समित्या तयार करून त्यांच्याकडे हे वन हस्तांतरित करावयाचे आहे. या बाबतीत केंद्र सरकारने कायदा केला. त्यामध्ये त्यांनी 33 प्रकारचे वन उपज दाखविलेले आहे. हे वन उपज त्यांना वापरता येतील, त्यातून ते गट फायदा करून घेऊ शकतील. आता ठाणे जिल्ह्यातील मुरबाड तालुक्यामध्ये काही गावे आहेत. त्यांना आम्ही 6 वर्षापूर्वी 198 हेक्टर जमीन दिली. त्या ठिकाणी त्यांनी चांगल्या प्रकारे 500 एकरामध्ये सागाची रोपे लावली आहेत आणि उत्तम प्रकारे वाढविली आहेत. त्यासाठी त्यांनी तेथे पाणी अडविले आहे आणि त्या झाडांना पाणी दिले. त्यानंतर आता त्यांनी बांबूची रोपे लावण्यास सुरूवात केली आहे. त्या भागामध्ये त्यांची 120 घरे आहेत. आता या वनामधून त्यांना जे उत्पन्न मिळेल ते पाहता एका कुटुंबाला 7 वर्षामध्ये दोन ते अडीच लाख रूपये वनोपजांपासून मिळणार आहेत. म्हणजे अशा प्रकारे त्यांचा फायदा होऊ शकतो. हा फायदा आम्ही हायलाईट करण्याचे काम आता करीत आहोत, लोकांना समजाविण्याचे काम आम्ही करीत आहोत. यासाठी आम्ही लोकांची, कमिट्या तयार करून वर्कशॉप घेत आहोत. तेथील लोकांना, कार्यकर्त्यांना आम्ही ही योजना समजावून सांगत आहोत की, हे कार्य किती महत्त्वाचे आहे आणि यातून लोकांना कसा रोजगार मिळू शकणार आहे हे आम्ही दाखवून देत आहोत. म्हणजे यातून तेथील लोकांना रोजगार मिळेल आणि वन देखील वाढेल. विशेष म्हणजे हे माझे वन आहे ही भावना त्यातून निर्माण होणार आहे. ही भावना जोपर्यंत आपण त्यांच्यात निर्माण करीत नाही तो पर्यंत यामध्ये यश येणार नाही. ज्याप्रमाणे आई मुलाकडे मायेने पाहते आणि वाढविते त्याप्रमाणे लोकांनी वन वाढविले पाहिजे हा आपला यामागे हेतू आहे. मुलाचे आणि आईचे जसे नाते आहे तसे या वनांचे आणि गावाचे नाते निर्माण करण्याची गरज आहे. सरकारचे आहे म्हटले की,

.... क्यूक्यू 3 ...



KBS/ MHM/ SBT/ श्री. गायकवाड नंतर --- 15:30

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लोकांची त्याकडे पाहण्याची दृष्टी आणि भावना वेगळीच होते. मग त्यात नुकसान झाले तरी चालेल कारण ते सरकारचे आहे, माझे नाही. माझ्या क्षेत्रामध्ये असेल तरच मी पाहीन, सरकारी क्षेत्रामध्ये असेल तर मी पाहणार नाही. ही जी विचारसरणी लोकांची आहे ती लक्षात घेऊन आता आम्ही हे वन क्षेत्र गावांकडे, गावातील लोकांकडे देत आहोत. हे तू घे, तू वाढव, त्यातून तूच फायदा घे. अशा प्रकारे अत्यंत चांगल्या समित्या पुढे आलेल्या आहेत. हेच काम करण्यासाठी आपल्याला पैसा कमी पडतो आहे. त्यासाठी गेल्या वर्षी आम्ही तयारी करून काम केले. त्यासाठी जपान बँकेकडे आम्ही 892 कोटी रुपयांचे कर्ज आम्ही मागितले आहे. अत्यंत कमी व्याजाने ते आम्हाला मिळणार आहे. ते कर्ज मिळाले तर या समित्या आम्हाला सक्षम करता येईल. बाकी आपण सांगितले तसे बँका आहे, बाकीच्या इतरही संस्था आहेत, काही कंपन्या आहेत. यांना तर आपण यामध्ये सामील करून घेणारच आहोत. पण जे छोटे लोक आहेत त्यांना देखील यातून काही फायदा मिळाला पाहिजे आणि त्यातून गावाचे रक्षण होणार आहे. जसे आपण म्हणतो की, हे माझे गाव आहे, तसेच हे माझे जंगल आहे ही भावना लोकांमध्ये निर्माण होत नाही तोपर्यंत जंगल चांगले वाढू शकणार नाही.

( यानंतर श्री. सरफरे .... आरआर 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ....

लोकांकडून चांगल्या प्रकारची साथ जोपर्यंत मिळणार नाही तोपर्यंत चांगले जंगल वाढू शकणार नाही. त्याकरिता साडे अकरा हजार संयुक्त वन व्यवस्थापन समित्या स्थापन करुन त्यांचे काम आपण प्रत्यक्षात सुरु केले आहे. आणि साधारणत: मार्च अखेर संपूर्ण महाराष्ट्रात 16 हजार 300 सोसायटया स्थापन झाल्या पाहिजेत. त्यांचे वर्कशॉप घेऊन त्यांना कामाचे स्वरुप समजावून दिले पाहिजे. त्याहीपुढे जाऊन सांगतो की, लोकांनी वन उपज निर्माण केल्यानंतर ते विकायचे कुठे हा प्रश्न असतो? त्याबाबत वन विभागाने पुढाकार घेतला. आणि अशाप्रकारे जंगलामध्ये मध गोळा केल्यानंतर ते एका जागेवर आणायचे, वन औषधी वनस्पती, पाला, काटक्या इत्यादी सुध्दा एकत्र आणून ते घ्यायचे...

श्री. जयंत पाटील : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय वन मंत्री सविस्तर माहिती देत आहेत त्याबद्दल आम्हाला आनंद आहे. परंतु ही माहिती दिल्यामुळे मूळ प्रश्नाला न्याय मिळत नाही. याठिकाणी अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे तिला सुध्दा न्याय मिळाला पाहिजे. आम्हाला सुध्दा प्रश्न विचारण्याची संधी मिळाली पाहिजे. त्यामुळे मंत्रिमहोदयांनी फक्त या चर्चेपुरते मर्यादीत उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदया, माननीय सदस्यांनी अर्धा तास चर्चा उपस्थित केल्यानंतर केवळ त्यावर दोन-तीन वाक्यात किंवा दोन-तीन ओळीमध्ये उत्तर देऊन मला भाषण संपविता आले असते. परंतु माननीय सदस्यांनी मॅनग्रोव्हबाबतही मुद्दे उपस्थित केले आहेत. खाजगी जमिनीवरील वने आहेत, पडीक जमिनीवरील वने आहेत. त्या संदर्भात खाजगी संस्था कशाप्रकारे काम करीत आहेत, शासनाची यंत्रणा कशाप्रकारे काम करीत आहे यासंदर्भात अधिक माहिती दिली नाहीतर ते बरोबर होणार नाही. ती माहिती देणे ही शासनाची जबाबदारी आहे. आपणा सर्वांची एकत्रित जबाबदारी आहे. ती असल्यामुळे केवळ काहीतरी काम करावे म्हणून आपण केले नाहीतर मॅनग्रोव्ह असलेली संपूर्ण जमीन आपल्याकडे घेणार आहोत. 12 आठवडयामध्ये ही जमीन हस्तांतरीत करण्याचा निर्णय घेतला आहे. ती जमीन आल्यानंतर तिचे संवर्धन करण्याकडे लक्ष देणे व त्याचबरोबर आपण सांगितल्याप्रमाणे पडिक जमिनीवर चांगल्याप्रकारची वृक्ष लागवड करुन ती वनसंपत्ती टिकविली पाहिजे, शासनाच्या वनसंवर्धनाच्या कोणत्या योजना आहेत या सांगितल्या पाहिजेत. कारण आमचे खाते दुर्लक्षित खाते आहे. म्हणून माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांबाबत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते ....

मी मनापासून आभार मानतो . आणि मॅनग्रोव्हजना संरक्षण देणे ही फक्त शासनाची जबाबदारी नाही, ती सर्वांची जबाबदारी आहे असे समजून आपण सर्वांनी काम करावे एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

डॉ. अशोक मोडक : सभापती महोदया, मॅनग्रोव्ह हा एक भाग झाला. त्याठिकाणी समुद्र आहे, खाडी आहे तो विषय महत्वाचा आहे. मी मांडलेल्या 14 मुद्दयांबाबत आपणाकडून उत्तर मिळेल ही अपेक्षा होती परंतु त्यातील एकाच मुद्दयाचे उत्तर आले ते म्हणजे जमीन 20 वर्षाच्या लिजवर दिली जाईल. बाकीच्या विषयांबाबत उत्तर देणे शक्य नसेलतर किमान मुंबईला गेल्यानंतर बैठक घेऊन याबाबत चर्चा करु असे आपण म्हणावयास हवे होते. चर्चा अर्धा तासाची आहे, त्यासाठी दोन तास थांबायचे कां?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदया, माननीय सदस्य डॉ. मोडक यांनी सूचना केल्याप्रमाणे या संदर्भात मिटींग बोलाविण्याची गरज आहे. या अगोदर दोन बैठका झाल्या आहेत. या संदर्भात काही एनजीओ किंवा अन्य संस्था पुढे येत असतील तर त्यांचेसहीत आपणाला बरोबर घेऊन एकत्रित बैठक घेऊ . यासाठी आपल्याला केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागेल. आता त्यांनी 7 वर्षाची परवानगी दिली आहे, त्यामुळे न्याय मिळणार नाही. म्हणून परवानगीची मुदत वाढविण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आपण एकत्रित प्रयत्न करु.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदया, संत गाडगे बाबा ग्राम स्वच्छता अभियान, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज ग्राम स्वच्छता अभियानांतर्गत उत्कृष्ट काम करणाऱ्या गावांना पुरस्कार दिला जातो. त्याप्रमाणे "आमचे गाव आमचे रान" ही योजना धडाडीने राबविणाऱ्या गावाला आपण पुरस्कृत केले तर त्यामुळे जंगलवाढ, वृक्षवाढ, वनीकरण चांगल्या प्रकारे होईल. अशी शासनाची योजना आहे काय?

श्री. बबनराव पाचपुते : या संदर्भात योजना तयार केली असून ती राबवायला सुरुवातही केली आहे. त्या योजनेचे नाव "संत तुकाराम वनग्राम योजना" असे आहे. ज्या कमिटया यामध्ये चांगले काम करतील त्यांना आपण बक्षिस जाहीर करतो. त्यामधून त्या भागातील लोकांमध्ये आपलेपणा वाढेल, आपलेपणातून स्पर्धा वाढेल, आणि स्पर्धेतून चांगले काम होईल. हे लक्षात घेऊन ही योजना महाराष्ट्रामध्ये सुरु केली आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/MHM/SBT पूर्वी श्री.सरफरे . . . . 15:40

श्री.यशवंतराव गडाख : सभापती महोदया, मला असे वाटते की, सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडकसाहेबांचा अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित करण्याचा उद्देश असा असावा की, एकंदरीतच महाराष्ट्रातील जंगल कमी होत आहे. अशा वेळी यामध्ये सेवा संस्थांचा सहभाग असावा मग त्या बँका असतील, पतसंस्था असतील, अधिकृत बँका असतील, या सेवा संस्था आहेत त्या सर्वांचा शासनाने यामध्ये कसा सहभाग करुन घेता येईल आणि महाराष्ट्रातील जंगलतोड कशी थांबवावी यादृष्टीने विचार करावयास पाहिजे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, महाराष्ट्र शासनातील हे अत्यंत दुर्लक्षित खाते आहे. पण त्याचे महत्वही तेवढेच आहे हे अजूनही शासनाच्या लक्षात येत नाही. आज विदर्भामध्ये थोडेफार जंगल शिल्लक आहे. मराठवाडयामध्ये शिल्लक आहे पण पश्चिम महाराष्ट्र उघडा-बोडका झालेला आहे. तेथे झाडे शिल्लक राहीलेली नाहीत. झाडांची वारेमाप तोड सुरु आहे. अशा वेळी हे रोखण्यासाठी लोकांचा सहभाग कसा घेता येईल यादृष्टीने शासनाकडे काही योजना आहे का ? आपल्या महाराष्ट्रात जिल्हा परिषदा, पतसंस्था, जिल्हा बँका आहेत, कारखाने आहेत. त्या सर्वांना बरोबर घेऊन मोठया प्रमाणात झाडे लावण्याच्या दृष्टीने वन विभाग पुढच्या काळात प्रयत्न करणार आहे का ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.यशवतंराव गडाख साहेबांनी केलेली सूचना ही अत्यंत मौलिक आणि महत्वाची आहे. यासंदर्भात आम्ही प्रोजेक्ट तयार केलेला आहे. पण त्यासाठी केंद्र शासनाची परवानगी आवश्यक आहे. त्यासंदर्भात आपण केंद्र शासनाला पत्र लिहीलेले असून त्यांच्याबरोबर जेव्हा परत बैठक होईल, त्यावेळी याबाबत चर्चा होईल. यासंदर्भात आपल्या सूचना प्रत्यक्षात राबविण्याची आमची, महाराष्ट्र शासनाची तयारी आहे. पैसा उपलब्ध करुन त्याठिकाणी असलेल्या संस्थेला कामाला लावणे, सर्वांनाच एकत्रित आणल्याशिवाय वन वाढणार नाही. सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्रातील वनाच्या संदर्भात दुसरा प्रश्न मांडला की, पश्चिम महाराष्ट्र,कोकण,मराठवाडा व विदर्भ येथे जे वन आहे, त्यात सध्या विदर्भात 56 टक्के, पश्चिम महाराष्ट्रात फक्त 16. टक्के आहे, मराठवाडयात 4.1टक्के आहे आणि उत्तर महाराष्ट्रात 7.टक्के वन आहे. म्हणून सगळे वन या परिसरामध्ये आहे. येथे शिबीर कार्यालय आहे. वन खात्याचा कारभार फक्त मुंबईवरुन न चालता नागपूर येथून चालत आहे हेही मी याठिकाणी निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदया, मघाशी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले

. . . .2 एस-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

की, हाय कोर्टाने मँनग्रोव्हची जपणूक करण्यासाठी कमिटी नेमली असून किती मँनग्रोव्ह आहेत याची शासनामार्फत पाहणी सुरु आहे. मी त्याचे स्वागत करतो. पण ते करीत असताना मँनग्रोव्ह ही अशी जात आहे की, जी भराभर वाढत जाते. त्यामुळे आमच्या खारेपाटण मध्ये भातशेतीत फाटे फुटलेले आहेत. पण शासनाने योग्य वेळी कार्यवाही केली नाही, त्यामुळे भातशेतीमध्ये पाणी शिरुन तेथे मँनग्रोव्हची वाढ झालेली आहे. आता खारलॅण्डसाठी तरतूद करुन काही ठिकाणी बांध बांधण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे तेथे भातशेती पुन्हा निर्माण होण्याची शक्यता आहे. याबाबतीत पाहणी करताना, जेथे गेल्या 100 वर्षापासून भातशेती होती, त्याठिकाणी 2-3 वर्षापासून मँनग्रोव्ह उगविले आहेत. माननीय मंत्री महोदयांच्या गावात देखील तीच परिस्थिती आहे, तेथेही फाटा फुटल्यामुळे मँनग्रोव्ह झालेले आहेत. अशा वेळी हाय कोर्टाकडे खास बाब म्हणून गेल्या दोन-तीन वर्षात उगविलेले मँग्रोझ त्यातून वगळण्यासाठी शासन प्रयत्न करणार आहे का ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदया, हाय कोर्टाने दिलेल्या स्पष्ट सूचनेप्रमाणे जमीन हस्तांतरणाचे आणि पाहणीचे काम सुरु आहे. आपल्याला काही सूचना करावयाच्या असतील तर याबाबतीत जी कमिटी आहे, त्या कमिटीसमोर आपण मांडाव्यात. जर ती खाजगी जमीन आहे असे आपण दाखवून दिले तर तशी अडचण येणार नाही. पण समुद्रापासून किती अंतर आहे ? वगैरे, हे प्रत्यक्षात पाहून, त्यावेळी आम्ही आपल्याबरोबर राहू. पण सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबतीत सांगावयाचे तर वस्तुस्थिती काय आहे ? यासंदर्भात आम्ही आपल्याला जरुर मदत करु. कमिटीसमोर . . . .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा प्रश्न माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आलेला नाही असे वाटते. आम्ही ही शेती 100 वर्षे,150 वर्षे पिकवित आहोत. मी नाव घेऊन सांगतो. मेढेकरची खार, धादरची खार, राव्याची खार येथे बाहेरचे फाटे फुटले. पाच-पाच हजार एकर जमीन आहे. माझी मेढेकरची खार 800 एकर, मांडकुळयाची खार येथील साडेतीन हजार एकर जमीन आज नापिक झाली आहे आणि तेथे मँनग्रोव्ह उगविले आहेत. पूर्वी तेथे भात पिकत होते. अशा वेळी हाय कोर्टाला सांगितले पाहिजे की, ती जमीन वेगळी आहे आणि समुद्रखाराची जमीन वेगळी आहे हे शासनामार्फत सांगितले पाहिजे अशी आमची मागणी आहे. याबाबतीत पाहणी काय करता ? तुम्ही शासनामार्फत कोर्टात ॲफीडेव्हीट केले पाहिजे की, ही जमीन वेगळी आहे.

( यानंतर श्री. किल्लेदार..

अग्रिम प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/ पूर्वी सौ.रणदिवे.... 15:45

श्री.जयंत प्र.पाटील (पुढे सुरु....

तुमच्या सातबाराला भात शेती म्हणून गेली 100 वर्षे नोंद आहे, त्या ठिकाणी जर मॅनग्रोव्हज उगवले असेल तर त्याचे आपल्याकडे रेकॉर्ड आहे. त्याप्रमाणे हायकोर्टात सांगितले पाहिजे, ही माझी मागणी आहे.

श्री.बबनराव पाचपुते : या संदर्भामध्ये ही सगळी माहिती एकत्र करुन त्याचे संकलन होणार आहे. संरक्षित वन म्हणून जाहीर करण्याच्या अगोदर, ही बाब अगोदर येईल तेव्हा शासन आपल्या बाजूने राहील. जी वस्तुस्थिती आहे, ती कोर्टासमोर आणून देण्यास आम्ही तयार आहोत.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, वनमंत्र्यांनी राज्यामध्ये कोठे कोठे वन आहे त्याबाबतची माहिती दिली. त्यांनी कोकणाचा देखील उल्लेख केला. परंतु कोकणामध्ये वन खात्याच्या किती जमिनी आहेत ? हे त्यांनी सांगितलेले नाही. संपूर्ण महाराष्ट्रातील वन संज्ञेखाली साडे बासष्ट हजार हेक्टर जमीन घेतली. या साडे बासष्ट हजार हेक्टर वन संज्ञेखालील जमिनीपैकी जवळजवळ साडे बेचाळीस हजार हेक्टर जमीन ही सर्वात लहान असलेल्या सिंधुदूर्ग जिल्हयातील जमीन नोंदली गेली. आपल्या अधिकाऱ्यांनी खोटी ॲफिडेव्हीट कोर्टामध्ये केलेले आहे, त्याबाबत मंत्री महोदयांना माहीत नाही, सचिवांना माहिती नाही. आता सुप्रीम कोर्टाने ठपका मारलेला आहे. सिंधूदूर्ग जिल्ह्यामध्ये शासनाची वन जमीन नाही, जी काही वने असतील त्या वनावर आंब्याच्या बागा आहेत हेलीकॅप्टरवरुन पहाणी केली तेव्हा हिरवे वन दिसले म्हणून साडे बासष्ट हजार हेक्टरपैकी साडे बेचाळीस हजार हेक्टर जमीन सिंधुदूर्ग जिल्ह्यातील नोंदविली. या संदर्भात दोन-चार वेळा बैठका झालेल्या आहेत, आपल्या बरोबरही बैठका झालेल्या आहेत. आपल्या अगोदरच्या वन मंत्र्यांच्याबरोबरही बैठका झाल्या. आता हा प्रश्न आपण केव्हा सोडविणार आहात ?

श्री.बबनराव पाचपुते : सन्माननीय सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी हे वन संज्ञेच्या संदर्भात बोलले. त्याची त्यांना माहिती आहे, ते जाणकार आहेत. ही गोष्ट खरी आहे की, वन संज्ञा लावत असताना, खाजगी जमीन आहे की, आणखी कोणाची जमीन आहे, हे न पहाता बासष्ट हजार हेक्टरपैकी बेचाळीस हजार हेक्टरचा उल्लेख केलेला आहे. या संदर्भात सध्या सुप्रीम कोर्टामध्ये केस चालू आहे. ॲफिडेव्हीट दाखल करण्याच्या संदर्भात एकत्र बसून लोकांशी चर्चा केली जाईल. खरे म्हणजे वन संज्ञा करत असतांना त्या जमिनीवर किती झाडे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे सुरु....

आहेत,याची पाहाणी केली जाते. परंतु कोणाच्या तरी दुर्लक्षामुळे, कोणाच्या तरी सांगण्यावरुन, अति उत्साहामुळे काही गोष्टी घडलेल्या आहेत. या संदर्भात ॲफिडेव्हीट दाखल करताना ही अडचण दूर करण्याच्यासंबंदर्भात आपल्याबरोबर राहू, आपल्याशी चर्चा करु, मुंबईमध्ये बैठक घेतल्यानंतर त्या संदर्भातील ॲफिडेव्हीट दाखल करण्याचा निर्णय घेऊ. कोकणामध्ये वन खात्याची जमीन किती आहे अशी विचारणा केली. कोकणामध्ये झाडे भरपूर आहेत परंतु शासकीय वन फक्त 8 टक्के आहे, त्यापेक्षा जास्त नाही.

प्रा.शरद पाटील : सहकारी बँकांच्या माध्यमातून पडिक जमिनीवर वृक्ष लागवड करुन वनीकरण वाढविता येईल काय, अशाप्रकारचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्याला उत्तर देत असतांना मंत्री महोदयांनी वन खात्याची संपूर्ण हकिगत सांगितली, त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. राज्य शासनाच्या अंदाजपत्रकामध्ये वन खात्याला किती नगण्य स्थान मिळते, याचाही त्यांनी उल्लेख केला. ही रक्कम वाढवून घेण्याच्यादृष्टीने त्यांनी प्रयत्न करावेत. सन्माननीय सदस्य श्री.गडाख साहेबांनीही मुद्दा उपस्थित केला, तो आजच्या या अर्धातास चर्चेच्या दृष्टीने महत्वाचा आहे, असे मी मानतो. सहकारी बँका, गाव सोसायट्या, बेरोजगारांच्या सहकारी संस्था अशा संस्थांच्या माध्यमातून पडिक जमिनीवर वृक्ष लागवड करण्यासाठी शासन प्रोत्साहन देणार आहे काय ? संस्था ज्या गावात आहेत त्या गावालगतच्या जमिनी असतील तर त्या जमिनी संस्थांना वनीकरणासाठी देणार आहात काय ? त्याला स्पेशिफीक उत्तर द्यावे.

श्री.बबनराव पाचपुते : सन्माननीय सभापती महोदया, मी या संदर्भातील उत्तर दिलेले आहे. विस्ताराने प्रश्न विचारला, या संदर्भात आपण प्रयोग केलेला आहे. काही ठिकाणी यशस्वी झाला. अजमेरा नावाचा कारखाना आहे, त्यांनी जमीन घेतली, त्यामध्ये सुधारणा केली. चांगल्या प्रकारचे वन तयार केले. शेजारी वन खात्याची पडिक जमीन आहे, परंतु यांना जमीन दिली,त्यानंतर त्या ठिकाणी तीन वर्षामध्ये चांगल्या प्रकारची झाडे येऊ शकलेली आहे.

यानंतर कु.थोरात.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार.. 15:50

श्री. बबनराव पाचपुते...

ही जमीन हस्तांतरीत करता येणार नाही. पण त्यांना त्या कामासाठी जमीन देऊन त्याचा फायदा वन वाढविण्यासाठी करता येतो. अशा प्रकारे आम्ही करण्यासाठी तयार आहोत. पण त्यामध्ये एक अडचण आहे. केंद्र सरकारने त्यांना पाच ते सात वर्षासाठी जमीन देण्यास सांगितले आहे. त्यामुळे संस्था पुढे येत नाहीत. त्यांना पुढे आणावयाचे असेल तर त्यांना ती जमीन 30 वर्षासाठी दिली पाहिजे. परंतु 30 वर्षा ऐवजी आता 20 वर्षाची मुदत वाढवून मिळणार आहे. 20 वर्षासाठी मुदत वाढूवन मिळाल्या नंतर या पध्दतीने महाराष्ट्रात करण्यास शासन तयार आहे.

श्री. जी.एल. अैनापुरे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी खूप गांभीर्याने सविस्तर माहिती या ठिकाणी दिलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. अशोक मोडक साहेबांनी बँके मार्फत ही योजना राबवावी असा सभागृहापुढे प्रस्ताव मांडला आहे. मी स्वत: शिक्षक आहे आणि शिक्षकांचा प्रतिनिधी म्हणून सांगू इच्छितो की, शिक्षकांच्या हाताशी भरपूर विद्यार्थी असतात. सातारा कोल्हापूर जिल्हयात आमच्या संस्थेने वन खात्याच्या सहका-याने वृष संवर्धनाचे काही प्रकल्प राबविले आहेत. वन खात्याने शेजारी असलेल्या दोन टेकडया आमच्याकडे दिल्या होत्या. तेथे सागाची लागवड करुन त्या ठिक्राणी वन संरक्षण केलेले आहे. साताऱ्च्या बाहेरुन जातांना उजवीकडे जी झाडी आहे ती झ ाडे एल.बी.एस. कॉलेजच्या विद्यार्थ्यानी लावलेली आहेत. तसेच संबंध महाराष्ट्रभर ज्या ज्या शाळा आणि महाविद्यालयाच्या परिसरामध्ये मोकळया टेकडया किंवा मोकळी जागा असेल किंवा गावाच्या भोवती थोडी-थोडी मोकळी जागा असते त्या जागेत ठराविक शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांच्या सहकार्याने वृक्ष लागवड केली आणि त्याचे संवर्धन केले तर चार-पाच वर्षात त्या गावाभोवती आणि टेकडीवर चांगल्या पध्दतीचे जंगल तयार होऊ शकते. अशी योजना आपण महाराष्ट्र शासनातर्फे घेऊ शकाल काय?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदया, सजेशन फॉर ॲक्शन.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. मोडक साहेबांनी अर्धा-तास चर्चेमधून जो विषय मांडला आहे त्या बाबतीत दोन गोष्टी मी पुन्हा आग्रहपूर्वक या ठिकाणी मांडणार आहे. मला वाटते सन्माननीय मंत्रिमहोदयांना देखील याची जाण आहे. मागच्या अधिवेशनामध्ये मी बोललो होतो. परंतु दोन गोष्टीची मी जाणीवपूर्वक पुन्हा आठवण करुन देणार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत...

आहे.खारफुटीच्या संदर्भात मी स्पेसिफिक सांगणर आहे.आता काल-परवा मी अतिक्रमणाच्या संदर्भात बोललो होतो त्या मानखुर्दला खारफुटी आहे तसेच नव्या मुंबईत जी वस्ती वाढत आहे तेथे रस्त्यावरील खारफुटी तोडली जात आहे. त्यासंबंधात वर्तमानपत्रात छायाचित्र येतात. मला कळत नाही की, वन खात्याच्या संबंधित अधिका-यांना वर्तमानपत्रातील बातम्या वाचून सुध्दा कारवाई कराविशी वाटत नाही, याचे दु:ख होते. वृक्ष तोडीच्या संदर्भात मी सांगू इच्छितो. रायगड आणि खासकरुन पेणमध्ये कातकरी हा आदिवासी समाज आहे. त्यांचा उदरनिर्वाह लाकडे तोडून इकडे आणून विकणे यावर अवलंबून आहे. तुम्ही पनवेल आणि पेण या रस्त्यावर सकाळी गेलात तर तुम्हाला दिसून येईल की, तेथे रोज राजरोसपणे जंगल तोड चालू आहे. पण ही जंगलतोड कोणाला दिसत कशी नाही? याचे मला आश्चर्य वाटते. तिसरा विषय होता, वणवा पेटला तर काय? त्याबाबतीत "एसओएस" असा एक नंबर द्यावा अशी मी सूचना केली होती. जसे आम्ही 100 नंबर डायल करुन पोलिसांना आणि 101 नंबर डायल करुन फायरब्रिगेटला बोलावतो तशा पध्दतीने वन खात्याच्या संदर्भात विशिष्ट तीन अंकी नंबर द्यावा. जेणेकरुन महाराष्ट्रात कुठेही जंगलतोड होताना दिसली,जी वन खात्याला दिसत नाही, पण आम्हाला दिसते. आणि आम्ही केवळ जळफळाट करीत बसतो, त्याच्या पलिकडे काहीही करु शकत नाही, अशा वेळेला निदान आम्हाला फोन करुन तरी सांगता येईल. या ठिकाणी श्री. पोळसाहेब बसले आहेत.आम्ही पी.ए.सी. समितीवर आहोत. मध्यंतरी आम्ही वन विकास मंडळाला भेट दिली, त्यांच्या बरोबर चर्चा केली आणि प्रत्यक्ष त्या जागेवर जाऊन पाहून आलो. मला सांगायला खेद वाटतो की, जेव्हा समितीने प्रश्न उपस्थित केला की, त्या ठिकाणी झाडे किती लावली ? त्यावेळेला उत्तर देण्यात आले की, 10 हजार झाडे लावण्यात आली. त्यापैकी किती आली ? तर 1000 झाडे आली. त्याला किती वर्षे झाली? तीन वर्षे झाली. मग त्या झ ाडांपासून उत्पन्न कधी मिळणार? अशा प्रकारचे प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. त्यावेळेला मी कमिटीत जी सूचना केली होती ती सन्मानीय सदस्य श्री. मोडक साहेबांच्या आजच्या या सूचनेला पूरक आहे. मी कमिटीत असे म्हटले होते की, रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून काही कामे करण्यात येतात. तेव्हा वन खात्याने बेरोजगार लोकांना झाडे लावावयास सांगावे आणि त्यांनाच त्या वृक्षाचे संवर्धन करायला लावावे. त्यावेळी असे उत्तर दिले की, ...........

..3..



SMT/ SBT/ MHM/ प्रथम श्री. किल्लेदार.. 15:50

श्री. अरविंद सावंत...

आम्ही हा प्रयोग केला होता. मुलांकडून आम्ही ही झाडे लावून घेतली होती. झाडे लावली. पण त्या झाडांचे संवर्धन, संरक्षण कोण करणार? ती तशीच निसर्गाची वाट पाहात पडली आहेत. म्हणून माझ ो दोन-तीन प्रश्न या ठिकाणी आहेत. एसओएस नंबर केव्हा देणार? मागच्या वेळेला मंत्रिमहोदयांनी माझी सूचना मान्य केली होती. आरविद सावंत तुमची सूचना मला मान्य आहे. आम्ही लवकरात लवकर यासंबंधीची कारवाई करु असे आपण म्हटले होते. त्या सूचनेची अंमलबजावणी आजपर्यंत झ ालेली नाही. खारफुटीच्या संदर्भात श्री. जयंत प्र. पाटील यांनी सूचना केली होती. त्याचे दोन भाग आहेत. एक निसर्गतः मूलतः असलेली खारफुटी आणि खारे पाणी येऊन शेतजमिनीमध्ये निर्माण झ ालेली खारफुटी यामध्ये आपल्याला भेद करावा लागेल.

यानंतर श्री. खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .......

आणि त्यासाठी आपल्याला केंद्रशासनाची वाट पाहण्याची गरज आहे असे मला वाटत नाही. कारण मुळात हया जमिनी शेतकऱ्यांच्या असून वर्षानुवर्षे ते कसत आहेत, त्या ठिकाणी कोलम तांदूळ पिकत नाही तर जाडाभरडा तांदूळ पिकतो. म्हणून माझी विनंती आहे की, यामध्ये विभाजन आपण करावे. या खारफुटीच्या संदर्भात केंद्र शासनाकडे जाण्याची गरज नाही, आपण निर्णय घेऊ शकता. मुंबई आणि ठाणे परिसरातील खारफुटी तोडली जाते, तिचे संरक्षण व्हावे तसेच यासाठी एसओएस नंबर मिळावा व हे काम सुशिक्षित बेकारांना देता येईल काय याचाही विचार होणे आवश्यक आहे. हे शासन करणार काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, चर्चा अर्ध्या तासाची आणि प्रश्न मात्र जास्त वेळ असा प्रकार झालेला आहे. अर्थात सन्माननीय सदस्यांनी जास्त माहितीसाठी हे प्रश्न विचारले ही गोष्ट चांगली आहे. सुरुवातीलाच मी सांगितले की, सर्व वन खात्याच्या जमिनीवर नाही तर त्यात 8500 हेक्टर एवढीच जमीन वन खात्याची आहे आणि उरलेली 22 हजार हेक्टर जमीन शासनाच्या ताब्यात आहे अशी या दीड लाख हेक्टरची विभागणी आहे. उरलेली जमीन खाजगी आहे. ही खारफुटी जोपर्यंत संरक्षित वनस्पती म्हणून जाहीर होत नाही तोपर्यंत आपल्याला काही करता येणार नाही. तसा प्रस्ताव आपण केंद्र शासनाकडे सादर केलेला आहे. एकदा संरक्षित वनस्पती म्हणून जाहीर झाल्यानंतर परवानगी शिवाय खाजगी क्षेत्रात सुध्दा कोणालाही ती तोडता येणार नाही. त्सुनामीच्या लाटा आल्यानंतर आपल्या लक्षात आले की, खारफुटीची बेसुमार तोड झ ााल्यामुळे काय परिणाम होतात ? पण ती फक्त वन खात्याच्या अखत्यारितच आहे असे नाही तर खाजगी जमिनीमध्ये सुध्दा होत आहे. या ठिकाणी हे खारफुटीचे पाणी फुटले आणि जमिनीत घुसल्यामुळे नुकसान झाल्याचे सांगण्यात आले आहे. ही खारफुटी तयार करावी लागत नाही तर ती खाली पडते आणि त्यात वाढ होत जाते. या ठिकाणी हे काम सुशिक्षीत बेकारांना देता येईल काय याबाबतचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. त्याबाबत मी स्पष्ट करु इच्छितो की, याबाबत संयुक्त वन व्यवस्थापन समितीचा जो निर्णय झाला तोच निर्णय आपल्यालाही करावा लागणार आहे. त्यांना ती जमीन वन वाढविण्यासाठी लागते, 33 टक्के वनौपज आहे त्यासाठीच आपण मदत करतो, त्यापेक्षा वेगळे आपल्याला करता येणार नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. यशवंतराव गडाख यांनी प्रश्न विचारला आणि मंत्री महोदयांनी देखील त्याबाबत गांभीर्य व्यक्त केले आहे. 1/3 वन लागवड आपल्याला केली पाहिजे. म्हणून ज्या भागात अशी जमीन आहे त्या ठिकाणी शेतकऱ्यांना आपण कंपल्सरी सांगणार काय की, जास्तीत जास्त पीक घ्या, धान्य वगैरे काढा नाही तर शासन जमीन ताब्यात घेईल, हे शासन करणार काय ? तसेच जो आदेश हायकोर्टाने दिला की, ज्यांनी खारफुटी बेकायदेशीर तोड केली त्यांच्यावर न्यायालयात खटले भरावेत, असे किती खटले शासनाने भरले ? आणि बँकेला दरवर्षी होणाऱ्या निव्वळ नफयातून एक-दोन टक्के एवढी रक्कम खर्च करण्याची परवानगी सहकार आयुक्तांकडून वन खाते मिळवून देणार काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचे प्रश्न विचारले आहेत. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, नंबर्सच्या संदर्भात आम्ही संबंधित विभागाच्या संपर्कात आहोत, तो मिळाल्यानंतर हा प्रश्न सुटू शकेल. तसेच बँकेला काय द्यावयाचे याबाबत सन 1980 च्या वन संरक्षण अधिनियमामध्ये बदल करावयाचा असल्यास तसा प्रस्ताव केंद्रशासनाकडे पाठवावा लागतो व तसा प्रस्ताव शासनाकडून पाठविण्यात येईल.

यानंतर श्री. भारवि ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते....

जमीन लीजवर देण्याची मुदत 7 वर्षाच्या ऐवजी 20 वर्षे करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविण्यात आला आहे. तसेच खाजगी कंपन्यांना जमिनी फक्त वहितीसाठी म्हणजे वन उपजासाठी देण्यात येणार आहेत. त्यामुळे वनामध्ये वाढ होईल याबद्दल शंका नाही. ज्या लोकांनी वृक्ष तोड केली आहे, त्यांच्यावर आपण खटले दाखल करणार का ? असा देखील प्रश्न विचारण्यात आला आहे. आमच्याकडे जमीन येत नाही तो पर्यंत आम्ही काहीही करू शकत नाही. आम्ही 12 आठवडयांचा वेळ देणार. 12 आठवडयांच्या पाहणी नंतर जमीन आमच्या ताब्यात आल्यानंतर तेथे वृक्ष तोड केल्याचे लक्षात आल्यानंतर संबंधितांविरूध्द कारवाई करण्यात येईल. त्यासाठी कायद्यामध्ये सुधारणा करण्याचा मानस देखील आहे. एखाद्याने खून केला तर त्याच्या विरूध्द कलम 302 अन्वये कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे एखाद्याने वृक्ष तोड केली तर त्याच्याविरूध्द अजामीनपात्र गुन्हा दाखल करण्यासंबंधीची तरतूद आम्ही कायद्यात करण्यासाठी विचार करीत आहोत.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.अशोक मोडक यांनी अतिशय महत्त्वाच्या विषयावर चर्चा घडवून आणल्या बद्दल मी त्यांचे आभार मानतो. शालेय शिक्षणामध्ये आता पर्यावरण हा विषय आलेला आहे. इयत्ता नववी व दहावीच्या मुलांच्या अभ्यासक्रमात पर्यावरणाचा विषय समाविष्ट करण्यात आला आहे. बालमनावर संस्कार झाले तर त्याचा चांगला फायदा होतो हे शासनाला आता कळले आहे. वनांचा ऱ्हास झाला तर अनेक जमिनींना पाणी मिळणार नाही. मनुष्यहानी होईल असा गंभीर इशारा मंत्रिमहोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणातून दिलेला आहे. पर्यावरणासंबंधी माहिती विद्यार्थ्यांना दिली तर त्याचा फायदा हा समाजाला होणार आहे. पूर्वी एक मूल, एक झाड ही योजना होती. आपण प्रत्येक मुलाला एक झाड मोफत देऊन शालेय विद्यार्थ्यांमार्फत सदर राबविली होती. त्याप्रमाणेच शासकीय इमारतींच्या आवारात, परिसरामध्ये वृक्ष लावण्याची योजना राबविली पाहिजे. त्यासाठी विद्यार्थ्यांना मोफत रोपटे शासन देणार आहे का ? असा माझा पहिला प्रश्न आहे. या योजनेची सुरूवात ही वन विभागाच्या कार्यालयांपासून केली पाहिजे. तसेच, वन विभागातर्फे शासकीय इमारतींच्या आवारात रोप



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे.....

लावण्याची योजना शासन सुरू करणार आहे का ? असा देखील माझा प्रश्न आहे. वन विभाग सर्वांना सांगते की, झाडे जगविली पाहिजे. पण आमच्या अकोला येथील वन विभागाच्या कार्यालयातील वृक्ष तोडण्यात आले आहेत. पण वन अधिकाऱ्यांनी तेथे एकही रोप लावलेले नाही. तेव्हा वृक्ष लागवडीची सुरूवात शासन वन विभागाच्या कार्यालयापासून करणार आहे का ? नव्हे, वन विभागाच्या अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयाच्या व अन्य शासकीय कार्यालयांच्या आवारात वृक्ष लागवड करण्यासाठी शासन सक्ती करणार आहे का ?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदया, या प्रश्नाची व्याप्ती फार मोठी आहे. शासनाचा प्रतिनिधी म्हणून मी जबाबदारीने उत्तर देणार आहे. प्रत्येक माणसांमध्ये झाडे लावण्यासंबंधीची व प्रत्येक विद्यार्थ्यांला मोफत रोप देऊन पर्यावरणाच्या दृष्टिने जागरूकता निर्माण करण्याच्या सूचनेची अंमलबजावणी कशी करता येईल यासंबंधी प्रयत्न केला जाईल. तसेच, शासकीय कार्यालयाच्या आवारात वृक्ष लागवड करण्यासंबंधी सक्ती करण्यात येईल व त्यासंबंधीचे परिपत्रक काढून संबंधितांना आदेश देण्यात येतील. जो कोणी आदेशाचे पालन करणार नाही, त्यांच्याविरूध्द दंडात्मक कारवाई देखील केली जाईल.

श्री.अनंत तरे : सभापती महोदया, आज शहरांमध्ये वृक्ष तोड जेवढी होत आहे, तेवढयाच प्रमाणात शहरात तिवरांच्या झाडांची तोड होत आहे. ही बाब वन खात्याच्या अखत्यारित येते किंवा नाही हे मला माहित नाही. समुद्र किनारी असलेल्या तिवरांच्या झाडांची बेसुमार कत्तल होत आहे. मुंबई-ठाणेच्या परिसरामध्ये तिवरांच्या झाडांची तोड करून तेथे भरणी करून इमारती उभ्या राहत आहेत. तेव्हा यासंबंधी शासन कोणत्याही प्रकारची कारवाई करणार आहे ? मुंबई-ठाणे शहरातील वृक्ष तोडीबद्दल नगरसेवकांनी तक्रारी देखील केलेल्या आहेत. पण त्यांच्या तक्रारीची दखल घेतली जात नाही. तेव्हा याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे ?

यानंतर श्री.अजित...

.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.तरे हे या विषयातील जाणकार आहेत. ही जी तिवरांची झाडे आहेत ती संरक्षित वनस्पती म्हणून घोषित झालेली नाहीत. ही झाडे संरक्षित वनस्पती म्हणून घोषित झाल्यानंतर त्यावर आपोआप वन विभागाचा अधिकार राहील. ही झाडे तोडायची असतील तर प्रथम वन विभागाची परवानगी घ्यावी लागेल. हे आतापर्यंत झालेले नाही पण ते करण्याचा आमचा प्रयत्न आहे. जी वन विभागाची जमीन आहे त्यावरील झाडे तोडली तर आम्ही कारवाई करु पण खाजगी जमिनींवरील झाडे तोडली तर त्याबाबतीत आम्ही काही करु शकणार नाही. म्हणून यासंबंधी आता उच्च न्यायालयात एक जनहित याचिका दाखल झालेली आहे. आता तिवरांची झाडे असलेली जमीन ताब्यात घेण्याचा विचार सुरु आहे. तिवरांची झाडे संरक्षित वनस्पती म्हणून घोषित झाल्यानंतर जरी खाजगी जमिनीवरील अशी झाडे तोडली तरी आम्ही त्यांच्याविरुध्द कारवाई करु शकतो. आपण दुसरा जो प्रश्न विचारला झाडे तोडून त्याठिकाणी इमारती उभ्या केल्या त्या इमारतींच्या बाजुला झाडे लावावीत. याबाबत सांगू इच्छितो की, यापुढे जो कोणी नवीन घर बांधेल त्याने झाडे लावली पाहिजेत असे त्याचेवर बंधन घालण्यात येईल. त्या भागात जी झाडे लावण्यासाठी देण्यात येतील ती झाडे त्यांनी लावलीच पाहिजेत त्याशिवाय त्याला घरासाठी कर्ज उपलब्ध होणार नाही, अशा प्रकारची दुरुस्ती आपल्याला कायद्यात करावी लागेल. अशा आशयाचे एक पत्र आम्ही शासनाला दिलेले आहे. या संदर्भात शासन पुढाकार घेईल एवढेच मला याठिकाणी सांगावयाचे आहे.

श्रीमती कांता नलावडे : सभापती महोदया,आज आपण महाराष्ट्रामध्ये पाहतो की, गावांगावांमध्ये बचत गट तयार झालेले आहेत. जी पडीक जमीन असते ती या बचत गटातील महिलांना अखाद्यतेल किंवा सागाची लागवडीसाठी उपलब्ध करुन देता येईल का ? जेणेकरुन त्यांना रोजगार मिळू शकेल. माझा दुसरा असा आहे की, सहकारी बँकांना दरवर्षी होणारा जो निव्वळ नफा आहे त्यातील एक ते दोन टक्के रक्कम खर्च करण्याची परवानगी देणार आहात काय ?

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदया, खरे म्हणजे आपल्याला वनाचे संवर्धन करायचे असेल तर ते पुरुषांपेक्षा महिला जास्त करु शकतात याची जाणीव वन विभागाला आहे. तेव्हा ज्या कमिट्या तयार करतो त्यामध्ये पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त महिला असल्या पाहिजेत. तसेच चेअरमन किंवा व्हाईस चेअरमन या दोन पदांपैकी एक पद महिलांकडे असले पाहिजे अशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. जे बचतगट सक्षम असतील त्यांना काही जमीन वनउपजासाठी देऊन त्यावर डिंक, मसाला वा इतर वगैरे लागवड करुन त्याचा महिला बचत गटाला फायदा होऊ शकतो.या गोष्टीस प्रत्यक्षात सुरुवात झालेली आहे. आपण जो दुसरा प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, कायद्याची अडचण असल्यामुळे आपल्याला तसे करता येणार नाही.

----------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: खाजगी शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या किरकोळ रजेत करण्यात आलेली कपात.

**मु.शी.**: खाजगी शाळेतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या किरकोळ रजेत करण्यात आलेली कपात यासंबंधी श्री.रामनाथ मोते यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा.

श्री.रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयांवर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो -

"राज्यातील खाजगी शाळांमध्ये काम करणाऱ्या शिक्षक-शिक्षकेत्तराच्या किरकोळ रजा 15 ऐवजी 8 दिवसांची करणे, शिक्षकांना पुन्हा 8 ऐवजी 12 दिवस किरकोळ रजा करणे, तथापि, कामकाजात 4 दिवसांची वाढ करणे, शिक्षकेत्तरांना 8 दिवसांचीच रजा देणे, नियमात दुरुस्ती करतांना योग्य पध्दतीचा अवलंब न करणे, नियमावली 1981 च्या कायदेशीर बाबीचे उल्लंघन करुन शिक्षक-शिक्षकेत्तर हक्काच्या रजांपासून वंचित ठेवणे, यामुळे शिक्षक-शिक्षकेत्तरांमध्ये पसरलेला असंतोष व त्याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना व शासनाची भूमिका."

सभापती महोदया,महाराष्ट्रातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या रजेच्या संदर्भात गेली अनेक वर्षे हा प्रश्न शासनाने सातत्याने लोंबकळत ठेवलेला आहे. म्हणून मी याठिकाणी अर्धातास चर्चेच्या द्वारे हा प्रश्न उपस्थित केलेला आहे. महाराष्ट्रामध्ये सन 1981 पर्यंत शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या शिक्षक -शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कायदेशीर आधार असलेली कोणतीही तरतूद उपलब्ध नव्हती. माध्यमिक शाळा संहिता अस्तित्वात होती पण त्यास कायदेशीर आधार नव्हता. त्यानंतर महाराष्ट्र खाजगी शाळा सेवा शर्ती नियमावली होती. त्याच्या अगोदर 1977 चा कायदा आला त्यानंतर 1981 ची नियमावली शासनाने जाहीर केली. तेव्हापासून महाराष्ट्रामध्ये काम करणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कायदेशीर सेवा शर्ती उपलब्ध झाली. 1977 चा कायदा 15 जुलै 1981 पासून अमलात आला.

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी मा.तालिका सभापती, श्रीमती कांता नलावडे )**

श्री.रामनाथ मोते....

1981 च्या नियमावलीतील 16.4 हा नियम किरकोळ रजेच्या संदर्भातील आहे. शिक्षण क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांना एका वर्षासाठी 15 दिवसांची किरकोळ रजा अनुज्ञेय आहे. एस.एस. कोडमध्ये सुध्दा ही तरतूद आहे. 1977 च्या कायद्याला, 1981 च्या नियमावलीला या सभागृहाने मान्यता दिली. त्या नियमावलीमध्ये किरकोळ रजेच्या संदर्भात जी तरतूद करण्यात आली ती 15 दिवसांची करण्यात आली. परंतु या 15 दिवसांच्या किरकोळ रजेची तरतूद बदलण्याचा पहिला प्रयत्न शासनाने दिनांक 4/4/1989 रोजी केला. शिक्षण संचालकांनी परिपत्रक काढून, महाराष्ट्रातील खाजगी शाळांतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या किरकोळ रजा 15 ऐवजी 12 करण्याचा निर्णय घेतला. संघटनेमध्ये काम करीत असताना, शिक्षकांची कामे करीत असताना हा निर्णय माझ्या निदर्शनास आल्यानंतर मी शासनाच्या निर्णयाविरुध्द मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र.3170/1989 दाखल केली. या याचिकेचा निकाल दिनांक 21/8/1989 रोजी लागला. त्या निर्णयामध्ये उच्च न्यायालयाने स्पष्ट म्हटले आहे की, कायद्यात किंवा नियमावलीमध्ये बदल करण्याची जी पध्दत आहे त्या पध्दतीनुसार जोपर्यंत शासन रजेच्या कालावधीत बदल करीत नाही, तोपर्यंत शासनाला शिक्षकांच्या किरकोळ रजा कमी करता येणार नाही. या आदेशाचा परिणाम असा झाला की, दिनांक 4/4/1989 रोजी काढलेले आदेश शासनाला मागे घ्यावे लागले. त्यामुळे शासनाकडून 16/10/1989 रोजी सुधारित परिपत्रक काढण्यात आले की, पूर्वीचा आदेश रद्द करण्यात येत असून, पुढील आदेश होईपर्यंत शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पूर्वीप्रमाणेच म्हणजेच 15 दिवसांच्या किरकोळ रजा देण्यात याव्यात. 1989 ते 1999 पर्यंत रजेचे स्वरुप चालू होते. 10 वर्षापर्यंत शासनाने यामध्ये काहीही ढवळाढवळ केली नाही. परंतु दिनांक 12 ऑक्टोबर, 1999 रोजी पुन्हा एकदा आदेश काढून, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना नियम 16.4 नुसार ज्या 15 दिवसांच्या किरकोळ रजेची तरतूद होती, त्याच्यात बदल करुन, 8 किरकोळ रजा देण्याचे ठरविले. महोदया, आमच्या रजा 7 दिवसांनी कमी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आणि 16 नोव्हेंबर, 1999 रोजी याबाबतचे परिपत्रक शिक्षण संचालकांनी काढले. महोदया, पुन्हा एकदा नियमावलीमध्ये योग्य तो बदल न करता, विधानमंडळामध्ये प्रस्ताव न मांडता, चर्चा न करता शासनाने खाजगी शाळांत काम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

..2..

श्री.रामनाथ मोते....

करणाऱ्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या किरकोळ रजा 15 ऐवजी 8 करण्याचा एकतर्फी निर्णय घेतला. त्यामुळे पुन्हा एकदा मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र.2308/2000 दाखल झाली आणि या याचिकेचा निकाल दिनांक 3 जुलै, 2000 रोजी लागला. मुंबई उच्च न्यायालयाने या विषयाबाबत जो निकाल दिला त्या निकालातील दोन मुद्दे महत्वाचे आहेत. निकालामध्ये उच्च न्यायालयाने सांगितले की, शासनाने सेक्शन 4.1 आणि 16.1 चे उल्लंघन केलेले आहे. सेक्शन 4.1 असे म्हणतो की, "...the State Government may make rules providing for the minimum qualification for recruitment (including its procedure), duties, pay, allowances, post-retirement and other benefits, and other conditions of service of employees of private schools and reservation of adequate number of posts for members of the backward classes; Provided that, neither the pay nor the rights in respect of leave of absence, age of retirement and post-retirement benefits and other monetary benefits of an employee in the employment of an existing private school on the appointed date shall be varied to the disadvantage of such employee by any such order."

नंतर श्री.गायकवाड....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते ....

याचा अर्थ असा आहे की, दिनांक 15.7.1981 रोजी जें शिक्षक सेवेमध्ये होते त्यांच्या बाबतीत त्यांची रजा कमी करण्याचा निर्णय घेता येणार नाही अशा प्रकारे सेक्शन 4(1)मध्ये म्हटलेले आहे आणि न्यायालयाने हे उचलून धरलेले आहे. सभापती महोदय, या निर्णयामध्ये असे म्हटले आहे की, The Act came into force on 15th July, 1981 by virtue of a Government Notification issued under such section (3) of section 1 of the Act. The consequence of section 4 is that where an employee was in the employment of an existing private school on 15-7-1981 his rights inter alia in respect of the leave of absence shall not be varied to the disadvantage of such an employee by the Rules. The right of this class of employees is thus safeguarded." असे असतांना शासनाने पुन्हा वेगळा निर्णय घेतला आहे. न्यायालयाने असे म्हटलेले होते की," शासनाला नियमावलीमध्ये बदल करण्याचा अधिकार आहे" परंतु हा बदल कोणत्या पध्दतीने केला पाहिजे ? न्यायालयाने आपल्या या निर्णयात असे स्पष्ट म्हटले आहे की, "Of course, any modification of the Rules must be consistent with the requirements of the proviso to such section (1) of section 4." त्या निर्णयामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "We must clarify that since the grant of casual leave is provided in Rule 16 of the Rules framed under the Act any amendment to the Rules would be a matter for the government to decide and must be brought into force by the State Government in accordance with law." हे न्यायालयाने स्पष्ट केलेले आहे. परंतु सेक्शन 4(1) चे आणि सेक्शन 16(1) चे सुध्दा पालन

झालेले नाही. न्यायालयीन याचिकेच्या बाबतीत निर्णय झाल्या नंतर दिनांक 21.11.2000 ला शासनाने नोटिफिकेशन काढले आहे. शिक्षकाच्या किरकोळ रजा 15च्या 8 झाल्या आहेत असे नाही. शासनाने आता आमचा हक्कच हिरावून घेतला आहे. शासनाने शिक्षकांवर मोठा अन्याय केलेला आहे. सेक्शन 16(4) मध्ये 15 दिवस किरकोळ रजा देण्याच्या बाबतीत तरतूद होती. परंतु आता त्यात शासनाने असा बदल केला की," यापुढे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना किरकोळ रजा देण्याचा अधिकार शासन वेळोवेळी आदेश काढेल त्याप्रमाणे राहील " म्हणजे 15 दिवसांच्या

2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

ऐवजी आठ दिवस, सहा दिवस वा चार दिवस किरकोळ रजा राहील असे नाही.अशा प्रकारचे नोटिफिकेशन दिनांक 21.11.2000 रोजी काढण्यात आले होते आणि दिनांक 22.11.2000 रोजी त्याचा जी.आर. निघाला आणि शिक्षकांच्या किरकोळ रजा 15 ऐवजी 8 करण्याचा निर्णय घेतला गेला.शिक्षकांना किरकोळ रजा मिळणे हा त्यांचा हक्क आहे. शासनाकडून नेहमीच असे म्हटले जाते की, " शासकीय कर्मचा-यांना ज्या सुविधा दिल्या जातात त्याच शिक्षकांना देण्यात येतील."परंतु शासकीय कर्मचा-यांना मिळणा-या हक्काच्या रजा आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना मिळणा-या हक्काच्या रजा यामध्ये प्रचंड प्रमाणात तफावत आहे. शासकीय

कर्मचा-यांना अर्जित रजा मिळते परंतु शिक्षकांना मात्र अर्जित रजा मिळत नाही.आता 8 दिवसांची किरकोळ रजा देण्यात येत आहे परंतु आमचे कामाचे चार दिवस वाढवले आहे आणि 8 दिवसा ऐवजी 12 दिवसांची किरकोळ रजा करण्यात आलेली आहे.त्यामुळे 8 दिवसाच्या किरकोळ रजे ऐवजी 12 दिवस किरकोळ रजा करण्यात आली आणि दहा दिवसांची अर्जित रजा देण्यात आलेली आहे. .. अडथळा . शिक्षकांच्या . कामाचे चार दिवस वाढविले व चार दिवसांच्या सुट्टया कमी केल्या आहेत आणि शासनाने असे सांगितले आहे की," 8 दिवसा ऐवजी 12 दिवसांची किरकोळ रजा देण्यात येत आहे" तेव्हा हे बरोबर नाही.शिक्षकांच्या कामाचे चार दिवस वाढविले, 4 दिवस सुट्टयांचे कमी केले आहेत आणि किरकोळ रजा 12 दिवसांची केलेली आहे. शिक्षकांना त्यांच्या हक्काची 12 दिवसांची किरकोळ रजा मिळाली हे ठीक आहे. परंतु दहा दिवस अधिक 12 दिवस किरकोळ रजा अशी मिळून 22 दिवसांची रजा मिळते .यापेक्षा आम्हाला दुसरी कोणतीही रजा मिळत नाही .शासकीय कर्मचा-यांना अर्जित रजा मिळते. त्यांना मिळणारी अर्जित रजा ही त्यांच्या हक्काची आहे. त्याचबरोबर शासकीय कर्मचा-यांना मिळणारी किरकोळ रजा ही त्यांच्या हक्काची रजा आहे.दुसरा आणि चौथ्या शनिवारी शासकीय कार्यालये बंद राहतात त्यामुळे शासकीय

कर्मचा-यांना हक्काची रजा मिळते परंतु शिक्षकांना मात्र अशा प्रकारे या सुविधा मिळत नाही शासनाने . सेक्शन 16(1) चे व सेक्शन 4(1) चे अनुपालन केलेले नाही .या सेक्शनचे उल्लंधन करुन शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांच्या किरकोळ रजा शासनाने कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.

नंतर श्री.सुंबरे

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोते ....

सेक्शन 126.1 नुसार शासनाने या बाबतीतील प्रस्ताव या सभागृहात आणावयास पाहिजे होता. मग या ठिकाणी जो काही निर्णय होईल तो मान्य केला जाऊ शकतो. पण या सेक्शन मधील तरतुदीनुसार यामध्ये सुधारणा, बदल करावयाचा असेल तर तसा निर्णय घेतल्यानंतर सरकारने विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहामध्ये तो विषय मांडावयास पाहिजे. ही याची प्रोसिजर आहे आणि ती पाळली गेलीच पाहिजे. न्यायालयाने देखील तेच म्हटले आहे. न्यायालयाने देखील सांगितले आहे की, सेक्शन 16.1 मध्ये दिलेल्या प्रोसिजरचे पालन झालेले नाही. परंतु तरीही मागे असे म्हटले गेले होते की, आम्हाला या सभागृहामध्ये हा विषय मांडण्याची आवश्यकता नाही. परंतु तरीही 4 मे 2001 ला शिक्षण सचिवांनी या विधीमंडळाच्या सचिवांना पत्र पाठविले होते की, 2000 मध्ये हा प्रस्ताव केलेला आहे तो सभागृहामध्ये मांडावयाचा आहे म्हणून. पण अद्यापही त्याबाबत काहीही केलेले नाही. याचा अर्थ असा होतो की, शासनाने शिक्षकांच्या किरकोळ रजा कमी करण्याचा जो आदेश काढलेला आहे त्याला कोणत्याही कायद्याचा आधार नाही. म्हणूनेच हे आदेश आमच्यावर, शिक्षण क्षेत्रावर अन्यायकारक आहेत. शासनाने याचा फेरविचार करावा असे माझे या निमित्ताने शासनाला सांगणे आहे. आपण सेक्शन 16.1 चे उल्लंघन केलेले आहे, सेक्शन 4.1 चे उल्लंघन केलेले आहे. 4 मे 2001 ला अशा प्रकारचा काही प्रस्ताव विधीमंडळामध्ये मांडावा असे पत्र आपल्या शिक्षण सचिवांनी विधीमंडळाच्या सचिवांना दिले होते हे खरे आहे काय ? असेल तर गेली पाच वर्षे हा प्रस्ताव विधीमंडळापुढे आलेला नाही. त्यामुळे आपला हा निर्णय नियमबाह्य, कालबाह्य ठरतो. तरी हा निर्णय, आदेश आपण ताबडतोब मागे घ्यावा आणि शिक्षकांना 15 च्या 15 किरकोळ रजा कायम करणार का ? आपण तसे करावे असा आग्रह मी या निमित्ताने धरतो आहे, तरी आपण त्याबाबत खुलासा करावा अशी विनंती करतो. धन्यवाद.

*****

..... 3ए 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ (शालेय शिक्षण राज्यमंत्री) : माननीय सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी अर्धा तास चर्चा येथे उपस्थित केलेली आहे. त्यांनी 15.7.1981 ला जे एसएस कोड होते त्याप्रमाणे किंवा शिक्षण संहितेप्रमाणे शिक्षकांच्या रजा व सेवाशर्तींच्या बाबतीत जी नियमावली होती त्यामध्ये सेक्शन 16.1 आणि 4.1 मध्ये शासनाने बदल करून शिक्षकांना जी 15 दिवसांची किरकोळ रजा मिळत होती ती कमी करून प्रथमत: 12 दिवसांची आणि नंतर तीही कमी करून 8 दिवसांची करण्याचा निर्णय घेतला आहे त्याबद्दल ही अर्धा तास चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यांनी हे जे सांगितले ते खरे आहे. पहिल्यांदा शासनाने 15 ऐवजी 12 रजा केल्या. त्या संबंधात मग दोन रिट पिटीशन्स झाली. उच्च न्यायालयाने याबाबतीत मत प्रदर्शनसुद्धा केलेले आहे. परंतु 12.10.1999 रोजी शासनाने या 15 रजांऐवजी 8 रजा करण्याचा निर्णय घेतला. त्याला पुन्हा शिक्षकांच्या संघटनांनी विरोध केला. त्यामध्ये उन्हाळी आणि दिवाळीची जी सुटी मिळत होती त्यातील 2-2 दिवस कमी करून पुन्हा 12 किरकोळ रजा देण्याचा निर्णय शासनाने घेतला. सभापती महोदया, या ठिकाणी हा जो विषय सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केला आहे त्यामध्ये त्यांचा मुख्य प्रश्न जो आहे तो विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा आहे आणि त्याकडे आपल्याला कदापि डोळेझाक करता येणार नाही. राज्य सरकारची कर्मचाऱ्यांचे दिवसाचे 8 तास प्रमाणे आठवड्याचे 40 तास होतात. परंतु शिक्षकांचे आठवड्याचे 40 तास होत नाही, अगदी त्यांना दुसरा व चौथ्या शनिवारची रजा नसतानाही त्यांचे आठवड्याचे 40 तास होत नाहीत. माझ्या मतदारसंघामध्ये असे अनेक शिक्षक आहेत की, ते सुटीला सुद्धा जात नाहीत. आता विद्यार्थ्यांचे मेरिट चाचणी करण्याची एकमेव परीक्षा म्हणजे शिष्यवृत्ती परीक्षा आहे. असेही कित्येक गुरूजन आहेत की जे आपले विद्यार्थी या परीक्षांमध्ये उत्तीर्ण व्हावेत, चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावेत यासाठी प्रयत्न करीत असतात. तसा मी सर्वच गुरूजनांबद्दल आदर करणारा माणूस आहे. परंतु गेल्या वेळेस याच सभागृहामध्ये विषय झाला की, आपण शिक्षणावर 10 हजार कोटी रूपये खर्च करीत आहोत., डॉ. आंबेडकर यांच्या संकल्पनेप्रमाणे प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केलेले आहे. पण तरीही 8 लाख 31 हजार पेक्षाही जास्त विद्यार्थ्यांना साधे लिहिता देखील येत नाही ही शर्मनाक गोष्ट झाली.

( यानंतर श्री. सरफरे ..... 3बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ...

आपल्या प्रगतीशील महाराष्ट्र राज्याला ही गोष्ट भूषणावह ठरणार नाही. म्हणून माननीय सदस्य श्री. मोते साहेबांना विनंती करीन की, आपण थोडासा बदल केला पाहिजे. आपण विद्यार्थ्याला केंद्रबिंदू मानून त्याचे अध्यापन केले पाहिजे. ज्यावेळी गरीब घरातील सहा वर्षाचा मुलगा शाळेत शिकण्यासाठी येतो त्यावेळी त्याचे पालक त्याची संपूर्ण जबाबदारी आपल्यावर सोडतात. त्यामुळे शिक्षकांनी त्या विद्यार्थ्याला चांगले शिक्षित केले पाहिजे. मी सर्वच शिक्षकांच्या बाबतीत बोलणार नाही परंतु अनेक शिक्षक हे काम चांगल्याप्रकारे आज करीत आहेत. विद्यार्थी हा केंद्रबिंदू मानून त्याच्या अध्यापनाकडे अधिक लक्ष देऊन त्याला कर्तृत्वसंपन्न केले पाहिजे, त्याने जगामध्ये आपले व आपल्या शाळेचे नाव कमाविले पाहिजे...

श्री. नानासाहेब बोरस्ते : सभापती महोदया, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी अर्धा तास चर्चेमधून जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यावर स्पेसिफिक उत्तर दिले गेले पाहिजे. शाळेतील मुलांना सुट्टया आहेत परंतु शिक्षकांना सुट्टया नाहीत. याबाबत आपण एकदा अभ्यास करावा आणि त्याप्रमाणे उत्तर द्यावे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या अर्धा तास चर्चेच्या संदर्भात शासनाची असलेली भूमिका सभागृहाला समजली पाहिजे यादृष्टीने सविस्तर निवेदन करणे आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितल्याप्रमाणे सक्तीचे व मोफत शिक्षण...

श्री. नानासाहेब बोरस्ते : त्याबाबत आम्हाला माहिती आहे....

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, शाळेमध्ये क्रिडा महोत्सव आयोजित केले जातात, वार्षिक स्नेहसंमलने भरविली जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांचे अध्यापनाचे तास कमी होतात. म्हणून शासनाने निर्णय घेतला...

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदया, याठिकाणी शासनाने घेतलेल्या निर्णयाच्या वैधतेला मी आव्हान दिले आहे. म्हणून मंत्रिमहोदयांकडून मला स्पेसिफिक उत्तर पाहिजे. आम्ही आमचे अध्यापनाचे काम करीत आहोत. आतापर्यंत आमच्या 15 रजा होत्या तोपर्यंत आमचे चांगले काम होते आणि आता आम्ही काम चांगले करीत नाही म्हणून आमच्या रजा कमी केल्या कां? असे अजिबात नाही. क्रिडा स्पर्धा किंवा स्नेहसंमलन यामुळे रजा कमी करणे याचा दुरान्वयानेही संबंध नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, सद्या बारा रजा आहेत, त्यामध्ये काहीही बदल करण्याची गरज नाही. माझ्या उत्तराला आपण आक्षेप घेऊ नका. मी गुरुजनांचा आदर करणारा माणूस आहे. मला शिकवायला जे शिक्षक होते ते आजही रस्त्यावर समोर आले तर आजही मी रस्ता बदलतो इतका त्यांचेबद्दल आदर मानणारा मी माणूस आहे. परंतु हे करीत असतांना जे शिक्षकेतर कर्मचारी आहेत त्यांना उन्हाळी व दिवाळीच्या सुट्टया नाहीत. त्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे रजा मिळते. वास्तविक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये गल्लत होता कामा नये. शासकीय कर्मचाऱ्यांना ज्या सोयी-सुविधा व सेवाशर्ती आहेत त्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही मिळतात. राहिला शिक्षकांचा प्रश्न, त्यासाठी मी विनंती करीन की, खरोखर विद्यार्थ्यांचे अध्यापन चांगले व्हावयाचे असेल, विद्यार्थी हा शिक्षणामध्ये परिपूर्ण व्हावयाचा असेल तर दोन-तीन दिवसांच्या सुट्टीबाबत माननीय सदस्यांनी आग्रह धरता कामा नये. आम्ही ही नियमावली दुरुस्त करीत आहोत. यासंबंधी विधी व न्याय विभागाचे मत मागितल्यानंतर आम्ही पुन्हा सभागृहापुढे येऊ. रजेचे प्रमाण थोडे कमी झाले असतांना इतका गहजब करण्याची गरज वाटत नाही. माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या सर्व बाबी पुन्हा तपासून पहाण्यास आपण तयार आहोत. माझी विनंती आहे की, विद्यार्थ्यांचे अध्यापनाचे दिवस कमी होत आहेत. शिक्षकांची 3 दिवस किरकोळ रजा कमी केल्यामुळे त्यांचे काहीही नुकसान होणार नाही असे माझे मत आहे. विधीमंडळाच्या उपविधान समितीपुढे हा विषय मांडून त्यांचीही याला मंजूरी घेतली आहे. तरीसुध्दा विधी व न्याय विभागाचा सल्ला घेतल्यानंतर ही बाब पुन्हा सभागृहापुढे आली पाहिजे म्हणून 1981 च्या कायद्यामध्ये दुरुस्ती करण्यासाठी आम्ही पुन्हा सभागृहापुढे येऊ. आज महाराष्ट्रामध्ये 8 लाख 31 हजार 75 इतक्या इयत्ता सातवीपर्यंतच्या मुलांना लिहिता व वाचता येत नाही हा कलंक पुसण्यासाठी आपण आग्रह सोडून द्यावा अशी विनंती करतो.

---

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/D/RJW पूर्वी श्री.किल्लेदार . . . . 16:30

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मी याठिकाणी दोन-तीन स्पेसीफीक प्रश्न विचारले होते. खरे म्हणजे शासनाने रजा कमी करण्याचा जो निर्णय घेतलेला आहे त्याचा आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा, शिक्षकांच्या कामाचा कोणताही संबंध नाही. खरे म्हणजे कायद्यापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही. विधीमंडळामध्ये 1977 चा कायदा आणि 1981 ची नियमावली तयार केलेली आहे आणि ती सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्या उपस्थितीत तयार झालेली आहे. त्यातील 4.1 मध्ये स्पष्टपणे म्हटलेले आहे की, जे शिक्षक दि.15-7-1981 ला सेवेत होते, त्यांच्या रजा तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत बदलता येणार नाहीत. असा तुम्ही कायदा तयार केलेला आहे. अशा वेळी त्या कायद्याचे उल्लंघन करुन तुम्ही त्यांच्या रजा कमी करण्याचा निर्णय घेणार आहात का ? आणि तोही विधीमंडळासमोर न आणता घेणार आहात का ? एकवेळ असे म्हणत आहात की, मी विधीमंडळात आणतो. पण जरी तुम्ही ते विधीमंडळासमोर आणले तरी जे दिनांक 15-7-1981 ला जे सेवेत होते, त्यांच्या बाबतीत तुम्हाला तो निर्णय पूर्वलक्षीप्रभावाने लागू करता येईल का? तर तसे करता येणार नाही. म्हणून मला याबाबतीत स्पेसीफीक उत्तर हवे आहे. Can the amendeded rules be applicable to the persons who were employed on 15-7-1981? सेक्शन 4.1 असे सांगतो की, तो अजिबात लागू होणार नाही. मग तुम्ही तो कसा लागू करणार आहात. याचा अर्थ मग महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रामध्ये तुम्हाला दोन गट तयार करावे लागतील. एक म्हणजे 1981 पूर्वीचा शिक्षक जो 15 रजा घेणार आहे आणि दुसरा म्हणजे 1981 नंतर आलेला शिक्षक, जो 4 आणि 8 रजा घेणार आहे. हे आपल्याला परवडणार आहे का ? आपण असे करणार आहात का ? म्हणून माझा मुद्दा असा होता की, आपण सेक्शन 16.4 चे उल्लंघन केलेले आहे. गेल्या पाच वर्षामध्ये त्याचे अनुपालन झालेले नाही, त्याचा एवढा गंभीर परिणाम होत आहे की, आपण नियमबाहय पध्दतीने, आपल्या मर्जीप्रमाणे सगळे करीत आहोत. हा फार गंभीर विषय आहे. खरे म्हणजे आपल्या 1981 च्या नियमावलीमध्ये नियम क्र.9 असे सांगतो की, तुम्ही 34 टक्के रिझर्वेशन केलेले आहे. पण आज तुम्ही 52 टक्के रिझर्वेशन केलेले आहे. याबाबतीत जी.आर.काढले, शासकीय आदेश निघाले. पण कोर्ट 52 टक्के रिझर्वेशन मान्य करीत आहे का ? गेल्या अनेक वर्षापासून आपण 1981 च्या नियमावलीतील नियम क्र.9 मध्ये रिझर्वेशनच्या संबंधातील टक्केवारी बदलली नाही. त्याचा परिणाम आज असा होत आहे, न्यायालय असे म्हणत आहे की, मोअर दॅन 34 परसेंट रिझर्वेशन नॉट ॲप्लीकेबल. तुम्हाला 34 टक्क्यापेक्षा

. . . .3 सी-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते . . . .

जास्त रिझर्वेशन ठेवता येणार नाही. शासन 52 टक्के रिझर्वेशन म्हणत असेल तर म्हणू द्या, पण याबाबत हायकोर्ट सांगते की, अजिबात नाही. Nothing doing. Have the rules been amended by the Government? अजिबात नाही. मग तुम्हाला ते कसे लागू करता येईल ? 34 परसेंटच्या आधारे अनेक शिक्षक बॅकलॉगवर आहेत. तरी सुध्दा त्या शिक्षकांच्या बाबतीत हाय कोर्टाने आदेश दिले की, मान्यता द्या आणि त्याप्रमाणे मान्यता दिलेली आहे. हा कसला परिणाम आहे ? आपण योग्य त्या पध्दतीचा अवलंब केला नाही, त्याचा हा परिणाम आहे. हे आपण सुरु ठेवणार आहात का ? आपण सगळी कामे अयोग्य पध्दतीनेच करणार आहात का ? याचे मला स्पेसीफीक उत्तर हवे आहे. सेक्शन 4.1 आणि सेक्शन 16 चे जे उल्लंघन केलेले आहे, ते बरोबर आहे का ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदय, महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी विनियमन अधिनियम 1977 नुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी सेवेच्या शर्ती व नियमावली 1981 मध्ये शासन निर्णयाप्रमाणे वेळोवेळी किरकोळ रजा निश्चित करण्याची तरतूद नियमानुसार आम्ही केलेली आहे. सदर तरतूद नियमात करण्यापूर्वी प्रारुप अधिसूचना निर्गमित करण्यात आली होती. सदर सूचनेबाबत प्राप्त झालेले आक्षेप आणि अभिप्राय एकत्रित करुन शासनाच्या प्रस्तावासोबत विधीमंडळाच्या उपविधान समितीसमोर सादर करण्यात आले होते. सदर समितीचे अभिप्राय घेतल्यानंतरच आम्ही नियमात दुरुस्ती केलेली आहे. याशिवाय आता सन्माननीय सदस्य श्री.मोतेसाहेबांनी प्रश्न उपस्थित केले आहेत की, हे विधीमंडळासमोर यावयास पाहिजे. याबाबतीत आम्ही विधी व न्याय विभागाचे अभिप्राय मागवून घेऊ. त्यांची मते तपासून पाहू आणि जर यासाठी विधीमंडळासमोर यावे लागत असेल तर आम्ही तसे निश्चितपणे येऊ. पण आमचे मत असे आहे की, आम्ही केलेली कार्यवाही ही नियमानुसार आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकदम बोलतात.)

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदया, खरे म्हणजे त्यांनी दोन्ही सभागृहासमोर यावयास पाहिजे. म्हणजे कायद्याच्याच बाबतीत आपल्याला विधी व न्याय विभागाचा सल्ला घ्यावयाचा आहे का ? आपण सेक्शन 16 वाचावा.

डॉ.अशोक मोडक : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. मला असे. . . . .

. . . .3 सी-3





डॉ.अशोक मोडक . . . .

म्हणावयाचे आहे की, माननीय मंत्री महोदय जे म्हणत आहेत, ते बरोबर नाही. मी येथे वाचूनच दाखवितो. माननीय मंत्री महोदय, याठिकाणी अतिशय स्वच्छ शब्दात सांगितले आहे की, "Every rule made under this Act shall be laid, as soon as maya be, after it is made before each House of the State Legislature, while it is in session for a total period of thirty days, which may be comprised in one session or in two or more successive sessions..." याचा अर्थ मी आपल्याला सांगावयास नको. आपण हे मान्य करावे की, तुम्ही याबाबतीत सदनासमोर आलाच नाहीत. इतका वेळ कंठशोष करुन सन्माननीय सदस्य श्री.मोते सांगत आहेत की, आपण याचे उल्लंघन केले आहे. आपण ते मोकळेपणाने मान्य करण्याऐवजी शिक्षकांचा स्पोटर्स्‌मध्ये वेळ जातो,गॅदरींगमध्ये वेळ जातो हे तुम्ही आम्हाला कशासाठी सांगत आहात ?

यानंतर श्री.किल्लेदार . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ RJW/ पूर्वी सौ.रणदिवे.... 16:35

डॉ.अशोक मोडक (पुढे चालू..

प्रश्न इतकाच प्रिसाईज आणि स्पेसिफिक आहे की, आपण याचे उल्लंघन केले की पालन केलेले आहे?

श्री.हसन मुश्रीफ : मी मघाशी सांगितले की, विधिमंडळाच्या उप विधान समितीने आक्षेप घेतल्यानंतर हा निर्णय केलेला आहे. आमची नियमानुसार केलेली कारवाई बरोबर आहे. ते दोन वेळा उच्च न्यायालयामध्ये गेलेले होते. वास्तविक कंटेम्प्ट सुध्दा त्यांना दाखल करता आला असता, तसा त्यांनी केलेला नाही. परंतु तरी देखील विधी व न्याय खात्याची जी मते आहेत, ती तपासून घेऊ. विधी व न्याय खात्याचे विधिमंडळासमोर जाण्याबाबत म्हणणे असेल तर आम्ही विधिमंडळासमोर येऊ.

श्री.जी.एल.अैनापुरे : प्रत्येक अधिवेशनामध्ये प्रश्न उपस्थित केला जातो. हा प्रश्न क्लिष्ट केला जात आहे. हा प्रश्न सोपा आहे. आपल्याला सूडच घ्यावयाचा आहे काय ? असा आम्हाला आता संशय यायला लागलेला आहे. हे कोठे तरी दुष्टचक्र आहे. त्यामध्ये लॉजिक नाही, तर्कदृष्टया विचार केलेला नाही, सगळे विचित्र चाललेले आहे. असे सांगण्यात येते की, वेळोवेळी आम्ही दुरुस्ती केलेली आहे. परंतु कायद्यामध्ये दुरुस्ती केलेली आहे काय ? हा खरा प्रश्न आहे. आपल्या सर्क्युलरनी ही दुरुस्ती होते काय, हा पहिला प्रश्न आहे. आता आपण ॲग्री झालेला आहात. आता आपण म्हणत आहात की, मुलांचा अभ्यास झाला पाहिजे. ते शिक्षक आहेत. एखाद्याचे कल्याण करायचे झाले तर ते वाटेल करतात आणि जर त्याचे वाटोळे करायचे असेल तर त्यांना तीन दिवस लागत नाहीत, तर तीन तासामध्ये वाटोळे करु शकतो. त्यामुळे शिक्षकांवर तसा अविश्वास दाखवू नका. तीन दिवसामुळे काही होते, असे म्हणणे बरोबर नाही. 12 दिवसाच्या ऐवजी 15 दिवसाची रजा हा त्यांचा हक्क आहे. तो हक्क कायद्याने मिळालेला आहे. आमचे असे म्हणणे आहे की, आम्हाला कोणालाही विश्वासात न घेता, आपण ही दुरुस्ती का केली ? जी दुरुस्ती केली, ती दुष्ट बुध्दीने केली. ती दुरुस्ती का केली, हा पहिला प्रश्न आहे. जी दुरुस्ती केली ती बेकायदेशीर केली. आपण म्हटले की, त्यांनी संप केले, मोर्चे आणले, निदर्शने केली. आता पुन्हा सन्माननीय सदस्य श्री.मोते साहेबांनी बरोबर कायद्यामध्ये पकडल्यानंतर आम्ही सर्क्युलर काढून दुरुस्ती केली असे थातूरमातूर सांगितले जात आहे. मंत्री महोदयांना मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की,फ्रेश पुन्हा एकदा पूर्वग्रहदुषित न ठेवता या प्रश्नाचा विचार करण्याची आपली तयारी आहे काय ? याचे कारण उपमुख्यमंत्री माननीय श्री.आर.आर. पाटील



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ D/ RJW/

श्री.जी.एल.अैनापुरे (पुढे सुरु....

साहेबांच्या चेंबरमध्ये, माननीय मंत्री श्री.पतंगराव कदम साहेबांच्या चेंबरमध्ये शिक्षणमंत्र्यांना घेऊन त्यांच्याबरोबर अनेकवेळा चर्चा केलेली आहे. त्या चर्चेच्यावेळी शिक्षणमंत्र्यांनी तोंडी मान्य केले की,15 दिवसाची रजा करायला हरकत नाही. परंतु प्रत्यक्षात येथे उत्तर द्यायला आपण येता त्यावेळेला वेगळे उत्तर दिले जाते. यापूर्वीचे शिक्षण मंत्री श्री.अमरिशभाई पटेल होते, त्यांनी 15 दिवसाची रजा करतो म्हणून आम्हा सगळयांना नागपूरमध्येच बोलावून सांगितले. प्रत्यक्षात दुपारी सन्माननीय सदस्या श्रीमती रायकर ताईंनी प्रश्न लावून धरला त्यावेळेला 15 दिवसाची रजा करता येत नाही असे त्यांनी सांगितले. आता 12 रजा देण्यात येतील. या 12 रजा दिल्या म्हणजे मेहबानी केली काय ? एका सुट्टीतील दोन दिवस आणि दुसऱ्या सुट्टटीतील दोन दिवस कमी केले, शिक्षकांचे काम वाढविले. शेवटी मुले शाळेत येणे, न येणे हे आमच्या मर्जीवर असते. आम्ही शिक्षकांनी सुट्टीच्या दिवशी मुलांना बोलाविले तर ती येतात, तसेच शाळेच्या दिवशी जा, म्हणून सांगितले तर ते शाळेत जातात. पुन्हापुन्हा अभ्यासाचे कारण सांगू नका.. ते आमचे पाप नाही. आम्ही वाभाडे काढू शकतो. हे तुम्ही 8 लाखाचे आकडे कोठून काढले ? या संदर्भात आम्ही चॅलेंज केले तर आपण अजून उघडे पडाल. हा आकडा बोगस आहे. जी मुले पहिलीपासून कधीच शाळेत जात नाहीत.. त्याबाबत शिक्षकांनी पत रहावी, आपली बदली होऊ नये, म्हणून बोगस विद्यार्थी चढविलेले आहेत. सातवीपर्यन्त मुले शाळेतच आलेली नाहीत, त्या मुलांना धरुन आकडे काढलेले आहेत. अजून आपण याबाबतचा सर्व्हे करावा. दोन-अडीच लाख देखील ही मुले असणार नाहीत. हा प्रश्न वेगळा असला तरी देखील त्याचा आणि याचा, गुणवत्तेचा आणि रजेचा काडी इतकाही संबंध नाही. मंत्री महोदय आपण मोकळ्या मनाचे आहात, शिक्षकांबद्दल आदर असल्याचे प्रत्येकवेळी आपण सांगता, तेव्हा या शिक्षकांना 15 रजा देण्यासंबंधी विचार कराल काय ?

श्री.हसन मुश्रीफ : सभापती महोदया, सन्माननीय सदस्य श्री. अैनापुरे साहेबांनी जे दोन प्रश्न उपस्थित केले, त्याबद्दल खरोखरच माझ्या काळजाला घरे पडल्यासारखे झालेले आहे. त्यांनी पहिला प्रश्न उपस्थित केला की, आमच्यावर आपली सुड भावना आहे काय, शिक्षकांच्याबाबत दुष्टचक्र आहे काय ? काहीही कट कारस्थान नाही. वडील आणि आई याच्यानंतर आम्ही शिक्षकांना मानणारी माणसे आहोत. शिक्षक हे आमचे दैवत आहे,त्यामुळे असे आम्ही कसे करु ? म्हणून स्वच्छ मनाने पूर्वग्रहदुषित न ठेवता आमची पुन्हा यासंबंधात चर्चा करण्याची तयारी आहे.

यानंतर कु.थोरात....

अग्रधिकृत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जी. एल. अैनापुरे : शिक्षक आमदारांबरोबर चर्चा करण्याची आपण तारीख कळविली तर आम्ही नक्की चर्चेसाठी येऊ.

श्री. हसन मुश्रीफ : ती चर्चा नक्की करु.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी जो प्रस्ताव मांडलेला आहे त्याचे मी अभिनंदन करतो. आणि त्यांचे आभारही मानतो. शासनाने शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांमध्ये भांडण लावण्याचे काम केलेले आहे. वास्तविक पाहता 1981 च्या कायद्यातील बाबीचे त्यांनी उल्लघंन केलेले आहे. शिक्षकांना हक्काच्या 15 किरकोळ रजा होत्या पंरतु शासनाने त्या आठ केलेल्या आहेत. आम्ही त्यासाठी संघर्ष केला आणि 8 च्या 12 किरकोळ रजा मिळविल्या. या 12 किरकोळ रजा फक्त शिक्षकांसाठी दिलेल्या आहेत. शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी दिलेल्या नाहीत. यापूर्वी असलेल्या 8 किरकोळ रजा शिक्षकेतर कर्मचा-यांनाही लागू होत्या. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आम्ही एकाच शाळेत, एकाच संस्थेत शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी काम करतो. शिक्षकांना 12 सी.एल. करण्यात आल्या आहेत तेव्हा शिक्षकेतर कर्मचा-यांना देखील 12 सी.एल. देण्याचा आदेश काढण्यात येईल काय? 15 सी.एल. मिळविण्यासाठी आम्ही भांडूच पण शिक्षकांना ज्या 12 सी.एल. देण्यात आलेल्या आहेत त्या शिक्षकेतर कर्मचा-यांना देण्यात येतील काय?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदय, मी मघाशीच या प्रश्नाचे उत्तर दिलेले आहे. शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामध्ये भांडण लावण्याचा काही प्रश्न नाही. शिक्षकेतर कर्मचा-यांना उन्हाळयाची आणि दिवाळीची सुटी नाही. शासकीय कर्मचा-यांप्रमाणेच त्यांना सगळे नियम आहेत. मग त्यांना 12 आणि 15 सी.एल.ची गरज काय आहे? शिक्षकेतर कर्मचा-यांचे काम वेगळे आहे आणि शिक्षकांचे काम वेगळे आहे. त्यामुळे त्यामध्ये गल्लत करण्याचा प्रश्न कुठे येतो?

श्री. वसंतराव खोटरे : या अगोदर शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचा-यांना 15 सी.एल. होत्या की नाही ?

श्री.हसन मुश्रीफ : ती चूक असेल. ती चूक शासनाने नंतर दुरुस्त केली असेल.

श्री. वसंतराव खोटरे : शिक्षकांना 8 च्या 12 सी.एल. केल्या.पण शिक्षकेतर कर्मचा-यांना त्यापासून वंचित ठेवले आहे. तेव्हा शिक्षकांप्रमाणे शिक्षकेतर कर्मचा-यांनाही 12 सी.एल.चा जी.आर. काढण्यात येईल काय?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हसन मुश्रीफ :सभापती महोदय, असा जी.आर.काढून कसे चालेल? शिक्षकेतर कर्मचा-यांना दिवाळीची सुटी नाही, उन्हाळयाची सुटी नाही. शासकीय कर्मचा-यांप्रमाणे त्यांना सगळया सेवा-शर्ती लागू असतांना शिक्षकाप्रमाणे त्यांना रजा मिळाल्या पाहिजेत असा ह्ट्ट का ?

श्री.नानासाहेब बोरस्ते : सभापती महोदय,सन्माननीय रामनाथ मोतेसाहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे तो अतिशय महत्वाचा आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. आपण शिक्षेकत्तर कर्मचा-यांना सरकारी कर्मचा-याप्रमाणे वागविले पाहिजे. परंतु त्यांना उन्हाळयाची सुटी नाही, दिवाळीची सुटी नाही. सुटी नसल्यामुळे त्यांचे वर्कलोड वाढलेले आहे. त्यामुळे 8 ऐवजी त्यांना 15 रजा मिळाल्या पाहिजेत. मंत्रिमहोदय, शिक्षक प्रतिनिधींबरोबर चर्चा करणार आहेत तर ती चर्चा पूर्ववत 15 किरकोळ रजा करण्याच्या संदर्भात होणार आहे काय, याचे मला स्पेसिफिक उत्तर द्यावे.

श्री. हसन मुश्रीफ :सभापती महोदय, पूर्वग्रहदुषित मी या प्रश्ना संबंधीचे उत्तर दिलेले नाही. अतिशय खुल्या अंत:करणाने गुरुजनांबरोबर चर्चा करण्याची आमची तयारी आहे. 12 किंवा 15 रजांच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांची जी काही मागणी आहे त्याबाबत शासनाची चर्चा करण्याची तयारी आहे.

श्रीमती संजीवनी रायकर :सभापती महोदय, आंदोलन कशाला म्हणतात? धरणे धरलेले आहे. विधिमंडळात प्रश्न विचारलेला आहे.शिक्षण मंत्र्यांबरोबर, मुख्यमंत्र्यांबरोबर चर्चा केलेली आहे. स्वत:ला पेटवून घेणे म्हणजे आंदोलन असे शासन समजणार आहे काय ? हेच मला कळत नाही. सहल, गॅदरिंग हया आवश्यक गोष्टी आहेत.ते सुध्दा एक प्रकारचे शिक्षणच आहे. ते आम्ही मंत्रिमहोदयांना सांगावे अशी गोष्ट नाही. सर्वशिक्षा अभियान अनेक गोष्टीसाठी राबविण्यात येते त्यामुळे आज शिक्षकांना वर्ग सोडून बाहेर राहावे लागते. प्रशिक्षणाला माझा विरोध नाही. मी मुंबईतील तीन प्रशिक्षण केंद्राना भेटी दिल्या आहेत. तेथे इंग्लिश, हिंदी,गुजराथी, मराठी सर्व भाषांच्या शिक्षकांना एकत्रित प्रशिक्षण दिले जाते.फक्त रिसर्च पर्सन मराठी भाषिक आहे. त्यामुळे तो या सगळयांना मराठीतून शिकवितो. त्यामुळे तथील इंग्लिशचे शिक्षक म्हणतात प्रशिक्षकांनी काय शिकविले ते आम्हाला समजलेले नाही. तेव्हा हे प्रशिक्षण देतांना इंग्लिशच्या शिक्षकांना एकत्र प्रशिक्षण द्यावे. हिंदीच्या शिक्षकांना एकत्र प्रशिक्षण द्यावे. चटावरचे श्राध्द म्हणणे मला बरोबर वाटत नाही. पण कुठून तरी एन.सी.ई.आर.टी. कडून पैसे आलेले आहेत ते खर्च करावयाचे आहेत

..3..



SMT/ D/ RJW/ प्रथम श्री.किल्लेदार.. 16:40

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर...

म्हणून खर्च करण्यात येत आहेत. आम्ही या ठिकाणी योग्य पध्दतीने 15 दिवसांच्या किरकोळ रजेची मागणी करीत आहोत. शिक्षक उगाचच रजा घेत नाहीत. कारण त्यांना माहीत असते की, आज मी रजा घेतली तर उद्या मलाच पोर्शन पूर्ण करावयाचा आहे. म्हणून जेव्हा गरज असते तेव्हाच शिक्षक रजा घेतात. अशा वेळेला आपण मुद्दाम 15 सी.एल.च्या 8 सी.एल. करणे योग्य होणार नाही. शिक्षकांना या रजेची खरी गरज असते. त्यांना परीक्षा द्यावयाच्या असतात. घरात कार्य असते. मुले आजारी असतात अशा वेळेला जी हक्काची रजा हवी असते ती मिळत नाही.

यानंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती संजीवनी रायकर ........

सर्व शिक्षा अभियान योजनेअंतर्गत मुलांचे जे नुकसान होत आहे त्यादृष्टीनेही विचार होणे आवश्यक आहे. प्रशिक्षणाला आमचा विरोध नाही परंतु मुलांचे अभ्यासाचे नुकसान होणार नाही याचाही कुठेतरी विचार व्हावा. यामध्ये शिक्षकांच्या रजा संपतात मग त्यांना विदाऊट पे रजा घ्यावी लागते यासाठी 15 दिवस किरकोळ रजा वर्षासाठी करणे आवश्यक आहे. माजी शिक्षणमंत्री कै. रामकृष्ण मोरे यांनी त्यावेळी सांगितले होते की, दोन चार दिवसात यासंबंधीचे आदेश काढतो. एवढे म्हटल्यानंतर आणि आता आपण विधि व न्याय विभागाकडे जाणार असे सांगत आहात. नेमके याच वेळी कायदयावर बोट ठेवून आपण सांगत आहात. मग यापुर्वीच विधि व न्याय विभागाकडे का गेला नाहीत ? तसेच यासाठी दोन्ही सभागृहांची मान्यता घेणे आवश्यक असल्याचेही या ठिकाणी सांगण्यात आले. हे सर्व करुन शासन ही 15 दिवसांची किरकोळ रजा शिक्षकांना देणार काय ?

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, मी वारंवार सांगितले की, या 15 आणि 12 किरकोळ रजेच्या संदर्भात चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे. दुसरे म्हणजे इंग्रजी रिसोर्सेस बाबत जो मुद्दा उपस्थित झाला त्यासंदर्भातही तपासणी केली जाईल.

प्रा. शरद पाटील : मा. मंत्री महोदयांनी चर्चेसाठी तयारी दाखविल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. तसेच शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या संदर्भात देखील त्यांनी ऐकून घ्यावे व त्याबाबत खुल्या मनाने चर्चा करावी अशी माझी विनंती आहे.

श्री. हसन मुश्रीफ : सभापती महोदया, या अधिवेशनापूर्वीच चर्चा करण्याची आमची तयारी आहे तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या रजांच्या संदर्भातही चर्चा करणार आहोत.

**तालिका सभापती (श्रीमती कांता नलावडे)** : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 9 डिसेंबर, 2005 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 4 वाजून 47 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 9 डिसेंबर, 2005 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही